इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - १२० ▸ शनिवार,ता.३० ऑगस्ट २०२५ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 • पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

वक्रतुण्ड महाकाय सुर्यकोटि समप्रभः । निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषुसर्वदा ॥

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००



इचलकरंजी–गावभाग टाकवडे वेस येथील राणाप्रताप युवक गणेशोत्सव मंडळाची नवसाला पावणारी भव्य अशी १७ फूट उंचीची अलंकार भूषित आकर्षक श्रींची मूर्ती. (छाया–सारंग दास)

# आझाद मैदानावर भगवे वादळ

## ओबीसी आरक्षणासाठी पुन्हा एल्गार; लाखो मराठा बांधवांचे शक्ती प्रदर्शन

■ मुंबई,ता.२९ (प्रतिनिधी)–

**मराठा आरक्षणासाठी जोरदार शक्तिप्रदर्शन करत मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानावर सकाळी साडे नऊ वाजता दाखल झाले. त्यानंतर १० वाजता जरांगे आमरण उपोषणास बसले.**

मानखुर्द, चेंबूरमध्ये जरांगेंचे भव्य स्वागत करण्यात आले. शेकडो गाड्यांचा ताफा आणि हजारो मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले. दुसरीकडे प्रत्यक्ष आंदोलनस्थळ म्हणजे, आझाद मैदानही हाऊसफुल झाले होते, तर 'चलो मुंबई,' ''उठ मराठ्या उठ'' असे पोस्टर घेऊन भगवे फेटे व टोप्या आणि गळ्यात भगवे उपरणे घालून आंदोलकांचे लोंढेच्या लोंढे आझाद मैदानावर आदळत होते. आज संध्याकाळी

सहा वाजेपर्यंत आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी दिली असली तरी त्यानंतर ही मुदत एक दिवसांनी वाढविण्यात आली आहे. त्यामुळे मनोज जरांगेंच्या आंदोलनाकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.मनोज जरांगेंनी आझाद मैदानावर एवटलेल्या हजारो मराठा आंदोलकांशी संवाद साधला. तसेच, यावेळी त्यांनी सर्व मराठा आंदोलकांना शांत राहण्याचे आणि शिस्त पाळण्याचे आवाहन केले. डोक्यावर गुलाल पडल्याशिवाय इथून कुणी मुंबई सोडायची नाही, असेही मनोज जरांगेंनी आंदोलकांना सांगितले.

(पान २ वर)



मुंबईत आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झालेले मराठा बांधव.

### ४ सप्टेंबरपर्यंत मुंबईत आंदोलनाचे जरांगेंचे संकेत

सरकारने आता कसलेही डाव खेळू नये, आरक्षण द्यावे. आम्हा गोरगरीब मराठ्यांना आरक्षण मिळाले, तर आम्ही तुम्हाला विसरणार नाही. तुम्ही एक एक दिवस मुदतवाढ दिली तरी उपोषण मागण्या पूर्ण होईपर्यंत सुरू राहील. आता हे सिद्ध झालंय की सरकार परवानगी देऊ शकते. मला गोळी मारण्याचे, लोक अडवायचे सगळे सरकारच्या हातात आहे, असे मराठा आरक्षण मागणीसाठी आग्रह नेते मनोज जरांगे यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे. शिवाय मुंबईत ४ सप्टेंबरपर्यंत आंदोलन करण्याचे संकेतही या निमित्ताने त्यांनी दिले. मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला सुरुवात केली त्या निमित्ताने त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिने मुदतवाढ

■ मुंबई,ता.२९–

**राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांना मुख्य सचिव पदावर तीन महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीसाठी ही मुदतवाढ असेल. याबाबतचे आदेश केंद्र सरकारकडून सामान्य प्रशासन विभागाला प्राप्त झाले आहेत.**

राज्य शासनाने तीन महिने मुदतवाढ देऊन राज्याची ध्येय-धोरणे पुढे राबविण्याची संधी दिल्याबद्दल मुख्य सचिवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

## बिहारच्या तीन लाख मतदारांना आयोगाची नोटीस

### नागरिकता संशयास्पद असल्याचा संशय

■ पाटणा,ता.२९–

**बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या (एसआयआर) दरम्यान सुमारे ३ लाख मतदारांना नोटीस पाठवण्यात आली आहे. या नागरिकांची नागरिकता 'संशयास्पद' असल्याचा संशय आहे.**

बिहारमध्ये बांगलादेश, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तान येथून आलेल्या संशयित मतदारांना




बिहारमधील विविध जिल्ह्यांमध्ये, विशेषतः आंतरराष्ट्रीय सीमा लागून असलेल्या भागांतील निर्वाचन नोंदणी अधिकाऱ्यांकडून (पान २ वर)

## मराठा आरक्षणावर सकारात्मक भूमिका

# ठाकरे–पवारांनी समाजासमाजात भांडण लावू नये – मुख्यमंत्री

■ मुंबई,ता.२९(प्रतिनिधी)–

**मराठा आरक्षणावर सकारात्मक भूमिका पण समाजासमाजात भांडण लावू नका, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनावर दिली.**

ते म्हणाले की आंदोलकांनी आज सकाळी शहरात प्रवेश केला असून काही ठिकाणी रास्ता रोकोच्या घटना घडल्या होत्या. मात्र पोलिसांनी वेळेवर समजूत काढल्याने आंदोलक बाजूला झाले आणि जरांगे पाटील यांनीही स्वतः शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या कोणत्याही आंदोलनाला शासनाची सहकार्याची भूमिका असते, त्यामुळे प्रशासन त्याला सहकार्य करत आहे असे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस म्हणाले की, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या चौकटीत राहून शासन आणि प्रशासन आवश्यक ती पावले उचलतील.



(पान २ वर)

### 'डिजिटल अटक'ची भिती दाखवून

# डॉक्टर दाम्पत्याला ४२ लाखांचा गंडा

■ कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)–

**कोल्हापूरातील नामांकित डॉक्टर दाम्पत्याला 'तुमच्या बँक खात्याचा वापर अतिरेकी संघटनांनी केला आहे, तुम्हाला डिजिटल अटक होऊ शकते' अशी भीती दाखवत, तोतया पोलिसांनी तब्बल ४२ लाख ९१ हजार रुपयांचा गंडा घातला. ९ ते २८ ऑगस्ट या कालावधीत ही फसवणूक झाली असून याबाबत डॉ. महेश्वर दत्तात्रय शितोळे (वय ३५, रा. शितोळे हॉस्पिटल, राजारामपुरी) यांनी राजारामपुरी पोलिसात फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, डॉ. दत्तात्रय शितोळे हे राजारामपुरी पहिली गल्ली येथे शितोळे हॉस्पिटल चालवतात. त्यांचा मुलगा (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| राधानगरी | ८.३६ | ८.३४ |
| तुळशी | ३.४७ | ३.४३ |
| वारणा | ३४.४० | ३२.८६ |
| काळम्मावाडी | २५.३९ | २१.५३ |
| कासारी | २.७७ | २.६४ |
| कडवी | २.५२ | २.५२ |
| कुंभी | २.७२ | २.७० |
| पाटगाव | ३.७२ | ३.७२ |
| चिकोत्रा | १.५२ | १.५२ |
| चित्री | १.८९ | १.८९ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८२ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२४ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | १.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १०१३०० रु. | ११७५०० रु. |

अंडी ५७० रुपये शेकडा

## न्याय हक्कासाठी मराठी माणूस मुंबईत येणार

### उध्दव ठाकरे यांचे वक्तव्य

■ मुंबई,ता.२९–

**मुंबई ही मराठी माणसांची राजधानी आहे. न्याय हक्कासाठी मराठी माणूस मुंबईत नाही येणार, तर काय गुजरात, गुवाहाटीला जाणार?, असा प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विचारला आहे. नाईलाजाने मराठी माणसाला न्याय हक्कासाठी मुंबईला यावे लागले.**



कारण या सरकारने सांगितले होते की, त्यांचे सरकार आले की काही दिवसात न्याय दिला असता. (पान २ वर)

# कामगाराच्या खूनप्रकरणी तिघांना अटक

### ३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

■ इचलकरंजी,ता.२९–

**कामाच्या ठिकाणी वारंवार तक्रार करत असल्याच्या वादातून तिघांनी लोखंडी ड्रॉपींग सपोर्टर व लाकडी दांडके डोक्यात मारुन संतोष गोपाल पांडा (वय ३८ सध्या रा. विनायक हायस्कुलसमोर मुळ रा. चांडेया पोस्ट बारापाडा, ओरिसा) याचा खून झाल्याचे स्पष्ट झाले आहे.**

या खून प्रकरणी मनोज चंद्रमणी बेहरा, तपस नरोत्तम बेहरा आणि सिबाराम जंबेश्वर बेहरा (तिघेही सध्या रा.श्री बालाजी उद्योग समुह तारदाळ, मूळ रा.सनामुंडा कांतिमली, ओरिसा) या तिघांना शहापूर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, तिघा संशयितांना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना ३ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, मयत संतोष पांडा व संशयित मनोज, तपस व सिबाराम हे सर्वजण तारदाळ आझादनगर येथील (पान २ वर)



अटक करण्यात आलेल्या तिघांना न्यायालयात घेऊन जाताना पोलिस. (छाया–मयूर चिंदे)

### हिमाचलमध्ये दरड कोसळून अकरा ठार

■ सिमला,ता.२९–

**हिमाचल प्रदेशातील चंबा आणि भरमौर परिसरात जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. भरमौर परिसर संपूर्णपणे बाहेरच्या जगापासून तुटून गेला आहे. अनेक ठिकाणी रस्ते कोसळले असून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. दूरसंचार सेवा सुद्धा अनेक भागांत अजूनही सुरू झालेल्या नाहीत. मणिमहेश यात्रेत सहभागी हजारो भाविक अडकले आहेत.**

गेल्या ४ ते ५ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि भूस्खलनामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक लोकांनी आपली वाहने रस्त्यावरच सोडून पायपीट सुरू केली (पान २ वर)

हास्यतुषार – सुरेंद्र दास



एकाचे दोन झाले आता दोनाचे चार दिवस होणार की काय?

## राधानगरी धरणाच्या दोन दरवाज्यातून विसर्ग सुरू

■ शिरगाव,ता.२९(प्रतिनिधी) –

**राधानगरी तालुक्याच्या पश्चिम घाट माथ्यावरील नागरी भागासह धरण पाणलोट क्षेत्रात सकाळपासून पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे धरणाचा स्वयंचलीत दरवाजा क्रमांक ३ पुन्हा उघडला आहे. सध्या गुरुवारी खुले असलेल्या द्वार ६ व द्वार क्रमांक ३ या दोन दरवाज्यातून २८५६ व पॉवर हाऊस मधून १५०० असा एकूण ४३५६ क्युसेकने भोगावती नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरु आहे.**

धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने गुरुवारी रात्री एक व शुक्रवारी मध्यरात्री चार असे धरणाचे एकूण पाच स्वंयचलीत दरवाजे उघडले होते. मात्र गुरुवारी पावसाचा जोर कमी झाल्याने सकाळी धरणाचे चार दरवाजे बंद झाले होते. त्यामुळे गुरुवारी धरणाच्या एक दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग सुरू होता.

आज सकाळपासून पावसाचा जोर वाढल्याने धरणाचा एक दरवाजा पून्हा उघडला (पान २ वर)

# पंतप्रधान मोदींचे टोकियोत भव्य स्वागत



■ टोकियो,ता.२९–

**पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवार जपान–चीन दोन देशांच्या चार दिवसीय दौऱ्यावर असून, ते सध्या जपानमध्ये पोहोचले आहेत.यावेळी भारतीयांनी त्यांचे उत्साहाने स्वागत केले आणि मोदींनीही त्यांना अभिवादन स्वीकारले.**

टोकियोमध्ये आगमन होताच पंतप्रधान मोदींनी एक्सवर लिहिले की, मी टोकियोमध्ये पोहोचलो आहे. भारत आणि जपान आपले विकासात्मक सहकार्य सातत्याने बळकट करत आहेत. या दौऱ्यात मला पंतप्रधान इशिबा आणि इतर नेत्यांशी भेटण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे विद्यमान भागीदारी अधिक दृढ होईल आणि सहकार्याचे नवीन मार्ग सापडतील. जपानमध्ये पोहोचताच पंतप्रधान मोदी यांनी भारतीय वंशाच्या लोकांशी भेट घेतली. भारतीयांनी त्यांचे उत्साहाने स्वागत केले आणि (पान २ वर)

## बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना हाकलत राहणार

### बीएसएफ प्रमुख चौधरी यांचे वक्तव्य

■ ढाका,ता.२९–

**भारत आणि बांगलादेश यांच्यात सध्या सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सीमा सुरक्षा दलांच्या प्रमुखांची द्वैवार्षिक महासंचालक स्तरावरील बैठक ढाका येथे संपन्न झाली. या बैठकीदरम्यान बीएसएफने स्पष्ट संदेश दिला की,आम्ही बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना परत पाठवत राहू. या चर्चेच्या केंद्रस्थानी बेकायदेशीर घुसखोरी, सीमावरील हिंसाचार आणि द्विपक्षीय सहकार्य बळकट करणे हे महत्त्वाचे मुद्दे होते.**



भारताने स्पष्ट केले की, तो केवळ बेकायदेशीर घुसखोरांनाच परत पाठवत आहे. भारतीय सीमा (पान २ वर)

(पान १ वरून)

## घुसखोरांना हाकलत राहणार

सुरक्षा दलाचे (बीएसएफ) महासंचालक दलजीत सिंग चौधरी यांनी बॉर्डर गार्ड बांगलादेशचे (बीजीबी) प्रमुख मेजर जनरल मोहम्मद अशरफुज्जमा सिद्दीकी यांच्यासोबत आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले की, भारताकडून बांगलादेशात परत पाठवले जाणारे लोक हे तेच आहेत जे बेकायदेशीर मार्गाने भारतात शिरले आहेत आणि त्यांना योग्य प्रक्रियेच्या अंतर्गतच परत पाठवले जात आहे. चौधरी यांनी माहिती दिली की, आत्तापर्यंत ५५० लोकांना बीजीबीकडे सुपूर्द करण्यात आले असून २,४०० प्रकरणांची पडताळणी भारतस्थित बांगलादेशी उच्चायोगाच्या मदतीने करण्यात आली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, दोन्ही देशांकडे कायदेशीर प्रत्यावर्तनासाठी एक स्थापित यंत्रणा आहे, जिच्या माध्यमातून अशा प्रकरणांचा निपटारा केला जातो. बीजीबी प्रमुख सिद्दीकी यांनी चर्चेदरम्यान सीमावरील मृत्यूंचा मुद्दा उपस्थित केला, विशेषतः एका बांगलादेशी मुलाला बीएसएफकडून गोळी लागल्याच्या कथित घटनेचा उल्लेख केला. यावर उत्तर देताना बीएसएफ प्रमुख म्हणाले, आमचे जवान जीवाला धोका निर्माण झाला, तरच शेवटच्या पर्याय म्हणून प्राणघातक शस्त्रांचा वापर करतात. त्यांनी सांगितले की, या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये धारदार शस्त्रांनी घुसखोरांकडून करण्यात आलेल्या हल्ल्यांमध्ये ३५ बीएसएफ जवान गंभीर जखमी झाले आहेत. बीएसएफने स्पष्ट केले की, आम्ही सर्वप्रथम इशारा देतो, मग घुसखोरांना अडवतो आणि अखेर अत्यावश्यक झाल्यासच गोळीबार करतो. बैठकीदरम्यान दोन्ही देशांनी सीमापार गुन्हेगारी, दहशतवाद आणि कट्टरपंथ रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची कटिबध्दता व्यक्त केली. चर्चेत एकमताने ठरवले गेले की,संयुक्त जनजागृती कार्यक्रम राबवले जातील. संवेदनशील सीमावर्ती भागांमध्ये सामाजिक-आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले जातील. स्थानिक लोकांमध्ये सीमा सुरक्षेबाबत जागरूकता वाढवली जाईल. आंतरराष्ट्रीय सीमांवरून गुन्हेगारांची हालचाल थांबवण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. तसेच, मुहुरिर चार सारख्या भागांमध्ये स्थायी सीमा खांब (बॉर्डर पिलर्स) उभारण्याची आणि सीमावर्ती नद्यांचे सीमांकन करण्याची गरज असल्यावरही दोन्ही देशांमध्ये सहमती झाली.

## टोकियोत भव्य स्वागत

मोदींनीही त्यांना अभिवादन स्वीकारले. परदेश दौऱ्यादरम्यान प्रवासी भारतीयांशी संवाद साधणे हे मोदींच्या राजनैतिक धोरणाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे, ज्यामुळे लोक-ते-लोक संबंध (पीपल-टू-पीपल कनेक्ट) अधिक मजबूत होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यात मुख्य लक्ष जपानसोबत व्यापार आणि गुंतवणूक संबंध वाढवण्यावर तसेच चीनसोबत संबंध सामान्य करण्याच्या प्रयत्नांवर असेल. ही यात्रा अशा काळात होत आहे जेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार व शुल्क धोरणांमुळे भारत-अमेरिका संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आहे.दौऱ्याला रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी विश्वास व्यक्त केला की, हा दौरा राष्ट्रीय हित आणि प्राधान्यक्रम पुढे नेईल.अहवालानुसार, मोदींनी रवाना होण्याआधी म्हटले होते की, मला विश्वास आहे की जपान आणि चीनच्या माझ्या भेटी आपल्या राष्ट्रीय हितसंपन्न आणि प्राधान्यक्रमांना पुढे नेतील आणि प्रादेशिक व जागतिक शांतता, सुरक्षा आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी उपयुक्त सहकार्य घडवून आणतील.मोदी आपल्या दोन दिवसीय जपान दौऱ्यात जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्यासोबत वार्षिक शिखर परिषद घेणार आहेत. या दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी होणाऱ्या चर्चेमध्ये जपानकडून भारतामधील गुंतवणुकीचा उद्दिष्ट दुप्पट करण्याचे वचन दिले जाऊ शकते आणि संरक्षण, तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे.

## दोन दरवाज्यातून विसर्ग

आहे. त्यामुळे धरणाच्या दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने यंदा तिसऱ्यांदा भोगावती नदीचे पाणी पात्राबाहेर पडले आहे. नदीच्या काठावरील शेतात पाणी पून्हा शिरल्याने पिकांचे मोठे नुकसान होणार आहे , त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

## मतदारांना आयोगाची नोटीस

(ईआरओ) या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. या मतदारांच्या दस्तावेजांची पडताळणी करताना काही विसंगती आढळून आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.या संशयित मतदारांची नावे १ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या मसुदा मतदार यादीत प्रकाशित करण्यात आली होती. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, जर हे मतदार भारतीय नागरिक असल्याचे योग्य कागदपत्र सादर करण्यात अयशस्वी झाले, तर त्यांची नावे ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळली जातील. निवडणूक आयोग या प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई करण्याचा विचार सुद्धा करत आहे.

## दरड कोसळून अकरा ठार

आहे. चंबा जिल्ह्यातील भरमौर भागात प्रसिद्ध मणिमहेश यात्रा सुरु आहे. गेल्या ४ दिवसांपासून मोबाईल नेटवर्क पूर्णपणे बंद असल्याने यात्रेकरूंचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क तुटला होता, ज्यामुळे चिंता वाढली होती. भूस्खलन आणि रस्ते बंद असल्याने अनेक यात्रेकरू भरमौरमध्ये अडकले आहेत. चंबा जिल्ह्यात आतापर्यंत ११ लोकांचा मृत्यू झाला आहे. परिस्थिती पाहता मणिमहेश यात्रेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

## खूनप्रकरणी तिघांना अटक

एकाच कारखान्यात कामास होते. संतोष पांडा हा सतत आपल्या सहकाऱ्यांच्या कामाबद्दल तक्रारी करत होता. तपस बेहरा याच्याबद्दलही संतोष याने तक्रार केली होती. त्यातूनच या सर्वांच्यात वाद झाला होता. रात्रीच्या सुमारास पुन्हा संतोष याच्याशी मनोज, तपस व सिबाराम यांच्यात श्री बालासा उद्योग समुहासमोरील रस्त्यावर जोरदार वाद झाला. त्यातून रागाच्या भरात तिघांनी लोखंडी ड्रॉपिंग स्पोर्टर व लाकडी दांडक्याने संतोष याच्या डोक्यात व तोंडावर मारहाण केली. त्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या संतोष याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी वसंत सावळेराम शेजवळ (वय ३८ सध्या रा.शहापूर मुळ रा.जांबरगाव जि.छत्रपती संभाजीनगर) यांनी शहापूर पोलिसात फिर्याद दिली आहे.

## उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा कहर

■ डेहराडून,ता.२९-

**उत्तराखंडमध्ये पुन्हा एकदा पावसाने रौद्र रूप धारण केले आहे. टिहरी जिल्ह्यातील गेंयाली भिलंगना येथे गुरुवारी रात्री ढगफुटीची घटना घडली आहे. प्राप्त माहितीनुसार, सध्या कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे नुकसान झाले आहे.**

राजस्व विभागाचे पथक घटनास्थळी रवाना झाले आहे. तसेच आरोग्य, वीज, जल संस्था, जल निगम, बांधकाम विभाग, वेपकोस व पशुवैद्यकीय पथकेही मदतीसाठी पाठवण्यात आली आहेत.मुसळधार पावसामुळे कालेश्वर येथे डोंगरावरून आलेला मलबा थेट घरांमध्ये घुसला आहे.

# जरांगेंचे आंदोलन सरकार पाडण्यासाठी रचलेला कट

### लक्ष्मण हाके : अजित पवार गटाचे आमदार,खासदारही आंदोलनात सामील

■ बीड,ता.२९-

**मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन हे मराठा आरक्षणासाठी नसून सरकार उलथवण्यासाठी रचलेला कट असल्याचा आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे.जरांगे यांच्या मागण्या मान्य झाल्या तर ओबीसी समाजाचे आरक्षण संपुष्टात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.ओबीसी समाजाला मूळतः राज्यकर्त्या जमातींपासून संरक्षण मिळावे म्हणून आरक्षण देण्यात आले होते. मात्र, आज ज्या समाजापासून ओबीसींना संरक्षणाची गरज आहे, तेच लोक ओबीसींच्या कळपात घुसण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका हाकेंनी केली.**

ते म्हणाले की, मी कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नाही असे स्पष्ट केले त्याचे मी स्वागत करतो.पण जर राज्यात ५९ लाख कुणबी प्रमाणपत्रे वाटली गेली असतील, तर ओबीसींच्या हक्कांवर गदा येणे निश्चित आहे.राज्यातील सुतार, कुंभार, नाभिक, मेंढपाळ, बंजारा समाज यांचे भवितव्य धोक्यात येणार आहे. ओबीसी समाज रस्त्यावर उतरत नाही, बोलत नाही म्हणून त्यांचे आरक्षण संपवायचे का? जर सरकारला झुंडशाही समजत असेल, तर आम्हालाही संघर्ष यात्रा आणि मोर्चे काढावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामागे राजकीय डाव असल्याचा दावा करत हाके म्हणाले की, जरांगे यांनीच उघड केले होते की, ते हे सरकार उलथवून टाकणार आहेत.प्रत्यक्षात विरोधी पक्ष सरकार बदलण्यासाठी प्रयत्न करत आहेच, पण त्यात अजित पवार गटातील आमदार-खासदारही सामील असल्याचे स्पष्ट झाले आहे.जरांगे यांच्या आडून राज्यातील सत्ताधारीच सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत. गरीब मराठा बांधवांच्या शिक्षण-नोकरीसाठी हा लढा नसून सरकार उलथवण्यासाठी रचलेला कट आहे, असा गंभीर आरोप हाकेंनी केला.

# मराठा मोर्चामुळे वाहतूक कोंडी;चाकरमान्यांचे हाल

■ मुंबई,ता.२९-

**मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी निघालेला महामोर्चा आज मुंबईत दाखल झाला आणि अवघ्या काही तासांत संपूर्ण शहर भगव्या लाटेत सामावून गेले.**

आझाद मैदानाची क्षमता संपली आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरपासून ते फोर्ट, कुलाबा, भायखळा, मानखुर्द, वडाळा, शिवडी, रे रोड, मझगाव अशा ठिकाणी आंदोलकांची गर्दी उसळली. परिणामी मुंबईच्या दक्षिण मध्य भागात भीषण वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे चाकरमान्यांचे हाल झाले. हजारो वाहने अडकल्यामुळे प्रवासी अनेक तास जागेवर अडकून पडले होते.सकाळी मनोज जरांगे पाटील उपोषणासाठी आझाद मैदानात पोहोचताच आंदोलकांचा ओघ वाढला आणि अवघ्या काही मिनिटांत मैदान तुडुंब भरून गेले. गर्दी मैदानाबाहेर सुद्धा उसळल्याने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसर ठप्प झाला होता.बेस्ट बस, टॅक्सी, खासगी गाड्या यांची प्रचंड कोंडी झाल्याने हजारो प्रवाशांचे वेळापत्रक बिघडले.

## मराठी माणूस मुंबईत येणार

(पान १ वरून)

दुसरे आहेत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतली होती. आतापर्यंत या लोकांना वापरून फेकून देण्यात आले. आता ही लोक मुंबईत आली असतील तर सरकारने तातडीने त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा जो काही न्याय हक्क आहे तो दिला पाहिजे, असेही ठाकरे म्हणाले.

मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.ते पुढे म्हणाले की, मराठ्यांना आतापर्यंत खूप वेळा फसवण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेण्यात आली. पण याच्यापुढे काही चित्र हलले नाही. त्यामुळे ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारने पुढाकार घेऊन त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. मराठी माणसं दंगल करायला नाही, तर न्याय हक्कासाठी आलेली आहेत. ज्यांनी आरक्षण देऊ असे म्हटले होते ते गावी पळाले आहेत. सरकारने हा प्रश्न हाताळला पाहिजे. मी जरी काही म्हटले, तरी माझ्या हातात काहीच नाही, कोण कोणाच्या खांद्यावर बंदूक घेऊन चालवत आहेत, हे देवेंद्र फडणवीस यांना विचारा, असे ठाकरे म्हणाले.

## डॉक्टर दाम्पत्याला ४२ लाखांचा गंडा

(पान १ वरून)

डॉ. महेश्वर शितोळे हॉस्पिटलमध्ये सहाय्यक असून त्यांची पत्नी डॉ. अक्षरा शितोळे या दंतवैद्यक असून राजारामपुरीत डेन्टल क्लिनिक चालवतात. तसेच डॉ. महेश्वर शितोळे हे वारणानगर येथे दमयंती हॉस्पिटलही चालवतात.

९ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजता डॉ. महेश्वर शितोळे यांना एक फोन आला. मी कुलाबा, मुंबईतून बोलतो आहे. तुमच्या मोबाईल नंबरचा वापर करून एका भामट्याने तुमच्या नावाने आधारकार्ड व बँक पासबुक तयार केले असून त्याचा उपयोग अतिरेकी संघटनांना पैसे पाठवण्यासाठी केला आहे, अशी भीती घातली. भविष्यात अडचणी टाळण्यासाठी नॅशनल सिक्युरिटी प्रोटोकॉल पाळावा लागेल, असे सांगून त्यांचा मोबाईल नंबर ब्लॉक करण्यात आला.

संदीप रॉय नावाचा अधिकारी हा डॉ. शितोळे यांना एकाच नंबरवरून व्हॉटस अँप कॉल करीत होता. यावरून तो आपल्या अंगावरील खाकी वर्दी, पोलीस ठाण्याची इमारत, सर्वोच्च न्यायालयाची अटकेची नोटीस दाखवत होता. तुमचे पैसे सुरक्षित आहेत. चौकशी संपल्यानंतर पैसे तुमच्या खात्यावर वर्ग केले जातील असा विश्वास देत असल्यानेच डॉ. शितोळे कुटुंबिय त्याच्या भूलथापांना फसले.

यानंतर व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलवर तोतयाने पोलिसांच्या वर्दीतला फोटो दाखवला. पुढे 'तपास पूर्ण होईपर्यंत तुमचे पैसे सुरक्षित ठेवले जातील' असा विश्वास देत त्याने डॉ. महेश्वर शितोळे यांच्याकडून सुरुवातीला २६ हजार, नंतर ३० हजार रुपये ऑनलाईन स्वीकारले. त्यानंतर डॉ. दत्तात्रय शितोळे यांनाही कॉल करून 'तुमच्या मुलाला अटक होईल' अशी भीती दाखवून ५ लाख ३५ हजार रुपये उकळले. त्याचबरोबर शेअर्स विक्री करण्यास भाग पाडत आणखी ३७ लाख रुपये आरटीजीएसद्वारे काढून घेतले. २८ ऑगस्ट रोजी आरोपींनी पुन्हा ४० लाख रुपयांची मागणी केली. यानंतर शितोळे परिवाराला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी राजारामपुरी पोलिसांत गुन्हा दाखल असून , सायबर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सतीश होगड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे.

# मराठा समाजाला न्याय देताना इतर समाजावर अन्याय करणार नाही-ना.शिंदे

■ ठाणे,ता.२९-

**कायद्याच्या चौकटीत मराठा समाजासाठी जे योग्य आहे, ते देण्याची सरकारची आजही तयारी आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ते ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.**



महायुतीने मराठा समाजाला दिलेले आरक्षण महाविकास आघाडी सरकार न्यायालयीन लढाईत अपयशी ठरले. त्यामुळे मराठा आरक्षणावर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही, अशी टीकाही शिंदे यांनी उबाठावर केली. मराठा आरक्षणाबाबतच्या बैठकांना गैरहजर राहणाऱ्यांनी दुटप्पीपणा सोडून स्पष्ट भूमिका घ्यावी. मराठा समाजाचे जेव्हा लाखोंचे मोर्चे निघाले तेव्हा सामना दैनिकातून या आंदोलनाची टिंगल टवाळी करण्यात आली. यावरुन मराठा समाजाबाबत तुम्हाला किती कळवळा आहे, हे दिसून आले अशी खरमरीत टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर केली.

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. आजही आरक्षणाचा लाभ मराठा समाजाला मिळत आहेत. कुणबी नोंदी शोधण्यासाठी

न्यायमूर्ती शिंदे यांची समिती गठीत केली ती आजही काम करत आहेत. सारथीच्या माध्यमातून मराठा विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो मराठा युवकांना उद्योजक बनवले. या योजनेतील कर्जाची मर्यादा १० लाखांवरुन १५ लाखांपर्यंत वाढवली. मराठा विद्यार्थ्यांना वस्तीगृह भत्ता देतोय, शासन म्हणून आम्ही केलेले प्रयत्न मराठा समाजासमोर आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

२०१६-१७मध्ये मराठा समजाला आरक्षण देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते, मात्र या विरोधात काही लोक सुप्रीम कोर्टात गेले होते. मात्र महाविकास आघाडी सरकार आणि उबाठा मराठा आरक्षण कोर्टात टिकवण्यास अपयशी ठरले, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. महायुती सरकार २०२२ मध्ये सत्तेत आले आणि आपल्याच मुख्यमंत्रीपदाच्या काळात मराठा समाजाला पुन्हा १० टक्के आरक्षण दिले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मराठा समाजासाठी जे जे आवश्यक होते ते सर्व सरकारने केले असून यापुढेही करत राहू, अशी ग्वाही दिली.

# आझाद मैदानावर भगवे वादळ

(पान १ वरून)

ते पुढे म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसी कोट्यातूनच आरक्षण मिळाले पाहिजे. आरक्षण मिळावे यासाठी सात वेळा आंदोलने केली आजचे आठवे आंदोलन असून यातून आरक्षणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत मुंबई सोडायची नाही असा ठाम निर्धार केला आहे. मला जेलमध्ये टाकले तरी मी उपोषण सोडणार नाही. सरकार आडमुठे वागले तर मी बघून घेईन. मुख्यमंत्र्यांनी आमच्या सगळ्या मागण्यांची पूर्तता करावी. उगाचच मराठ्यांची लाट तुमच्या अंगावर घेऊ नका. सरकार सहकार्य करीत नव्हते म्हणूनच गावागावातून कार्यकर्ते बाहेर पडले आहेत याचा विचार करा.

मनोज जरांगेंनी मैदानात पोहोचताच कार्यकर्त्यांना दिला सल्ला, ते म्हणाले कि, कोणीही जाळपोळ, दगडफेक करायची नाही, आंदोलनाला बट्टा लावायचा नाही, मी मरण पत्करायला तयार आहे, पण आता मागे हटायचं नाही. मराठ्यांना विजय मिळवून दिल्याशिवाय, डोक्यावर गुलाल पडल्याशिवाय इथून कुणी हलायचं नाही. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईची वाट धरली आणि आझाद मैदानावर दाखल होऊन उपोषणाला बसले. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलन सुरु केले आहे. जरांगेंसह मराठा कार्यकर्ते मोठ्या संख्येने मुंबईत पोहोचले आहेत. मनोज जरांगेंच्या आंदोलनासाठी आझाद मैदानात जय्यत तयारी करण्यात आली आहे. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# ठाकरे-पवारांनी समाजासमाजात भांडण लावू नये-मुख्यमंत्री

(पान १ वरून)

आंदोलनासाठी एक दिवसाची परवानगी मिळाली होती, मात्र जरांगे पाटील यांनी आणखी परवानगी मागितली आहे. या बाबत कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेतला जाईल. मोठ्या प्रमाणात लोक जमल्याने काही प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून अतिउत्साही लोकांच्या कृतीमुळे आंदोलनाला गालबोट लागू शकते, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांनी स्वतः आंदोलनकर्त्यांना लोकशाही विरोधी व आडमुठ्या पद्धतीने वागू नये असे आवाहन केले असल्याचेही फडणवीसांनी नमूद केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, कुठल्याही परिस्थितीत दोन समाज एकमेकांसमोर उभे राहू नयेत, हा सरकारचा ठाम प्रयत्न आहे. मागील दहा वर्षांत आमच्या सरकारच्या काळातच मराठा समाजाला न्याय मिळाला असून शिक्षण, रोजगार आणि उद्योगासाठी अनेक योजना राबवण्यात आल्या आहेत. मराठा आरक्षणाबाबत आमची भूमिका सकारात्मक आहे आणि संविधानिक चौकटीत राहून त्यावर मार्ग काढला जाईल. यासाठी सरकारने एक उच्चस्तरीय समिती नेमली असून या समितीला शासनाचे सर्व अधिकार देण्यात आले आहेत. समितीचा निर्णय हा मंत्रिमंडळाचा निर्णय मानला जाईल.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, शासनाची भूमिका सोयीस्कर नसून ठाम आहे. जे कायदेशीर आहे ते होईलच, पण विरोधकांनी ठाम भूमिका न घेता फक्त समाजात मतभेद निर्माण करून राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

आमचे सरकार मात्र कोणत्याही समाजाला नाराज न करता सर्वांच्या इच्छा आणि मागण्या समजून घेत आहे. चर्चेतून मार्ग निघेल आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच सर्व प्रश्न सोडवले जातील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

### मुख्यमंत्र्यांची विरोधकांवर जोरदार टीका

मुख्यमंत्री फडणवीसांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. त्यांनी म्हटले की, काही लोक जाणीवपूर्वक ओबीसी आणि मराठा समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न करत आहेत. सकाळपासून काही लोकांची विधाने ऐकली, त्यातून त्यांचा हेतू स्पष्ट दिसतो. समाजासमाजात दरी निर्माण करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न होत आहे, मात्र अशा प्रयत्नांमुळे उलट त्यांचेच तोंड भाजेल. ठाकरे-पवार यांच्या आघाडीतून असे डावपेच रचले जात असून त्यांचा उद्देश समाजात गोंधळ निर्माण करण्याचा आहे, असा आरोप फडणवीसांनी केला.

### पुतीन डिसेंबरमध्ये भारत दौऱ्यावर

नवी दिल्ली,ता.२९-

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आगामी डिसेंबर महिन्यात भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. क्रेमलिनच्या परराष्ट्र धोरण सल्लागार यूरी उशाकोव यांनी या दौऱ्याची अधिकृत घोषणा केली आहे. भारत आणि रशियामधील वार्षिक द्विपक्षीय शिखर परिषदेच्या निमित्ताने हा दौरा होणार असून दोन्ही देशांमधील रणनीतिक भागीदारीचा हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# मिरवणुकीत हल्ला करणारा संशयित जेरबंद

■ कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**राजारामपुरी येथे बुधवारी झालेल्या गणेश आगमन मिरवणुकीदरम्यान सराईत गुन्हेगार शुभम अजित हळदकर (वय २६,रा.दौलतनगर) याने आसू बादशहा शेख याच्यावर खंजीराने वार करून गंभीर जखमी केले होते. घटनेनंतर तो पसार झाला होता. दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने पाळत ठेवून शुक्रवारी सकाळी कंदलगाव-पाचगाव रस्त्यालगत त्याला अटक करण्यात यश मिळवले.**

शुभम हळदकर हा मोका खालील गुन्हेगार असून अलीकडेच तो जामिनावर कारागृहातून सुटला होता. पूर्ववैमनस्यातूनच त्याने मिरवणुकीच्या गर्दीत आसू शेखवर खंजीराने प्राणघातक हल्ला केला होता. गर्दीचा फायदा घेत तो घटनास्थळावरून फरार झाला होता.

घटनेनंतर पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संतोष गळवे यांच्या पथकाला शोधमोहीमेची जबाबदारी देण्यात आली होती. या पथकातील अंमलदार वैभव पाटील यांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, शुभम हळदकर कंदलगाव परिसरात येणार आहे. त्यानुसार पथकाने पाळत ठेवून सापळा रचत त्याला जेरबंद केले.चौकशीत हळदकरने पूर्ववैमनस्यातून हल्ला केल्याची कबुली दिली आहे. त्याला पुढील तपासासाठी राजारामपुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईत संतोष बरगे, विशाल खराडे, शिवानंद मठपती, प्रदीप पाटील, गजानान गुरव व योगेश गोसावी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# सरकारला आरक्षणाच्या नावाखाली भांडणे लावायची आहेत-सपकाळ

■ मुंबई,ता.२९-

**भाजपा सरकारला आरक्षणाच्या नावाखाली मराठा व ओबीसी समाजात भांडणे लावायची आहेत, असे स्पष्ट मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.**

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस नेते कोल्हापूरचे खा. श्री. शाहू महाराज छत्रपती व खा. डॉ. कल्याण काळे यांनी टिळक भवन येथे पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षण आंदोलनाबाबत काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा मराठा समाजाने तीन महिन्यापूर्वी केली होती पण सरकारने या तीन महिन्यात काहीच हालचाल केली नाही. आता मात्र मराठा समाजाची अडवणूक केली जात आहे, आधी परवानगी दिली नाही नंतर एका दिवसाची परवानगी दिली. मुंबईत वाहतूक व्यवस्थेसह परिस्थिती बिघडल्याचे सांगितले जात आहे पण मुंबईतील आजच्या परिस्थितीस भाजपा सरकारच जबाबदार आहे. तीन महिने सरकार झोपले होते काय? मुंबईतील परिस्थितीसाठी मराठा आंदोलकांना बदनाम करू नका, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

मराठा आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते आणि तीच भाजपा व देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. हा आजचा प्रश्न नसून अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे, असे सपकाळ म्हणाले.


### खा. मोईत्रा यांच्या विरोधात तक्रार

■ कोलकाता,ता.२९-

**तृणमूल काँग्रेसच्या लोकसभा खासदार महुआ मोईत्रा यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात घुसखोरीच्या मुद्द्यावर केलेल्या तीव्र आणि वादग्रस्त विधानामुळे राजकीय वातावरण तापले आहे. त्यांच्या या वक्तव्यावर भाजपने तीव्र प्रतिक्रिया देत पोलिसात तक्रार दाखल केली आहे.**

महुआ मोईत्रा यांनी बांगलादेशातून होणारी घुसखोरी थांबवण्यात केंद्र सरकार, विशेषतः गृहमंत्रालय अपयशी ठरल्याचा आरोप करत, अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||




**श्रीमती सोनाबाई शंकर तुरंबेकर**
यांचे शुक्रवार,दि. २९/८/२०२५ रोजी वयाच्या ९७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

वसंत तुरंबेकर * मुकुंद तुरंबेकर
गोविंद तुरंबेकर * बबन तुरंबेकर
उत्तम तुरंबेकर * अजित तुरंबेकर
समस्त तुरंबेकर परिवार, इचल.

रक्षाविसर्जन : रविवार,दि.३१/८/२०२५ रोजी सकाळी ८ वा. पंचगंगा नदीशी आहे.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



**सौ. संगिता नामदेव पाटील**
आमचे परममित्र श्री. नामदेव नारायण पाटील यांच्या सुविद्य पत्नी सौ. संगीता नामदेव पाटील यांचे गुरूवार,दि.२८/८/२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

बाळासो मुजावर
इलाई मुजावर
इचलकरंजी.

रक्षाविसर्जन : आज शनिवार, दि.३०/८/२५ रोजी सकाळी ९ वा. त्यांच्या गावी गजरगांव तालुका आजरा येथे.

# डीजेच्या दणदणाटामुळे मंडळाच्या कार्यकर्त्याचा मृत्यू

मिरज,ता.२९(प्रतिनिधी)–

**गणेश आगमन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट सुरू असताना एका मंडळाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्याचा हृदयविकारामुळे मृत्यू झाला. मिरवणूक मार्गावर मार्केटच्या प्रमुख चौकात मिरवणुकी दरम्यान घडलेल्या या घटनेमुळे खळबळ उडाली. सदर मंडळाच्या मयत सदस्यास पूर्वीपासूनच हृदयविकाराचा त्रास होता अशी माहिती समोर आली आहे. डीजेच्या दणदणाटामुळे सदरच्या कार्यकर्त्याचा मृत्यू झाला असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

शहरातील सजग नागरिकांकडून डीजेचा वापर रोखण्याबाबत पोलीस व प्रशासनाकडे मागणी करण्यात येत आहे. या घटनेनंतर नागरिकांच्या एका शिष्टमंडळाने शहर पोलिसांची भेट घेऊन चर्चा केली. बाबासाहेब कलगुटगी (वय ५०) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते वडर गल्ली येथील रहिवासी असून येथील गणेशोत्सव मंडळाने गणेश आगमनाची मिरवणूक काढली होती. शहरातील अनेक मंडळांनी डीजेसह मिरवणुका काढल्या होत्या. या सर्व मिरवणुका प्रमुख मार्गावरून मार्केट परिसरातून जात होत्या. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास कलगुटगी यांच्या मंडळाचीही मिरवणूक मार्केट परिसरात आली होती. यावेळी ते ट्रॅक्टरवर पुढील बाजूस बसले होते. ते मोबाईलवर मिरवणुकीचे चित्रण करत असतानाच अचानक कोसळले. ते खाली कोसळल्यानंतर कार्यकर्त्यांनी धाव घेऊन त्यांना रुग्णालयात नेले. मात्र त्यांचा मृत्यू झाला होता. कलगुटगी यांना पूर्वीपासूनच हृदयविकाराचा त्रास होता अशीही माहिती मिळत आहे.

गणेशोत्सवामध्ये अनेक मंडळाकडून ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या डीजेचा वापर करण्यात येतो. अशा डीजेचा वापर न करण्याबाबत पोलीस व प्रशासनाकडून मागील महिनाभरापासून प्रबोधन कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. मात्र तरीही अनेक मंडळांकडून गणेश आगमन मिरवणुकीत डीजेचा वापर करण्यात आला. डीजेचा वापर रोखण्याची शहरातील अनेक सजग नागरिकांची मागणी आहे. डीजेच्या दणदणाटामुळे ही घटना घडल्याचे वृत्त शहरात पसरल्यानंतर नागरिकांच्या शिष्टमंडळाने मिरज शहर पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांची भेट घेतली. यामध्ये विराज कोकणे, अॅड.सी. जी. कुलकर्णी, मोहन वाटवे, भिमराव धुळबुळू, राकेश तामगावे, नरेश सातपुते, प्रकाश पवार, सव्वाशे, प्रशांत गोखले यांच्यासह नागरिकांचा समावेश होता.

# कारदगा बंधारा पाण्याखाली

कारदगा,ता.२९(प्रतिनिधी)–

**परिसरात पावसाचा जोर नाही पण तळकोकणात सुरु असलेल्या पावसामुळे दूधगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाल्याने कारदगा बंधारा वजा पूल शुक्रवारी नवव्यांदा पाण्याखाली गेल्याने संपूर्ण वाहतूक कोलमडून पुन्हा जनजीवन विस्कळीत झाले आहे.**

पावसाचा जोर ओसरल्याने कारदगा -खडकोळ बंधारा बुधवारी खुला झाला होता.पण पावसाने पुन्हा सुरुवात केल्याने व तळकोकणात पावसाचा जोर आणि दूधगंगा धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या पावसामुळे दुधगंगा नदीच्या पातळी झपाट्याने वाढून कारदगा - भोज मार्गावरील कारदगा बंधारा शुक्रवारी सकाळी पाण्याखाली गेला. त्यामुळे बंधाऱ्यावरून वाहतूक बंद झाली आहे. दोनच दिवस वाहतूक सुरु होती. कमी उंचीमुळे बंधारा वारंवार पाण्याखाली जात असल्यामुळे नागरिकांची गैरसोय निर्माण झाली आहे.दुसऱ्या पर्यायी रस्त्याने वाहतूक सुरु आहे.

# इचलकरंजीत मराठा समाजाच्यावतीने निदर्शने

इचलकरंजी,ता.२९–

**मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळण्यासाठी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे–पाटील यांनी मुंबई येथे सुरु केलेल्या आर या पार लढाईला पाठींबा दर्शवत इचलकरंजी शहर आणि परिसरातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने येथील शिवतीर्थ परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली.**



दरम्यान, आंदोलनास पाठींबा दर्शवत हातकणंगले तालुक्यातून मराठा समाज बांधवांनी शक्य तितक्या मोठ्या संख्येने मुंबईकडे मार्गस्थ व्हावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. मराठा समाजाचे नेते जरांगे–पाटील यांनी मुंबई येथे मराठा समाजाला आरक्षण मागणीसाठी आर या पार ची लढाई सुरु केली आहे. या लढ्याला हातकणंगले तालुक्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. इचलकरंजीतही शुक्रवारी सकाळी सकल मराठा समाजबांधव एकत्र आले व त्यांनी शिवतीर्थ परिसर घोषणांनी दणाणून सोडला. आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही, कॅग–जितेंगे, हम सब जरांगे अशा घोषणा यावेळी देण्यात येत होत्या. सुमारे अर्धातास सुरु असलेल्या या आंदोलनामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुक विस्कळीत झाली होती. आंदोलनस्थळी शिवाजीनगर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. या आंदोलनात सकल मराठा समाजबांधव सहभागी झाले होते.

# मोबाईल दुकान फोडून दीड लाखाचा मुद्देमाल लंपास

सांगोला,ता.२९ (प्रतिनिधी) –

**शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील मोबाईल दुकानावरील पत्रा उचकटून,अज्ञात चोरट्याने सुमारे १ लाख ५९ हजार ४८९ रुपये किंमतीचे ११ मोबाईल चोरून नल्याची घटना घडली.**

याप्रकरणी विजय कुंडलीक राऊत (रा. राऊत मळा, सांगोला) यांनी सांगोला पोलिसात फिर्याद दिली आहे. विजय राऊत यांचे सांगोला शहरातील रेल्वे स्टेशन रोडवर द मोबाईल स्पेस दुकान आहे.२८ रोजी ते रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास दुकान बंद करून घरी गेले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी २९ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास दुकानाकडे गेले असता, दुकानावरील पत्रा उचकटुन तसेच दुकानामधील पी.ओ.पी. तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून मोबाईल चोरून नेले असल्याचे निदर्शनास आले.

# विहिरीत पडल्याने एकाचा मृत्यू

निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)–

**कुर्ली (ता.निपाणी) येथे विहिरीत पडल्याने एकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली.प्रदीप काशिनाथ कांबळे (वय४०) असे मृताचे नाव आहे.घटनेची नोंद ग्रामीण पोलिसात झाली आहे.**

प्रदीप कांबळे यांना दारूचे व्यसन जडले होते.दरम्यान २६ रोजी सकाळी ते घरातून बाहेर निघून गेले. गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास शंकर शिंगे यांच्या विहिरीत पाण्यावर मृतदेह तरंगताना दिसून आला.याची माहिती पोलिसांनी देण्यात आली.याबाबत प्रदीप यांच्या पत्नी सुषमा कांबळे यांनी फिर्याद दिली आहे.

# बस स्थानकावर दागिने चोरणाऱ्या दोन महिलांना अटक

सांगली,ता.२९(प्रतिनिधी)–

**शहरातील मुख्य बस स्थानकावर गर्दीचा फायदा घेऊन महिलांचे दागिने चोरणाऱ्या दोन महिलांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चोरीचे १ लाख २८ हजार रुपये किमतीचे दागिने जप्त करण्यात आले. वनिता दिलीप लोंढे (वय ४२,रा.गैंगवाडी,ता. बैलहोंगल, जि. बेळगाव, कर्नाटक), गंगा सुरेश शिंदे, (वय ३५, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, सांगली) अशी अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत.**

सांगली बसस्थानकावर अर्चना हनमाने यांच्या बॅगेतून दागिने चोरीला गेले होते. याबाबत सांगली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. यातील चोरट्याना पकडण्यासाठी निरीक्षक शिंदे यांनी उपनिरीक्षक कुमार पाटील यांचे पथक तयार केले होते. पथकातील अभिजित माळकर यांना बस स्थानकावर दागिने चोरणाऱ्या महिला त्रिकोणी बागेजवळ चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली.पथकाने तेथे सापळा रचला.माहितीप्रमाणे दोन महिला तेथे आल्यावर त्यांना ताब्यात घेतले.त्यांच्याकडील पिशवीची तपासणी केल्यावर त्यात दागिने सापडले.त्याबाबत कसून चौकशी केल्यावर त्यांनी सांगली बस स्थानकावर गर्दीचा फायदा घेत महिलेच्या बॅगेतील दागिने चोरल्याची कबुली दिली.























संपादकीय

# पुराचे थैमान!

जम्मू-काश्मीरसह उत्तर भारतात गत दोन-तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने अनेक जिल्ह्यांमधील स्थिती बिघडली आहे. कटरा येथील वैष्णोदेवी यात्रा मार्गावर बुधवारी दरड कोसळली. त्या दुर्घटनेत ३४ जणांचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत. जम्मू-काश्मीर व पंजाबमध्ये सलग पावसामुळे नद्या तुडुंब भरल्या असून धरणांतून पाणी सोडल्याने बुधवारी पठाणकोट, गुरदासपूर, तरनतारण, होशियारपूर, कपूरथला, फिरोजपूर आणि फाजिल्का येथे पूरस्थिती निर्माण झाली. गुरदासपूरच्या दबुरी येथील नवोदय विद्यालयात ४०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक पुरात अडकले शाळेच्या तळमजल्यावर ५ फूट पाणी साचले असून विद्यार्थ्यांना पहिल्या मजल्यावर हलवण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ आणि लष्कराच्या पथकांना पाचारण करण्यात आले आहे. राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्व शाळा ३० ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रावी नदीला आलेल्या पुरामुळे करतारपूर साहिब कॉरिडॉरमध्ये ७ फुटापर्यंत पाणी साचले आहे त्यामुळे पाकिस्तानमधील श्री करतारपूर साहिब गुरुद्वाराही पाण्यात बुडाला आहे. करतारपूर कॉरिडॉर हा ४.७ कि. मी.चा रस्ता आहे. तो भारतातील डेराबाबा नानकला थेट पाकिस्तानातील करतारपूर साहिब गुरुद्वाराशी जोडतो. जम्मू आणि काश्मीरमध्ये गत दोन दिवसांत मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे विविध घटनांतील मृतांची संख्या ४१ वर पोहोचली आहे. मुसळधार पावसामुळे झेलम नदीला पूर येऊन अनंतनाग व श्रीनगरमध्ये अनेक निवासी भागात पाणी शिरले. प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याच्या सूचना केल्या आहेत. जम्मूमध्ये २ दिवसांत विक्रमी ३८० मि. मी. पावसाची नोंद झाली. १९१० मध्ये वेधशाळा स्थापन झाल्यापासून २४ तासांच्या कालावधीत झालेली ही सर्वाधिक नोंद आहे. बुधवारपर्यंत जम्मूतील उधमपूर जिल्ह्यात ६२९.४ मि. मी. पावसाची नोंद झाली. या पूर्वी जुलै २०१९ मध्ये तेथे ३४२ मि. मी. पाऊस झाला होता. पुरामुळे ऑप्टिकल फायबरचे मोठे नुकसान झाल्यानंतर बुधवारी जम्मू आणि काश्मीरमधील सर्व फोन आणि इंटरनेट सेवा पूर्ववत करण्यात आल्या. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पूरग्रस्त भागाला भेट देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी जम्मूतील मुसळधार पाऊस आणि पुरामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची पंतप्रधान मोदींना माहिती दिली आणि मदतीच्या आश्वासनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उत्तरेकडील राज्यांमध्ये सततच्या पावसामुळे प्रमुख धरणांमधून अतिरिक्त पाणी सोडले जात आहे त्यामुळे जम्मूतील तावी नदीला पूर येण्याची शक्यता असून भारताने पाकिस्तानला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. परराष्ट्र मंत्रालयामार्फत मानवतावादी दृष्टिकोनातून हा इशारा देण्यात आला आहे. जम्मू-काश्मीर पाठोपाठ हिमाचल प्रदेश व पंजाबमध्ये मुसळधार पावसाने हाहाकार उडवला आहे. तावी नदी हिमालयात उगम पावून जम्मू क्षेत्रातून जात पाकिस्तानात चिनाब नदीला सामील होते. सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे अनेक धरणांचे दरवाजे उघडावे लागल्याने जलपातळी वाढली आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यान १९६० साली जागतिक बँकेच्या मध्यस्थीने सिंधूजल करार झाला होता. या कराराच्या अंतर्गत दोन्ही देशांकडून जलस्रोत आणि नद्यांशी निगडित आकडेवारी परस्परांना पुरविली जात होती; परंतु यंदा २२ एप्रिल रोजी जम्मू-व -काश्मीरच्या पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने नियमित हायड्रोलॉजिकल डाटाचे आदान-प्रदान रोखले होते तरीही भारताने माणुसकी दाखवत पुरासंबंधी अलर्ट जारी करत पाकिस्तानातील जीवितहानी आणि आर्थिकहानी रोखण्यासाठी त्यांना सतर्क केले आहे. हा अलर्ट पाकिस्तानला केवळ मानवीय दृष्टिकोनातून देण्यात आला आहे. पूरस्थितीत सीमापारदेखील गंभीर नुकसान होऊ शकते त्यामुळे वेळीच अलर्ट करणे आवश्यक होते. आणखी काही दिवस पाऊस सुरूच राहिल्यास स्थिती आणखी बिघडू शकते. जम्मू-काश्मीरमध्ये अतिवृष्टी आणि पूर यांचा कहर झाला आहे. महाराष्ट्रात २७ ऑगस्टला गणरायाचे आगमन झाले. गणराज येताना पाऊसही घेऊन येतात हा आजवरचा शिरस्ता आहे. यंदा २७ ऑगस्टलाही तो पाळण्यात आला. सध्याचा पाऊस हा नियमित पाऊस असून परतीच्या पावसाला १ सप्टेंबरपासून सुरुवात होईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला येणारा परतीचा पाऊस हा ऑक्टोबरपर्यंत राहण्याची शक्यता आहे म्हणजे यंदा परतीच्या पावसाचेही दिवस वाढण्याची शक्यता आहे. याचा मोठा लाभ रब्बी पिकांना होण्याची शक्यता असून यंदा ज्वारीसाठी पोषक वातावरण राहण्याची शक्यता आहे.

# ऑनलाईन बेटिंगची मगरमिठी

**अलीकडच्या काळात भारतात मोबाईल इंटरनेटचा प्रसार, डिजिटल पेमेंटची सोय आणि मनोरंजनाच्या नव्या माध्यमांचा उदय यामुळे ऑनलाईन बेटिंग अॅप्सचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. हे अॅप्स प्रामुख्याने क्रिकेट, फुटबॉल, टेनिस अशा क्रीडा प्रकारांवर पैज लावण्याची संधी देतात. याशिवाय काही अॅप्समध्ये कसिनो गेम्स, पत्त्यांचे खेळ किंवा स्लॉट मशीन प्रकारचे जुगारही उपलब्ध असतात.**

'कमी पैशांत मोठा नफा' या लालसेवर आधारित या अॅप्सचे जाळे इतके वेगाने पसरत आहे की त्याचे व्यसन अनेक तरुणांना, अगदी किशोरवयीन मुलांनाही, आहारी नेत आहे. या व्यसनाची मुळे मानसशास्त्रीय आणि आर्थिक अशा दोन्ही पातळ्यांवर शोधली जाऊ शकतात. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ऑनलाईन बेटिंगमध्ये अनिश्चित बक्षिस हा घटक फार महत्त्वाचा ठरतो. खेळाडूला कधी जिंकणार आणि किती जिंकणार हे निश्चित नसते. पण जेव्हा एखादा वेळेस जिंकतो, तेव्हा मिळणारा आनंद आणि उत्साह हा इतका तीव्र असतो की तो अनुभव पुन्हा मिळवण्याची तीव्र इच्छा मनात निर्माण होते. हेच पुन्हा-पुन्हा घडून शेवटी ते सवयीच्या पलिकडे जाऊन व्यसनात परिवर्तित होते. आर्थिक बाजूने पाहिले तर भारतात बेरोजगारी, अस्थिर नोकरी, कमी पगार, ग्रामीण भागातील मर्यादित उत्पन्नाचे स्रोत या सर्व घटकांमुळे लोकांना जलद पैसा कमवण्याची लालसा जास्त भासते. ऑनलाईन बेटिंग अॅप्स ही लालसा भांडवलशाहीच्या नव्या तंत्रांनी खेळवतात. रंगीत ग्राफिक्स, जलद पेमेंट, साइनअप बोनस, रेफरल कॅश आणि २४ बाय ७ उपलब्ध असणारे प्लॅटफॉर्म्स हे सर्व मिळून वापरकर्त्याला सतत सक्रिय ठेवतात. याचा परिणाम वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर जाणवू लागला आहे. अनेक वेळा बेटिंगच्या व्यसनामुळे कुटुंबात आर्थिक संकट, कर्जबाजारीपणा, घरगुती कलह, मानसिक तणाव आणि नैराश्य निर्माण होत आहे. खरे पाहता भारतामध्ये ऑनलाइन



गेमिंगच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर बेटिंग आणि जुगाराच्या रॅकेटबाबत सतत इशारे देण्यात येत आहेत. तरीही अनेक तरुण या सापळ्यात अडकत आहेत. मोबाईलवर सहज डाउनलोड होणारे आणि खेळण्यासाठी आकर्षक बनवलेले अॅप्स, प्रत्यक्षात पैसे लावून जुगार खेळायला लावतात. या खेळांमध्ये सुरुवातीला मोफत पॉईंट्स देऊन खेळायला लावले जाते. जिंकण्याची सवय झाल्यावर हळूहळू खऱ्या पैशाने खेळायला प्रवृत्त केले जाते. एकदा पैसे लावण्याची सवय लागली की, हळूहळू मोठे दांव लावण्यास भाग पाडले जाते. शेवटी खेळाडू पैसे गमावतो आणि कर्जात बुडतो. यामध्ये अनेकदा नेपाळ आणि दुबईमध्ये बसलेले हॅकर्स सहभागी असतात. ते भारतातील तरुणांना सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा थेट मेसेज पाठवून 'अर्न मनी फ्रॉम गेम्स' सारख्या प्रलोभनांनी फसवतात. कोरोना लॉकडाऊन दरम्यान तरुणांकडे घरबसल्या वेळ होता. या काळात बेटिंग अॅप्सचा प्रसार झपाट्याने वाढला. अनेकांनी नोकरी गमावल्याने पैशासाठी या खेळांचा मार्ग स्वीकारला. सांख्यिकीय माहितीप्रमाणे भारतात ऑनलाइन बेटिंगद्वारे दरवर्षी सुमारे १०० अब्ज डॉलरहून अधिक रकमेची उलाढाल होते. भारतात यातील मोठा भाग परदेशात पाठवला जातो. भारतात सुमारे २२ कोटी लोक बेटिंग अॅप्सचा वापर करतात. मध्यंतरी बंदी घालण्यात आलेल्या महादेव बेटिंग अॅपची उलाढाल तब्बल ४० हजार कोटींहून अधिक होती आणि रोजची कमाई २०० कोटी! फेयरप्ले बेटिंग अॅप, प्रोबो अॅप, रेड्डी अन्ना बेटिंग अॅप यांसारख्या अॅप्सनी हजारो कोटींचा चुना आजवर अनेकांना लावला आहे. भारतातील काही राज्यांनी ऑनलाईन जुगार व बेटिंगला बंदी घातली असली तरी इंटरनेटच्या सीमाहीन स्वरूपामुळे ही अंमलबजावणी फारशी प्रभावी ठरत नाही. तेलंगणामध्ये दाखल करण्यात आलेल्या एका जनहित याचिकेनुसार, ऑनलाईन सट्टेबाजीमध्ये पैसे गमावल्याने १०२३ हून अधिक जणांनी आत्महत्या केली आहे. यामध्ये विद्यार्थी, गृहिणी, बेरोजगार तरुण आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांचा समावेश होता. कायदेशीर दृष्टिकोनातून समस्या अशी आहे की भारतात जुगार आणि कौशल्याधारित खेळ यातील फरकावर आधारित कायदे आहेत. अनेक ऑनलाईन बेटिंग कंपन्या त्यांच्या उत्पादनाला कौशल्याधारित म्हणून दर्शवतात, ज्यामुळे त्यांच्यावर बंदी घालणे कठीण होते. याशिवाय, परदेशी सर्व्हरवर चालणारी अनेक अॅप्स भारतीय कायद्यांच्या कक्षेबाहेर राहतात. या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी फक्त कायदे पुरेसे नाहीत. त्यासोबत जनजागृती मोहिमा, शालेय व महाविद्यालयीन स्तरावर डिजिटल साक्षरतेचे धडे, कुटुंबीयांची आर्थिक जागरूकता आणि मानसिक आरोग्याविषयीची चर्चा आवश्यक आहे. माध्यमांनीही बेटिंग अॅप्सच्या जाहिरातींना प्रोत्साहन देणे थांबवणे गरजेचे आहे.

दैनंदिनी

# साथीचे आजार टाळण्यासाठी खबरदारी गरजेची

## डेंग्यू,मलेरिया,चिकन गुनियासारख्या साथीच्या आजारांनी नागरिक हैराण



**राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात एन्फ्लुएंजा आजाराचे ( फ्लू ) ६६३ रुग्ण आढळले आहेत यापैकी १४ रुग्ण मागील दीड महिन्यात आढळले असून तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अर्थात ही सरकारी आकडेवारी आहे.**

रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे. केवळ फ्लू आजारानेच नव्हे तर डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहेत. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण आढळत आहे. नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहेत. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. पाच वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता.

कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकादायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही.

त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी.

आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, आराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

■ **श्याम ठाणेदार**





# यजमानपद मिळणे ही गौरवाची बाब!

प्रतिष्ठेच्या फिडे बुद्धिबळ विश्वचषक २०२५ चे यजमानपद भारताला मिळाले आहे. ही नक्कीच गौरवाची बाब आहे. भारतातील गोवा येथे ३० ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीमध्ये या स्पर्धेचे आयोजन होणार आहे. यजमानपद भारताला मिळाल्यामुळे नक्कीच आनंद झाला आहे. आपल्या बुद्धिबळपटूंनी नेहमीच चांगली कामगिरी केलेली आहे. नुकतेच महाराष्ट्रातील नागपूरच्या दिव्या देशमुखने महिला विश्वचषक जिंकल्याने आता सर्वांचेच लक्ष फिडे वर्ल्ड कप २०२५ कडे लागले आहे.

भारतात बुद्धिबळ खेळाची प्रचंड लोकप्रियता वाढत आहे. नुकतेच जागतिक बुद्धिबळ संघटनेने अधिकृतरित्या फिडे वर्ल्ड कप २०२५ गोवा येथे होणार असल्याचे जाहिर केले आहे. यात २०८ खेळाडू सहभागी होणार असून ९०पेक्षा अधिक देशातील बुद्धिबळपटू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून २०२६च्या कॅंडिडेट्स टुर्नामेंटसाठी तीन बुद्धिबळपटूंना आपले स्थान निश्चित करता येणार आहे. भारतीय बुद्धिबळ खेळाडूंसाठी देखील ही नामी संधी असणार आहे. या स्पर्धेतील प्रत्येक फेरी ही नॉकआउट असणार आहे. फिडेचे अध्यक्ष आर्कडी इलोकोविच यांनी भारत देशात बुद्धिबळपटू व उत्साही चाहते असल्याने बुद्धिबळ क्षेत्रात भारत एक मुख्य राष्ट्र बनले आहे. जॉर्जिया येथील फिडे महिला विश्व करंडकानंतर फिडे वर्ल्ड कप भारतातील गोव्यात आयोजीत होणार असल्याचा आनंद व्यक्त केला आहे.

नक्कीच फिडे वर्ल्ड कप२०२५ बुद्धिबळपटूंसाठी पर्वणीच असणार आहे. गोवा येथे सामने होणार असल्याने संपूर्ण देशासह साऱ्या जगाचे या स्पर्धेकडे लक्ष असणार आहे. त्यामुळे भारताला हे यजमानपद मिळणे ही गौरवाची बाब आहे. ■ **संतोष शिंदे**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार ता.३०.८.२०२५**, विक्रमसंवत २०८१, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे, वर्षा ऋतो, भाद्रपद मासे, शुक्लपक्षे, सप्तमी तिथी, २२.४७ नंतर अष्टमी तिथी, विशाखा नक्षत्र, १४.३७ नंतर अनुराधा नक्षत्र, तुला रास, ७.५३ नंतर वृश्चिक रास, ऐंद्र योग, १५.०९ नंतर वैधृति योग, गरज करण, ९.३६ नंतर वणिज करण २२.४७ पर्यंत, दिनमान १२.२२, सुर्योदय ६.२२, सुर्यास्त १८.४४ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी९ ते १०.३०, मुक्ताभरण व्रत, रवि पूर्वा नक्षत्रात २१.४५वा. वाहन म्हैस, भद्रा, २२.४७ नंतर, बुध सिंह राशीत, १६.४५ वाजता.

ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९

## ※ राशीभविष्य

**मेष**-शारीरीकदृष्ट्या सक्षम असाल. नवीन योजना राबविण्यात यश येईल. वेळेचा सदुपयोग करा. महत्त्वाच्या कामात मोठे यश मिळेल. कामाचे कौतुक होईल.

**वृषभ**-कामात उत्साह राहील. प्रत्येक संधीचा योग्य फायदा घेवू शकाल. तुमच्या कामामुळे लोकांच्या नजरेत चांगली प्रतिमा बनवू शकता. लोकांचा मान-सन्मान राखाल.

**मिथून**-महत्वाच्या कामात अडथळा येणार नाही. संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. गुंतवणूक करताना नीट विचार करा. आज आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कर्क**-जवळच्या व्यक्तींमुळे व्यापारात उत्तम प्रगती करू शकाल. आरोग्य चांगले राहील. आज कामात व्यस्त राहाल. मुलांसोबत चांगला वेळ जाईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**सिंह**-चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक हाताळा. प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आज चांगला दिवस आहे. समारंभाला जाऊ शकता.

**कन्या**-कामाच्या ताणामुळे थकवा येईल. व्यवसाय-धंद्यात बरकती येईल. धनलाभ होण्याची शक्यता आहे. कला क्षेत्रात नावलौकिक वाढेल. भावंडांशी नातेसंबंध सुधारतील.

**तुळ**-आर्थिक नियोजन व्यवस्थित करण्यासाठी दिवस चांगला आहे. शारिरीक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहील. दृढ विचारांमुळे हाती घेतलेली कामे पूर्ण होतील.

**वृश्चिक**-जमिनीसंदर्भातील व्यवहार पार पडतील. कायदेशीर कामात यश मिळेल. तुमच्या बोलण्यामुळे इतरांची मने जिंकून घ्याल. आर्थिक बाबींमध्ये सावधानता बाळगा.

**धनु**-आर्थिक दृष्ट्या लाभदायक दिवस आहे. उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. मित्रांसोबत फिरायला जाऊ शकता. आज वातावरण आनंदी राहील.

**मकर**-मित्र व संबंधीतांकडून लाभ होण्याची शक्यता आहे. व्यावसायिक कामात यश मिळण्याची शक्यता आहे. सरकारी कामात धावपळ होईल. मुलांची प्रगती होईल.

**कुंभ**-मानसिक स्वास्थ्य चांगले राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. मित्रांसोबत मौज मस्ती कराल. वाद-विवाद टाळा. नातेवाईकांकडून चांगली बातमी मिळेल.

**मीन**-धनलाभ होण्याची शक्यता आहे. खर्चावर नियंत्रण ठेवा. नव्या कामांना सुरूवात करू शकता. संततीच्या आरोग्याची विशेष काळजी घ्याल. मान-सन्मान मिळेल.


## वाचकांचा पत्रव्यवहार

# मंदिरातील राजकीय कार्यक्रमांना अनुमती देवू नये

मंदिरांचे सरकारीकरण मुक्त होणे अत्यंत गरजेचे आहे. या संदर्भात नुकताच केरळमधील उच्च न्यायालयाने मंदिर परिसरात राजकीय कार्यक्रमांना अनुमती देऊ नये असे निर्देश दिले आहे. अन्य धर्मीयांच्या प्रार्थना स्थळांमध्ये राजकीय पक्षाच्या प्रसाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे कधीही ऐकिवात नाही. मंदिरे सध्या स्वार्थी राजकारण्यांच्या कह्यात आहे म्हणून राजकीय पक्षांच्या कार्यक्रमाला अनुमती दिली जाते. भक्त फक्त तेथे दर्शन व अर्पण करण्यापुरतेच सीमित राहिले आहेत. मोगलांनी मंदिरांवर आक्रमणे करून त्यांची तोडफोड आणि लूट केली तोच भाग आत्ताचे सत्ताधारी करत आहेत. १९४७ मध्ये भारत भूमी स्वतंत्र झाली आहे परंतु धार्मिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक स्तरावर भारत अद्यापही पारतंत्र्यात आहे यातून ज्यावेळी तो स्वतंत्र होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने भारत स्वतंत्र झाला असे म्हणता येईल. यासाठी सर्वांनी, संत, धार्मिक संघटनांनी, शंकराचार्यांनी रस्त्यावर उतरून कार्य केले पाहिजे. धर्मासाठी असे करणे ही काळाची आवश्यकता आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मंदिर चैतन्याचे स्त्रोत असून तेथून धर्मशिक्षण देण्याचे कार्य अपेक्षित आहे मात्र धर्मनिरपेक्ष भारतात हिंदूंना ते नाकारण्यात आले आहे याचा फायदा धर्मांध आणि सत्ताधारी पुरोगामी म्हणणारे लोक घेत आहेत. याच्याविरुद्ध सर्वांनी विरोध करून व न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. त्याचे दुष्परिणाम न्यायालयाला सांगितल्यावर न्यायालय योग्य प्रकारे विचार करून आदेश देईल अशी अपेक्षा करता येईल व सर्व मंदिरे सरकारी करण्यापासून मुक्त होतील.

■ **लीना गाडगीळ**

# मिग-२१ ची सहा दशकानंतर निवृत्ती



भारताच्या ज्या पहिल्यावहिल्या सुपरसॉनिक लढाऊ विमानाने १९६५ चे पाकिस्तानशी युद्ध, १९७१ चे बांगलादेश मुक्ती युद्ध आणि १९९९ च्या कारगिल युद्धात तसेच अनेक लष्करी कारवायांमध्ये मोलाची भूमिका बजावली होती ते मिग-२१ लढाऊ विमान ६ दशकांच्या गौरवशाली आणि संस्मरणीय सेवेनंतर सप्टेंबर २०२५ मध्ये निवृत्त होत आहे. १९६३ मध्ये भारतीय हवाई दलात सामील झालेल्या या मिग-२१ चे शेवटचे उड्डाण २६ सप्टेंबर २०२५ रोजी चंदीगड एअरबेसवर होणार असून येथेच त्याचा निरोप समारंभ आयोजित केला जाणार आहे. भारतीय हवाई दलातील सर्वात जास्त काळ सेवा देणारे मिग-२१ हे लढाऊ विमान मूलतः तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील मिकोयान-गुरेविच यांनी विकसित केले होते. मिग-२१चे जुने तंत्रज्ञान, मर्यादित एव्हिओनिक्स (आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स विमान उड्डाण प्रणाली) आणि वाढत गेलेला देखभाल खर्च यामुळे ते आता कालबाह्य झालेच, पण अलिकडच्या काळात मिग-२१ च्या अपघातांचे प्रमाण वाढत गेले. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे आणि त्यात होणाऱ्या वैमानिकांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्याला शेवटी 'उडणारी शवपेटी (फ्लाइंग कॉफिन)असे म्हटले गेले हे फारच वेदनादायी होते. आता त्याची जागा तेजस, राफेल आणि अद्ययावत सुखोई ही लढाऊ विमाने घेणार आहेत. मिग-२१ च्या निवृत्तीमुळे भारतीय हवाई दलाच्या इतिहासातील एका गौरवशाली युगाचा अंत होत आहे. ■ **प्रदीप मोरे**

# मोबाईल गेममुळे मुले मानसिक तणावाखाली

नोकरी, व्यवसाय करून पैसे कमवायचे की ऑनलाइन गेम खेळून? दुसरा प्रकार म्हणजे मुले खेळत असलेले गेम्स व त्यातील घातक टास्क!! कोरोना काळात मुलांच्या हाती शिक्षणासाठी सहजपणे मोबाईल आला त्यामुळे अभ्यासाबरोबरच मुले त्यावर गेम खेळू लागली. पालक कुठपर्यंत लक्ष देणार? गेमवर असणारे घातक टास्क पूर्ण करताना मुले मानसिक तणावाखाली आली पण याची कुठे खबरही नसल्याने वाईट बातम्या येत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान योग्य वापर केला नाही तर जीवावर उठते तेव्हा यासंदर्भात व्यापक प्रबोधनाची आवश्यकता आहे.

■ **अर्चना काळे**

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय: 'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्र.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्र.२३७३७५५.# कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# शेतकऱ्यांना २८ हजार कोटींचे कर्जवाटप करणार-मुख्यमंत्री

## सहकार खात्याची आढावा बैठक संपन्न; ३७ लाख शेतकऱ्यांना मिळणार लाभ

बेंगळूर,ता.२९-



**राज्यात चालू आर्थिक वर्षात ३७ लाख शेतकऱ्यांना २८,००० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जुलै अखेरपर्यंत ८,६९,२८४ शेतकऱ्यांना ८,३६२.६८ कोटी रुपये कर्जवितरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळेवर कृषी कर्ज मिळत असल्याची खातरजमा करावी, असे निर्देश मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांना दिले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली बेंगळूरमध्ये सहकार खात्याची प्रगती आढावा बैठक झाली.** याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, नाबार्डने मागील आर्थिक वर्षातील सवलतीची व्याजदर कर्जमर्यादा ५,६०० कोटी रुपयांवरून ३,२३६.११ कोटी रुपयांपर्यंत कमी केली आहे. म्हणजेच ४२.२१ टक्के कर्जमर्यादा कमी केली आहे. तरी सुद्धा कर्ज वाटपात ९६.०७ टक्के प्रगती साध्य झाली आहे. २०२४-२५ या आर्थिकवर्षात २९,७५,५९८ शेतकऱ्यांना २५,९३९.०९ कोटी रुपये कर्ज वितरित करण्यात आले आहे. राज्यातील २८,५१६ सहकारी संस्था नफ्यात आहेत तर १४,६७० संस्था तोट्यात आहेत. चुकीच्या कर्जवसुलीमुळे बहुतेक सहकारी संस्था तोट्यात आहेत. अशा कर्जांच्या वसुलीसाठी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला पाहिजे. यापैकी २२०० दूध उत्पादक संघ तोट्यात आहेत. दूध उत्पादक सहकारी संघांच्या खर्चावर लक्ष ठेवले पाहिजे. दूध उत्पादन वाढवणे ही दूध संघांच्या सचिवांची



जबाबदारी आहे. दूध उत्पादक सहकारी संघांच्या पुनरुज्जीवनासाठी पावले उचलावीत, असे ते म्हणाले.

कन्नड साहित्य परिषदेतील (कसाप) गैरव्यवहाराबाबत डीआरसीएस चौकशी करत आहे. चौकशी सुरू असताना परिषदेकडून काही सदस्यांचे सदस्यत्व रद्द केल्याच्या तक्रारी आल्या आहेत. या संदर्भात कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सहकारी संस्थांच्या निबंधक कार्यालयाच्या अखत्यारितील सेवांचे संगणकीकरण करण्याचे काम जलदगतीने पूर्ण करावे. सहकारी संघांच्या वरिष्ठ निरीक्षकांची १२६ आणि निरीक्षकांची ४०३ पदे रिक्त आहेत. या पदांच्या भरतीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यात ७०७४ रोखे देणाऱ्या संस्था आणि १४६८ चिटफंड संस्था कर्नाटक सावकारी कायदा १९६१, कर्नाटक रोखे नियंत्रण कायदा १९६१ आणि चिटफंड कायदा १९८२ अंतर्गत नोंदणीकृत आहेत. बेकायदेशीरपणे रोखे देणाऱ्या संस्था आणि चिटफंड संस्थांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांनी कायद्यानुसार कठोर पावले उचलावीत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार बसवराज रायरेड्डी, राजकीय सचिव नासीर अहमद, अतिरिक्त मुख्य सचिव अंजुम परवेझ यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्या-डॉ.शिंगाडे

बेडकिहाळ,ता.२९(प्रतिनिधी)-

**गेल्या आठ दहा दिवसांपासून संततधार पावसामुळे नदीला पूर येवून निपाणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ऊस, उडीद, सोयाबीन, भुईमूग पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पूर परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे त्वरित सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी दलित संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.विक्रम शिंगाडे यांनी केली आहे.**

पुरामुळे बेडकिहाळ,कारदगा, भोज, सदलगा आदी गावातील शेतकऱ्यांच्या शेतात उभा असलेला ऊस तसेच अनेक पिकात पुराचे पाणी शिरल्याने पिके पुर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत.मे महिन्यापासून पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला आहे. तरी या नुकसानीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी नुकसानीचे पंचनामे करून त्वरित भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

## शक्तीपीठ रद्द होईपर्यंत लढा सुरुच राहणार-कॉ.देसाई

आजरा,ता.२९(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्यातील शक्तीपीठला कोणते पर्याय आहेत, त्या पर्यायांची तपासणी करण्याचे आदेश आदेश अप्पर सचिव राजेश भोगले यांनी आज दिले आहेत.**

आम. सतेज पाटील आणि माजी खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विरोधाची धास्ती घेऊन शासनाने आज पवनार ते सांगली पर्यंतच शक्तीपीठ महामार्गाला मंजुरी दिली आहे. शक्तीपीठ विरोधी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली लढ्यामुळे सरकारला मूळ रस्त्याची आखणी बदलायला भाग पाडले आहे. हा शेतकऱ्यांचा अंशतः विजय आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांना आणि पर्यावरणाला उद्ध्वस्त करणारा शक्तीपीठ रद्द होईपर्यंत हा लढा चालूच राहणार आहे असे कॉ.संपत देसाई, समन्वयक शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समिती यांनी स्पष्ट केले आहे. आजरा येथे भर पावसात निघालेला मोर्चा असो की तिरंगा आमच्या रानात हे आंदोलन असो या आंदोलनांनी जमीन आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी लढण्याची शेतकऱ्यांची जिद्द दाखवून दिली आहे. संपूर्ण शक्तीपीठ महमार्ग रद्द होईपर्यंत हा लढा चालूच राहील,असेही देसाई यांनी सांगितले.



निपाणी: संजीवन सोहळ्यानिमित्त श्री गजानन महाराज मंदिरात दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी

## निपाणीत गजानन महाराज संजीवन समाधी सोहळा

निपाणी,ता.२९(प्रतिनिधी)-

**रोहिदासनगर येथील गजानन महाराज मंदिरात श्री संत गजानन महाराजांचा १५५ वा संजीवन समाधी सोहळा उत्साहात पार पडला.**

यानिमित्त महारुद्राभिषेक,महाआरती,एक आसनी पारायण पार पडले. १० वा. महाराजांची मूळ पादुका प्रदक्षिणा व पुष्पवृष्टी झाली. दु.१२ ते ३ यावेळेत महाप्रसाद कार्यक्रम पार पडला.तीन हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.दु.एक वाजता झालेल्या महाआरतीस भाविकांनी उपस्थिती दर्शवून गण गण गणात बोते चा अखंड जयघोष केला. श्याम दत्त भजनी मंडळाने सेवा दिली. यावेळी शैलजा पाटील, अभिषेक पाटील, राजेंद्र बडर, अनिल पाटील, ज्योती पाटील, आरूष पाटील, अनुश पाटील यांच्यासह भाविक व मान्यवर उपस्थित होते.

# सरकारच्या विविध खात्यांमध्ये २.७६ लाख पदे रिक्त

बेंगळूर,ता.२९-

**शिक्षण खात्यासह राज्यातील ४३ खात्यांमध्ये एकूण २.७६ लाख पदे रिक्त असल्याची अधिकृत सरकारी माहिती उपलब्ध झाली आहे.**

राज्य सरकारच्या ४३ खात्यांमध्ये एकूण २,७६,३८६ पदे रिक्त आहेत. त्यापैकी १६,०१७ पदे अ श्रेणी, १६,७३४ ब श्रेणी, १,६६,०२१ क श्रेणी आणि ७७,६१४ ड श्रेणीची पदे रिक्त आहेत, असे सांगण्यात आले. शिक्षण खात्यात सर्वाधिक ७०,७२७ पदे रिक्त आहेत. आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण खाते-३७,०६९,गृह प्रशासन खाते-२६, १६८, महसूल खाते-११,१४५ आणि ग्रामीण विकास खात्यात १०,८९८ पदे रिक्त आहेत. कंत्राटी आणि आउटसोर्सिंग आधारावर गट-क संवर्गातील (स्टेनोग्राफर, टायपिस्ट, वाहन चालक आणि गट-ड समकक्ष) आणि तांत्रिक पदांची ९६,८४४ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील विविध खात्यांच्या विविध संवर्गातील एकूण ४,६७३ पदे भरण्याचा प्रस्ताव सरकारने ठेवला आहे.

# सदलगा पुलाच्या पश्चिमेला महापुरामुळे खड्डे

सदलगा,ता.२९(प्रतिनिधी)-

**येथील दूधगंगेच्या सदलगा-बोरगांव दरम्यान असलेल्या नविन पुलाच्या पश्चिमेला महापुरातील पाण्याच्या तीव्र धारेमुळे मोठा खड्डा पडला आहे. किमान दीड एक फुटाच्या या खड्ड्यामुळे चारचाकी हलक्या आणि अवजड वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. महापुराच्या प्रवाहातील पाण्याच्या तीव्र धारेमुळे रस्त्याच्या दुतर्फा असलेले संरक्षण जाड पत्रे खुंटासह वाकले असून काही ठिकाणी उखडले आहेत.**



सदलगा-दूधगंगेच्या पुलाच्या पश्चिमेला महापुरामुळे पडलेला रस्त्यावरील खड्डा,वाकलेले संरक्षक कठडे.

पुलावरील सिमेंट कॉंक्रीटही उखडले असून आतील सळ्या बाहेर आल्या आहेत. महापूर ओसरून तब्बल आठवडा पूर्ण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या अडचणीकडे तातडीने लक्ष पुरवून खड्डा मुजवून त्यावर डांबरीकरण करावे, पुलावरील सळ्यांवर सिमेंट कॉंक्रीट टाकून डागडुजी करावी आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेले संरक्षक कठडे देखील दुरुस्त करावेत अशी जनतेतून मागणी होत आहे.

याचबरोबर,स्मशानभूमीच्या निवारा शेडच्या खाली देखील पाणी प्रवाहामुळे भराव वाहून गेला असल्याचे निदर्शनास येत आहे. इथेही संबंधीत अधिकाऱ्यांनी वेळीच डागडुजी करून संभाव्य अनर्थ टाळावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# शिवनेरी पतसंस्थेची सभा खेळीमेळीत संपन्न

बिद्री,ता.२९(प्रतिनिधी)-

**बोरवडे (ता.कागल) येथील शिवनेरी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संस्थापक चेअरमन एम. आर. फराकटे होते. संस्थेला अडीच लाख रुपयांचा नफा झाला असून सात टक्के प्रमाणे सभासदांना लाभांश देण्यात आल्याचे चेअरमन फराकटे यांनी सांगितले.यावेळी शिवप्रतिमेचे पूजन ह.भ.प. डॉ.रामचंद्र जठार यांच्या हस्ते करण्यात आले.**



बोरवडे : येथील शिवनेरी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना संस्थापक एम. आर.फराकटे शेजारी इतर संचालक.

यावेळी झालेल्या चर्चेत विलास गवाणकर,प्रमोद माने, मारुती खाडे, महिपती फराकटे यांच्यासह विविध सभासदांनी भाग घेतला. यावेळी माजी चेअरमन आनंदा फासके, व्हा.चेअरमन बाबुराव चव्हाण, महादेव यादव, लक्ष्मण पाटील,संजय कुंभार, प्रकाश कांबळे, सारिका फराकटे, रेखा जाधव, कोमल मोरे उपस्थित होते.प्रास्ताविक चेअरमन एम. आर. फराकटे यांनी केले.अहवाल वाचन सचिव रेखा जाधव यांनी केले. बाबुराव चव्हाण यांनी आभार मानले.

# धनलक्ष्मी सौहार्दची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

कारदगा,ता.२९(वार्ताहर)-

**भोज येथील श्री धनलक्ष्मी क्रेडिट सौहार्द संस्थेची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या चेअरमन सुषमा केस्ते यांच्या अध्यक्षतेखाली तर संस्थेचे संस्थापक व सचिन केस्ते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महंत महाराज मंदिरात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.**



धनलक्ष्मी सौहार्दच्या सभेत बोलताना चेअरमन सुषमा केस्ते.

सभेपुढील विषय वाचन व नफा तोटा ताळेबंद पत्रकाचे वाचन सेक्रेटरी विनोद टाकळे यांनी केले. त्यानंतर पीकेपीएस चेअरमन डॉ.सुदर्शन मुरावट्टे यांचा सत्कार संचालक मंडळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अहवाल वाचन करताना चेअरमन सुषमा केस्ते म्हणाल्या, संस्था प्रगतीकडे वाटचाल करीत असून ठेवी ११ कोटी ८३ लाख, कर्जे ५ कोटी ३३ लाख, गुंतवणूक ६ कोटी ४९ लाख, वार्षिक उलाढाल ८७ कोटी २० लाख ४ हजार ७०८ रू. इतकी असून अहवाल सालात संस्थेस १२ लाख ९६९ रू.नफा झाला असल्याचे सांगितले.

यावेळी व्हा.चेअरमन प्रशांत चौगुले, संचालक बाळासाब मालवा, सुकुमार चौगुले, बसगौडा पाटील, शीतल चौगुले, उत्तम कणंगले, किर्तिकुमार पाटील, मोनिका कोणापन्नवर, मकबूल मुजावर, संजय आरगे, नंदकुमार भोसले यांच्यासह सभासद, ठेवीदार, हितचिंतक उपस्थित होते. आभार विनोद टाकळे यांनी मानले.

## मराठा समाज आंदोलनात भुदरगडचे आंदोलक सहभागी

गारगोटी,ता.२९(प्रतिनिधी)-

**मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आजपासून मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथील आझाद मैदानात आंदोलन सुरु झाले आहे, त्यांना पाठींबा देण्यासाठी भुदरगड तालुक्यातून अनेक मराठा बांधव मुंबईला गेले आहेत. गारगोटीचे सरपंच प्रकाश वास्कर व इतर बांधव गनिमी कावा करून मुंबईतील आझाद मैदानात दाखल झाले आहेत.**



गारगोटी येथून कॉ सम्राट मोरे, सरपंच प्रकाश वास्कर, रमेश माने, अनिल देसाई, संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आंदोलक मुंबईसाठी रवाना झाले. गारगोटीतून लोणावळापर्यंत चारचाकीतून काही अंतर पायी चालत व नंतर रेल्वेतून प्रवास करत ते सकाळी आझाद मैदानात दाखल झाले आहेत.

## निधन वार्ता

### मालुबाई परिट

शिरगाव,ता.२९(प्रतिनिधी )-



येथील मालुबाई जोतिराम परीट (वय७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### शांताबाई उगळे

ढोणेवाडी,ता.२९(वार्ताहर)-



कारदगा येथील श्रीमती शांताबाई संतराम उगळे (वय ९५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### आण्णाप्पा देसाई



एकसंबा,ता.२९(वार्ताहर)-

मलिकवाड येथील आण्णाप्पा नेमण्णा देसाई (वय ६८) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# सरकारी योजनांचा सभासदांना पुरेपुर लाभ मिळवून देणार-बागडी

सदलगा,ता.२९(प्रतिनिधी)

**सदलगा येथील मागासवर्गीय बागडी मासेमारी सहकारी संघाची ७१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झुमझुम बाबासाहेब मठाच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली .संघाचे अध्यक्ष सुरेश बागडी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संघास अहवाल सालात ९८६१ रुपयांचा नफा झाला असल्याची माहिती देण्यात आली.**



संघाचे एकुण सभासद २८१ आहेत.यावेळी सहाय्यक मत्स्य विभागाचे अधिकारी रघुनाथ शिंदे म्हणाले, आमच्या विभागाकडून मत्स्य व्यवसाव करणाऱ्या बागडी समाजबांधवांना मासेमारीसाठी लागणारी,जाळी,वॉटरप्रुफ जॅकेट देण्यात येते.तसेच अलीकडे नदीत मगरीचा वावर वाढला आहे, अनेकवेळा मगरीने मासेमारी करणाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला आहे.हे हल्ले लक्षात घेता मत्स्य विभागाकडून विमा संरक्षणही देण्यात येते. या विमा योजनेचा लाभ बागडी बांधवांनी घ्यावा तसेच शासनाकडून विविध योजना आहेत त्यांचाही लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संघाचे जेष्ठ सभासद,भारतीय सैन्य दलात भरती झालेल्या रविकिरण बागडी आणि रहमान बहुरुपी, हौसाबाई बागडी, अनुसया बागडी, ताराबाई बागडी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सभेस रमेश घाटगे, तानाजी बागडी, आण्णाप्पा बागडी, मारुती बागडी तसेच बोरगाव,कुन्नुर, एकसंबा,शमनेवाडी, सदलगा येथील सभासद, नागरीक उपस्थित होते. स्वागत दत्ता बागडी यांनी केले. आभार संघाचे कल्लापा पडलाळे यांनी मानले.

## ग्रामीण भागात स्त्री गीतांना उधाण

पट्टणकोडोली,ता.२९(प्रतिनिधी)-

**गौरी-गणपतीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा या उक्तीप्रमाणे पट्टणकोडोली परिसरासह ग्रामीण भागामध्ये पारंपारिक स्त्री गीतांची परंपरा अजूनही टिकून आहे. महिलांच्या स्त्री गीताने ठिकठिकाणी रात्री जागू लागल्या आहेत. महिलांचा आवडीचा सण म्हणजे गौरी-गणपतीचा. या सणाच्या निमित्ताने माहेरवाशिनी घरी आल्या असून झिम्मा-फुगडीसह गौराई गीताने मग्न झाल्या असल्याचे चित्र ग्रामीण भागामध्ये दिसून येत आहे.**

**पारंपारिक गीताने रात्री जागू लागल्या**

पट्टणकोडोलीसह अलाटवाडी, इंगळी, तळंदगे, सांगवडे, वसगडे, सांगवडेवाडी, हलसवडे आदी भागात रात्री १० ते १ वाजेपर्यंत महिला गौराई गीते गाऊन आनंद लुटताना दिसत आहेत.या गौराई सणामुळे महिलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.सर्वत्र चैतन्याचे व आनंदाचे पसरले आहे.

## बालाजी साळोखे यांना पीएच डी पदवी

गारगोटी,ता.२९(प्रतिनिधी)-



**पांगिरे (ता.भुदरगड) येथील बालाजी शिवाजी साळोखे यांनी कोरिया देशातील जॉन बुक राष्ट्रीय विद्यापीठाची पीएच डी पदवी प्राप्त केली आहे.**

त्यांनी हायड्रोजन निर्मिती व इलेक्ट्रोकॅटलिसिसवर आधारित पाण्याचे विघटन ही प्रक्रिया पूर्णपणे हरित आहे. यावर संशोधन केले आहे. त्यांना विद्यापीठाचे प्रोफेसर जे.एच.ली यांचे मार्गदर्शन लाभले. पांगिरे या छोट्याशा गावातील विद्यार्थ्याने परदेशात राहून ही पदवी मिळवली असल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# 'संगम' साडेतीन लाख टन ऊसाचे गाळप करणार

## राजेंद्र पाटील; कारखान्याची वार्षिक सभा संपन्न

संकेश्वर,ता.२९(प्रतिनिधी)-

**संगम सहकारी साखर कारखाना चालू गळीत हंगामात साडेतीन लाख मेट्रिक टन ऊस गाळप करणार असल्याचे कारखाना अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी सांगितले. ते संगम साखर कारखाना वार्षिक महासभेला उद्देशून बोलत होते.स्वागत कारखाना उपाध्यक्ष बसगौडा पाटील यांनी केले. कारखाना व्यवस्थापक संचालक एस.एस. पुजारी यांनी कारखाना प्रगतीचा आढावा घेतला.**



संकेश्वर: संगम कारखान्याच्या वार्षिक सभेत बोलताना राजेंद्र पाटील.

राजेंद्र पाटील पुढे म्हणाले, गेली २० वर्षे बंद पडलेला संगम साखर कारखाना सर्वांच्या सहकार्यातून, मोठ्या कष्टाने सुरु केला आहे. २०२१ मध्ये संगमची धुरांडी पेटवून १ लाख २२ मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले. २०२२ मध्ये २ लाख ४० हजार तर २०२३ मध्ये ३ लाख १४ हजार मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले.२०२४ गळीत हंगामात २ लाख ७८ हजार तर गतवर्षी केवळ २ लाख १४ हजार मेट्रिक टन ऊस गाळपाखाली आणण्यात आले. त्यामुळे कारखान्याला नुकसान सोसावे लागले. कारखाना ऊस ओढणी तोडणी, वाहतूक आणि कारखाना अन्य खर्चाचा ताळमेळ जमविण्यासाठी किमान ३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाखाली आणण्याची आवश्यकता आहे. संगम साखर कारखाना प्रगतीपथावर नेण्यासाठी 'अ' वर्ग सभासदांकडून १० हजार रुपये 'ब' वर्ग सभासदांकडून ५ हजार रुपये शेअर कलेक्शन केले जात आहे. सभासदांनी त्याला हातभार लावून सहकार्य करावयाचे आहे. केंद्र सरकारकडून ६ टक्के व्याज कर्ज मिळविण्यासाठी कारखान्याला इथेनॉल, सीएनजी आणि बायोगॅस घटक सुरू करणेची आवश्यकता आहे. त्यासाठी शेअर कलेक्शन केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संगम साखर कारखान्याने अ वर्ग सभासदांना ५० किलो तर ब वर्ग सभासदांना २५ किलो साखर देण्याचा निश्चय केल्याचे सांगितले.सभेला उपाध्यक्ष बसगौडा पाटील,संचालक शशिकांत नाईक, जी. एम.पाटील, संपत भांदुग, अर्जुन पाटील,सुभाष पाटील,संगिता बी. करगुप्पी, राजेश्री एम. कवठगीमठ, श्रीमंत सननाईक, शिल्पा गस्ती,रविंद्र पाटील यांच्यासह मान्यवर ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. आभार एस.एस. पुजारी यांनी मानले.



## गौतम कांबळे यांची निवड

आजरा,ता.२९(प्रतिनिधी)-

**वंचित बहुजन आघाडी कोल्हापूर दक्षिण विभाग अध्यक्षपदी हाळोली येथील गौतम कांबळे यांची निवड झाली. पक्षाचे अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र प्रदेशचे महासचिव किसन चव्हाण यांनी केली आहे.**

गौतम कांबळे यांनी यापूर्वी तालुका अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. सदर निवड झाल्याने त्यांच्यासह नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष बाबुराव आयवाळे, दीपक कांबळे, संजय शिरगावकर, राज कांबळे, संभाजी कांबळे, शरद कांबळे, विवेकानंद कांबळे, प्रा.ज्योती थडगे, संदीप भोपळे उपस्थित होते. आभार आप्पासाहेब कमलाकर यांनी मानले.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**धनगर माळ कोरोची** व तिरूपती नगर, तारदाळ येथे कलेक्टर बिगरशेती प्लॉट विकणे आहे. संपर्क- विजय ९६८९६९१८६२.

**इचलकरंजी**/टाकवडे परिसरात पाच ते सात एकर जमिन विकत घेणे आहे. रस्ता व पाण्याची सोय असलेली. नदीबुड चालेल. संपर्क- ९८५०११४२४९.

**४००० स्के. फुट** जागेमध्ये २००० स्के. फुट बांधकाम असलेले घर विकणे आहे. लायकार थिएटर मागे, इचलकरंजी. मो. ९४२२०५१७७७.

**फ्लॅट विकणे**- २ बीएचके, लक्झरीयस फ्लॅट फर्निचरसह विकणे आहे. निरामय रोड, कुरूहिनशेट्टी भवनसमोर, इचलकरंजी. मो. ९०३१०३९६९६.

**२ बीएचके फ्लॅट** विकणे आहे- १००५ स्के. फुट (सेलेबल एरिया) रेडिफ्रेशन मेराकी स्काय बिल्डींग, चंदूर रोड, मगदूम नगर, इचलकरंजी. मो. ९९७५१३७०६९, ७२१८०४७००२.

**४००० स्के. फुट** जागेमधील ३ रूमसह इंजिनिअरींग मशिन शॉपसाठी उपयुक्त लाईट पाणी सर्व सोयीनियुक्त आरसीसी इमारत विकणे आहे. पत्ता- तिरंगा कॉलनी, गल्ली नं.३, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८२२३४३८५६.

**प्लॉट उपलब्ध (चंदूर)** कायदेशीर कागदपत्रासह १ व ३ फेज वीज, २५ फुटी रस्ता. 'स्वस्त' गुंतवणुकीसाठी उत्तम संधी'. संपर्क- ८३९०७१२५७९.

**विकणे आहे**. वॉटरप्रुफ फायबरचे कपाट ७X८, ५X८, २४X८ चे मिठाई दुकानाचे काचेचे कॉंटर-२. संपर्क-९८२२८६६७७९

**रेंदाळ विठ्ठलवाडी येथे** कलेक्टर एनए प्लॉट विकणे आहे. थोडेच मोजकेच प्लॉट शिल्लक. संपर्क- ९७६४९७८६००, ९०११४२५३४०

**अर्जंट विकणे आहे**. २ बीएचके फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर, श्रीपादनगर, श्रीनिकेतन अपार्टमेंट पाटील हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी. संपर्क-९३७३२४४४०२

**चालू स्थितीत** पिठाची गिरण विकणे आहे. संग्राम चौक, इचलकरंजी. संपर्क-९४२३८००५२५

**मान्सून ऑफर**- जुन्या ट्रॉली रिप्लेक्स करून नवीन २०२५ च्या काळातील लेटेस्ट मॉड्युलर किचन बनवा. जुन्या ट्रॉलीचा भरघोस परतावा लोकआग्रहास्तव १५ ऑगस्ट २५ पर्यंतची ही ऑफर फक्त ३१ ऑगस्ट २५ पर्यंत वाढवली आहे. One & Only The Famous मे. किचन सम्राट, इचलकरंजी. ९८२२२४३६९३

**१ बीएचके ६ फ्लॅट** असलेली ३ मजली इमारत सर्व सोयीनियुक्त विकणे आहे. आमराई रोड, ओंकार चौक, स्वामी मळा, इचलकरंजी. ९३२५४१४९४०

**अर्जंट प्लॉट विकणे**- हातकणंगले- कुंभोज रस्ता. प्रतिप्लॉट क्षेत्रफळ= १७२२ स्के. फूट कलेक्टर एनए. संपर्क-८७६७८६७२८६, ९५४५३२९१०८

**जुने व नवीन** पॉवरलूम घेऊ व देऊ तसेच मावारा कांडीमशीन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

### बांधकाम विषयक

**फार्महाऊस, बेस्ट** क्वॉलिटी, डिझाईन, मजबूतीसह कमर्शियल, रेसिडेन्सीयल, प्रोजेक्ट लॉकऑण्ड की सर्व मटेरियल रियुजेबल. संपर्क- ८३९०७१२५७९, ७३८५७७८२१७७.

**योग्य वॉटर प्रुफिंग** ॲन्टीलिक, हिट सोल्युशन, केमिकल कोटींग गॅरंटीसह, विश्वासार्ह,अनुभवी, वेळेत सेवा पाण्याला रोखा, प्रॉपर्टी वाचवा. संपर्क- ७३८५७७८२१७७, ९२२६८८०९४३.

### * नोकरी विषयक *

**शिकाऊ दिवाणजी पाहिजे**- कापड पेढीवर ऑफिस कामासाठी व इतर कामासाठी शिकाऊ दिवाणजी पाहिजे. संपर्क- ९७६६७४१६०६.

**गॅस एजन्सी ऑफिससाठी** सिनियर स्टाफ पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. तसेच ऑफिस स्टाफ पाहिजे. ग्रज्युएट, शहापूर, डेक्कन रोड, खणीजवळ, गॅस गोडावून. मो. ९५४५२२०१८९.

**प्रायव्हेट लिमिटेड** कंपनीमध्ये खालील जागा (फुल टाईमसाठी) भरणे आहेत. १) चार्टर्ड अकौंटंट (क्वॉलीफाईड और सेमी क्वॉलीफाईड), २) सेल्स एक्झिक्युटिव्ह + टेलि कॉलिंग (मेल/फिमेल). मो. ९८८१८९४०४०, ९३७०५२८९३०.

**चाटे स्कूल** ऑफिसमध्ये भरती सुरू. विज्ञान, स. शास्त्र, मराठी, गणित, हिंदी टेलिकॉलर, (१२ वी) -४, शिपाई- २. मो. ८३२९३०५५२८, ८३८०९६९४८९.

**इंटरनेट कॅफेमध्ये** कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. १२ वी पास. संपर्क- ९५९५९५२०४१. टारगेट इंटरनेट कॅफे जवाहरनगर, इचलकरंजी.

**कामगार पाहिजे**- वय ३२ पर्यंत, टु व्हिलर असणार. संपर्क- ७०३८३८६०३०.

**ऑनलाईन काम करून महिना** २० ते २५ हजार कमवण्याची सुवर्णसंधी शिक्षण- १२ वी पास. संपर्क- दिपाली मॅम- ७२४९६७०९९६.

**US Polo आणि** सियाराम शोरूममध्ये खालील वेळेसाठी सुशिक्षित मुले-मुली पाहिजेत. सकाळी १० ते ६. पगार-८०००/-, दुपारी १ ते ९.३० पगार- १०००० ते १५००० सायंकाळी ६ ते ९.३० पगार- ४०००/-, भेटा- व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँक शेजारी, इचलकरंजी.

**सरस्वती मार्केटमध्ये** नवीन मेडिकलसाठी अनुभवी/शिकाऊ फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क- ७४२०९४६४६६.

**डॉमिनोज पिझ्झा**- कामगार पाहिजेत. डिलेव्हरी बॉय आकर्षक पगार. संपर्क-९५२९२१५७४०, ८३९०३६१११४.

**इचलकरंजी एस.टी.** स्टॅण्डमध्ये टु व्हिलर पार्किंगसाठी कामगार पाहिजे. संपर्क-८२३७७४४४४.

**ड्रायव्हर पाहिजे**- येरणा व विंगर गाडीसाठी. वेळ सकाळी ९ ते सायं. ८. मो. ९४२०७७६४८६.

**जोडपे पाहिजे**- शेती कामासाठी टाकवडे येथे जोडपे पाहिजे. पगार - १२ हजार (महिना). संपर्क- ९४२०७७६४८६.

**साडी/कापड** दुकानात शिकाऊ/अनुभवी लेडीज/जेंटस् सेल्समन पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क- जनता क्लॉथ एम्पोरियम, जुनी नगरपालिका गाळा, इचलकरंजी.

**भारत ऑटो** स्टोअर पार्टच्या दुकानामध्ये टु व्हिलर अनुभवी मेकॅनिकल पाहिजेत. संपर्क- ७९७२८४००८४.

**शोरूमसाठी** सेल्सगर्ल पाहिजे. लेडीज/मुली, बीग बझारजवळ. संपर्क- ७०२०५०९१७७.

**सिक्युरिटी गार्डस् पाहिजेत**. इचलकरंजी नांदणीकरिता ड्युटी ८ व १२ तास. आकर्षक पगार. संपर्क-९७०२४२४७७२

**टेलिकॉलिंगसाठी** मुले/मुली नेमणे आहेत. (अनुभव आवश्यक). पार्वती इंडस्ट्रिज इस्टेट, यड्राव, इचलकरंजी. ९९२३०३४००६, ८२०८६३७७४६

**अनुभवी व्हीएमसी** ऑपरेटर व सुपरवायझर पाहिजेत. ऑपरेटर-१० ते १२ हजार. सुपरवायझर १४ ते १७ हजार. गरजूंना प्राधान्य. संपर्क- ९७६३४१४३३८, ९४२३०४१०२०

**इलेक्ट्रीक व फिटर** कामासाठी कामगार पाहिजे. सिध्देश्वर सेल्स अँन्ड सर्व्हिस शहापूर. फोन- ८०८७३७२४६२

**M-Bo X मॉड्युलर** किचन ट्रॉली, हार्डवेअर अँन्ड अप्लायन्सेस सेल्ससाठी-३ व मार्केटिंग एक्झीकेटिव्हसाठी-३. जेंटस/लेडीज पाहिजे. संपर्क-८९५६९०७७५७

**सेल्स प्रमोटर नेमणे**- इचलकरंजी इलेक्ट्रॉनिक शोरूमकरिता सेल्स प्रमोटर जेंटस/लेडीज त्वरीत नेमणे. संपर्क-९८३४७७७४९२, ९३७०१०७१०८

**सर्व्हिसिंग सेंटरसाठी** अनुभवी किंवा शिकाऊ कामगार पाहिजे. सुपर सर्व्हिसिंग सेंटर, नदीवेस नाका, इचलकरंजी. पगार-९ ते १३ हजार. ९३७११७१०६९

**बिस्किट डिलीव्हरी** कामासाठी २० ते ३० वयोगटातील मुले पाहिजेत. पगार+इन्सेन्टीव्ह. संपर्क- ८६९८२८७३९७

**टीएफओ कारखान्यासाठी** हेल्पर मुले पाहिजेत. संपर्क-पद्मावती ग्रुप ऑफ टेक्स्टाईल. ९९२२४९८९३५, ९४२२४१३४१८

**नुगा बेस्ट कंपनीमध्ये** कामासाठी मुली/मुले पाहिजेत. वय-२५ ते ४०. कामाची वेळ-सकाळी ८ ते ६ पर्यंत. संपर्क-९९२०९४३८९५, ९१४५००१९९०, एसटी स्टँडजवळ, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत**. नामवंत शोरूममध्ये कायमस्वरूपी गरजू कामगार पाहिजेत. १२००० पर्यंत. पगार-प्रत्यक्ष भेटा. स्टेशन रोड, इचलकरंजी. ९९२२७०४२१०

**वेदप्रसाद इंडस्ट्रिज** जयसिंगपूर येथे अकौंटींग, जीएसटी अनुभवी उमेदवार पाहिजे. संपर्क- ७५५९५९११११

**पाहिजेत**. सकाळी ७.३० ते संध्याकाळी ६.३० पर्यंत स्वयंपाक व घरकामासाठी बाई पाहिजेत. पत्ता- पार्श्वनाथ हौसिंग सोसायटी, ओंकारेश्वर रोड, शरद इन्स्टिटयुटजवळ, गरजूंनी फोन करावी. ९५४५५३१११३

**इचलकरंजी आयुर्वेदिक** दवाखान्यासाठी P.R.O./सेल्स एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. २०,०००+इन्सेंटिव्ह. दहा जागा. ९८२२६७४८५१

**पाहिजेत**. वॉर्ड बॉय आणि वॉर्ड मावशी-नामांकित हॉस्पिटलमध्ये वॉर्ड बॉय, वॉर्ड मावशी पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क- ९७६७४९६६५४, ८१४९२८००४५

**हॉटेलमध्ये साफसफाईसाठी** हेल्पर व भांडी धुसेसाठी महिला पाहिजेत. मो. ९५९५६०४७४७

**पाहिजे**. ऑफिस कामासाठी हुशार व अनुभवी कामगार पाहिजे. संपर्क- रिशू इलेक्ट्रॉनिक्स, ७/९८३, कापड मार्केट, भगतसिंग बागेजवळ, इचलकरंजी. ९५८८६८३२३४.

**कामगार पाहिजे**. ऑटो वायडिंगसाठी लेडीज/जेंटस कामगार पाहिजे. संपर्क-लाटे ऑटो कॉनर जवाहर नगर, इचलकरंजी. फोन- ८९९९७७३७५५, ९९७०९९३५५४

**ऑफिस कामासाठी** लेडीज स्टाफ पाहिजे. माल काढणे, पॅकिंग करणे, कॉम्प्युटर चेकिंगसाठी लेडीज पाहिजेत. फूल डे किंवा हाफ डे. सुहिल व्हेंचर लि., डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. ९३५६७८५५०७

**होलसेल औषध दुकानामध्ये** कामाकरिता १० वी/१२ वी झालेली मुले/मुली व अकौंटंट पाहिजेत. पत्ता-सुशिल फार्मा एल.एल.पी. नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९७६७३८८२७९, संपर्क वेळ-१० ते २

### * भाड्याने देणे *

**इचलकरंजीमधील** भाडेकरूंना जागेसहीत घरकुलासाठी शासनाचे प्रमाणपत्र मिळवून देण्यात येईल. संपर्क- अनिल पाटील- ९५६१९३०१०८.

**भाड्याने देणे**- गांधी कॅम्पमधील ३ बीएचके ग्राऊंड फ्लोअरचा फ्लॅट, चोवीस तास पाणी. संपर्क- ९३७०९४४४६४.

**कोल्हापूर रोड मॉडर्न** हायस्कूल परिसरात शाकाहारी कुटुंबासाठी आर.सी.सी. २ बीएचके हवेशीर, सुरक्षित बंगला भाड्याने देणे. इचलकरंजी. मो. ९८९०३०५३१५.

**सिंगल रूम, डबल रूम** कबनूर परिसरामध्ये,१ बीएचके आरसीसी दुसरा मजला सर्व सोयीनियुक्त भाड्याने. संपर्क- ९८८१०८१५६६, ९८५०६१५७२९.

**इचलकरंजी मध्यवर्ती** ठिकाणी गांधी कॅम्पमध्ये ५५० स्के फुटचा दुकान गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क- ७०२८७११११११.

**बंगला भाड्याने देणे**- एकता कॉलनी, सोलगे सांस्कृतिक भवनजवळ, सांगली नाका, इचलकरंजी. संपर्क- ८९९९८१५०५८, ८०१०१३१८४६.

**डबल रूम भाड्याने देणे**- डी मार्टच्या मागे, लिंबू चौक, गुरु कन्ननगर, गल्ली नं. ६, इचलकरंजी. मो. ८३०८३१९५२१, ९८६०१६६६०१.

**भाड्याने देणे**- महासत्ता चौक, स्वामी समर्थ मंदिरासमोर, २ बीएचके बंगलो भाड्याने देणे. २४ तास पाण्याची सोय. संपर्क- ९७६४१४५६०५, ९१६८९०६३३०.

**१ बीएचके भाड्याने** देणे आहे- सर्व सोयीनियुक्त तुळजाभवानी अपार्टमेंटच्या पाठी मागे, जे.के.नगर. संपर्क- ९७६७४१२४२३, ७८९२३६३०२८.

**सेपरेट ३ बीएचके** बंगलो भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त ग्राऊंड फ्लोअर बोअरसह राहणेसाठी, पी.जी. साठी. आनंदराव माळी, शिवाजीनगर, इचलकरंजी.९५९५६२८६२८, ७५८८५२८६२८

**आरसीसी हॉल** भाड्याने देणे आहे. ५०० व ४०० स्के. फूट सर्व सोयीनियुक्त, सुंदर बाग, दाते मळा, इचलकरंजी. मो. ९८६००१०२००

**३ बीएचके** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. पत्ता-संभाजी चौक, डी-मार्टजवळ, इचलकरंजी. ९१४२३११७११, ७०८३३१७१७७

**२ बीएचके**/१ बीएचके सर्व सोयीनियुक्त घर भाड्याने देणे. श्री दत्तकृपा निवास चौंडेश्वरी कॉलनी, शहापूर, इचलकरंजी. संपर्क- गजानन उकिर्डे. ९९२१०५९६३७

**१५०० स्के. फूट** आरसीसी शेड व लागतची ५००० स्के. फूट रिकामी बंदिस्त जागा एकत्रित किंवा स्वतंत्र भाड्याने देणे. ९९६७२६०२२७/९, ८३२९३८६०१०

**१ बीएचके भाड्याने देणे**- ग्राऊंड फ्लोअर सांगली रोड, आर.के. नगर जवळ, यशवंत रेसिडेन्सी कॉलनीमध्ये. मो. ९६२३१०१७५२

**रूम भाड्याने देणे**- १ बीएचके, २ बीएचके सर्व सोयीनियुक्त २४ तास पाणी, यशवंत कॉलनी, इचलकरंजी. फोन-९४२३२८१७७६, ८४८२९३१३९३

**विद्यार्थीनींसाठी** सर्व सोयीनियुक्त हॉस्टेल उपलब्ध. तसेच हॉस्टेलसाठी रेक्टर नेमणे आहे. टायमिंग संध्या. ५ ते सकाळी ८. पत्ता-बस स्टँडजवळ. फोन-८७९३१४४१०७, ९३७२१२०७७७

**भाड्याने देणे**- १४०० स्के. फूट शेड भाड्याने देणे आहे. शहराल मध्यवस्तीत साखरे हॉस्पिटलजवळ अर्जंट. संपर्क-७९७२९३४८२१

**दुकानगाळा** भाड्याने देणे आहे. ८X२०. पत्ता-जनता बँकेजवळ, शाहू कार्नर, इचलकरंजी. ९४२११०८०८५

**विद्यार्थ्यांसाठी** कॉट बेसिसवर रूम भाड्याने देणे. अभय दूध डेअरीच्या पाठीमागे, सांगली नाका, इचलकरंजी. फोन-९८२३०८१६८१, ७८४१८२२१७२

**१ आरके रूम भाड्याने देणे**. सर्व सोयीनियुक्त कावझन होंडा शोरूमसमोर, आर.के. नगर, यड्राव. संपर्क-९९६७२६०२२७, ८३२९३८६०१०

### कर्ज विषयक

**होमलोन मॉरगेज** प्लॉटतारण चालू. कर्ज कमी दराने. एनए असो नसो मराठा सबसिडी ५ कोटीपर्यंत फास्ट मंजूर. ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५

**घर तारण लोन**, होम लोन, बॅलेन्स ट्रान्सफर, प्रॉपर्टी परचेस लोन, सर्व प्रकारचे लोन मिळेल. संपर्क-९१५६५९१०३८

**९९ वर्षे करार** प्रॉपर्टी जी प्रॉपर्टीचा लिगलमध्ये प्रॉब्लेम असेल तरी त्यांना सिबील ६५०+ असेल तर फक्त अरेंजमेंट व घरफाळावर लोन मिळेल. संपर्क-९१५६५९१०३८

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**


### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# कुरिअर कंपनीतील कामगाराने सराईत टोळीच्या मदतीने टाकला दरोडा

## ९२ तोळे सोने व ७६ लाख ९४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



सातारा, ता,२९(प्रतिनिधी) -

**कुरिअर कंपनीत काम करणाऱ्या घरभेद्याने सराईत टोळीच्या मदतीने धाडसी दरोडा टाकला मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस अभिलेखावरील सराईत टोळीच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडून तळबीड -तासवडे टोलनाक्यावर श्रवणी हॉटेल समोरच्या धाडसी दरोड्यात लूटलेले ९२ तोळे सोन्याचे दागिने गुन्ह्यात वापरलेली कार असा ७६ लाख ९४ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.**

राहुल दिनेश शिंगाडे, महावीर हणमंत कोळपे, अभिजित महादेव करे, अतुल महादेव काळे,अशी अटक केलेल्या संशयीताची नावे आहेत. पोलीस कोठडी सुनावल्यानंतर चौकशीतून टोळीने साथीदाराकडे लपवलेले सोने बिस्किटे व गुन्ह्यात वापरलेली कार हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश मिळाले. ३० जुलैच्या पहाटे वराडे (ता.कराड ) गावच्या हद्दीत श्रावणी हॉटेल समोर एसटी बस थांबली होती. यामध्ये तीन सराईतांनी प्रवेश करत एसटीमधील कृष्णा कुरिअर कंपनीच्या कर्मचाऱ्यास जबर मारहाण करत त्याच्याकडून ७१,९४,२५० रुपये किमतीचे ९२ तोळे सोन्याचे दागिने आणि ३२,५०० रूपये रोख रक्कम असलेल्या बॅगेवर दरोडा टाकला.

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दल पोलीस अधीक्षक तुषार दोशी,अपर पोलीस अधीक्षक डॉ.वैशाली कडुकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सूचना दिल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली. तांत्रिक माहिती व घटनास्थळी मिळालेल्या माहितीवरून गुन्ह्यांचा माग काढण्यात गुन्ह्यांची मोडस शोधून काढली व गुन्ह्यांची उकल करण्यास साहाय्य मिळाले.

कोल्हापूर येथील कृष्णा कुरिअर कंपनीत टोळीमधील एक जण काम करत होता. त्याला कुरिअर कंपनीत सोने कधी केव्हा कसे पाठवले जाते याची माहिती असल्याने सराईत टोळीमधील साथीदार यांच्या मदतीने धाडसी दरोडा टाकला तो यशस्वी झाला. मात्र सातारा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर व त्यांच्या टीमने शिताफीने टोळीला जेरबंद केले.त्यांच्याकडुन दरोड्यातील ९२ तोळे सोने गुन्ह्यात वापरलेली कार, सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळाले.या कारवाईमध्ये सहायक पोलीस निरीक्षक रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, पोलीस अमलदार साबीर मुल्ला, मनोज जाधव, प्रवीण कांबळे,अजय जाधव , अमित झेंडे,प्रवीण पवार, संकेत निकम,अमृत कर्पे, विजय निकम,दलजीत जगदाळे, आनंदा भोई यांनी सहभाग घेतला.

# डॉ. रवीकांत पाटील यांच्या पुढाकाराने दुबईत मोफत आरोग्य तपासणी



मिरज,ता.२९( प्रतिनिधी)-

**दुबईतील दुबई हेल्थकेअर सिटी येथे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. रवीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हृदय आरोग्य जनजागृती अभियान राबवण्यात आले. यामध्ये दुबईत राहणाऱ्या भारतीय कामगार, महिला व सहाय्यक वर्गासाठी मोफत हृदय तपासणी, समुपदेशन, योग, आणि ध्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले.**

डॉ. रविकांत पाटील म्हणाले, हृदयरोग हे एक कटू वास्तव आहे. हृदयरोग युवकांमध्येही वाढतो आहे. आपले 'कम्युनिटी हिरोज' शहर उभारतात आणि चालवतात; पण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. ही मोहीम फक्त वैद्यकीय शिबिर नाही, हा एक संवाद आहे. हृदयरोग-मुक्त समाज घडवायचा असेल, तर कॉर्पोरेट हेल्थकेअर मॉडेलच्या पलीकडे जाऊन नागरी समुदायाशी जोडले गेले पाहिजे.डॉ. मोहम्मद अलख्यार यांनी, ताणतणाव आणि छातीत वेदना वाढण्याचा थेट संबंध स्पष्ट केला. ताण आणि धकाधकीच्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराच्या घटना वाढल्या आहेत.

डॉ. पाटील यांचा उपक्रम महत्वाचा आहे, कारण तो मुळ कारणाला हात घालणारा आहे. औषधं घेणे पुरेसं नाही तर दैनंदिन सवयींमध्ये बदल अपेक्षित असल्याचे सांगितले. यावेळी शंभरहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र, गुजरात, केरळ, आणि आंध्र प्रदेशातील अनेक कामगार, लहान व्यावसायिक, तसेच कुटुंबवत्सल महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. यातील अनेक जणांनी आजपर्यंत कधीही हृदयाची तपासणी केली नव्हती. डॉ. रवीकांत पाटील यांनी यावेळी ''स्मार्ट हार्ट स्क्रीनिंग'' जनजागृती मोहिमेची घोषणा केली. ही मोहीम दुबईभर राबवली जाणार आहे. याप्रसंगी आय. पी. ग्लोबल कन्सलटन्सीचे सल्लागार डॉ.अनिल बनकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.कार्यक्रमास डॉ. मोहम्मद एल्याझ, सोमनाथ पाटील, चंद्रशेखर जाधव, किशोर मुंढे, सचिन कदम, साक्षी मोरे, अनिल कदम, डॉ. पल्लवी कांबळे, डॉ. प्रिया, ॲड. सिद्धार्थ कांबळे, संदीप सौंदडे उपस्थित होते.

## पोलिसांच्या रजा रद्द

मुंबई,ता.२९-

**गणेशोत्सव आणि मुंबईतील मराठा आरक्षण आंदोलन यामुळे सर्व पोलिसांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. सुट्टीवर गेलेल्या सर्वपोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांनी तातडीने ड्युटीवर रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

मराठा आंदोलनासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत आल्याने बंदोबस्तासाठी सध्याची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे हा निर्णय घेतला गेल्याची माहिती आहे. मुंबई पोलिस दलातील सशस्त्र पोलिस दल नायगावच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या पत्राद्वारे हा आदेश देण्यात आला आहे.

मनोज जरांगेंच्या आंदोलानाचे स्वरूप पाहता, आंदोलकांची संख्या पाहता मुंबईत कायदा आणि सुव्यवस्थेच्या अनुषंगाने अधिक पोलिस असणे गरजेचे आहे. त्या पार्श्वभूमीवर हे आदेश काढण्यात आल्याची माहिती मिळत आहे.मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी मुंबईत अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले.

# स्पोर्ट्स सायन्स सेंटरमुळे खेळाडूंना जागतिक यशाची संधी – मंत्री आबिटकर



कोल्हापूर, ता. २९ (प्रतिनिधी)-

**अत्याधुनिक स्पोर्ट्स सायन्स सेंटरमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.** छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल( कोल्हापूर) येथे अत्याधुनिक स्पोर्ट्स सायन्स सेंटरचे उद्घाटन व संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले.

सोहळ्यास खासदार धनंजय महाडिक, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस, कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, क्रीडा मार्गदर्शक तसेच आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू उपस्थित होते.

आबिटकर म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातील क्रीडापटूंचे नवे युग सुरु होत आहे. हे अत्याधुनिक स्पोर्ट्स सायन्स सेंटर खेळाडूंना त्यांच्या कामगिरीला नवी उंची देण्यासाठी सज्ज आहे. येथील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे खेळाडूंच्या मानसिक स्वास्थ्यासह दुखापत व्यवस्थापन, पुनर्वसन आणि खेळातील तांत्रिक विश्लेषण शक्य होईल. मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडूकेंद्रित उपाययोजनांमुळे राज्यातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक पदके जिंकतील.

१६.३५ एकर जागेत असलेल्या विभागीय क्रीडा संकुलातील संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले. या संकुलात विविध क्रीडा सुविधांचा विकास करण्यात आला आहे, ज्यामुळे खेळाडूंना सर्वांगीण प्रशिक्षणाची संधी मिळेल. अत्याधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्ज असलेले हे केंद्र खेळाडूंच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करेल, ज्यामुळे त्यांच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा होईल. येथील बायोमेकॅनिकल टूल्स, फिटनेस विश्लेषण उपकरणे आणि रिकव्हरी सिस्टम्स खेळाडूंना त्यांच्या तंत्रात प्रगती करता येतील, दुखापतींची जोखीम कमी होईल आणि जलद पुनर्वसन शक्य होईल. केंद्रात आहारतज्ज्ञ आणि क्रीडा मानसशास्त्रज्ञ वैयक्तिक मार्गदर्शन देतील, ज्यामुळे खेळाडूंचा शारीरिक, मानसिक आणि तांत्रिक विकास साधला जाईल. विशेषतः ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंना या सुविधांचा मोठा लाभ होईल, कारण त्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धांसाठी आवश्यक प्रशिक्षण आणि पाठबळ मिळेल. या केंद्रामुळे खेळाडूंची कार्यक्षमता वाढेल, दुखापतींवर मात करणे सोपे होईल आणि आंतरराष्ट्रीय यशाची संधी मिळेल. येथे ट्रेडमिल, सायकल, कार्डिओ टेस्ट्स, बॉडी कॉम्पोझिशन ॲनालायझर, इसो-कायनेटिक स्ट्रेंथ टेस्टिंग, बायोमेकॅनिक्स ॲनालिसिस, स्पायरोमेट्री टेस्ट, सायकोलॉजिकल काउन्सेलिंग, न्यूट्रिशन गाइडन्स, फिजिओथेरपी आणि रिहॅबिलिटेशन यासह अत्याधुनिक सॉफ्टवेअरद्वारे तांत्रिक विश्लेषण उपलब्ध आहे. याशिवाय, आहारतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, मानसशास्त्रज्ञ आणि स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच यांच्याद्वारे प्रत्येक खेळाडूच्या वैयक्तिक गरजांनुसार टेस्ट आणि अहवाल तयार केले जातील.

# पंढरपुरात मुर्ती संकलनाचे १४ ठिकाणी केंद्र

## निर्माल्यासाठी फिरत्या वाहनांची व्यवस्था

पंढरपूर,ता.२९ (प्रतिनिधी) -

**शहरातील घरगुतीसह सार्वजनिक मंडळांच्या गणेश मूर्ती गोळा करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेतर्फे शहराच्या विविध भागात १४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्राची उभारणी केली आहे. निर्माल्य गोळा करण्यासाठी फिरत्या वाहनांची व संकलन केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी नगरपरिषदेच्या ५६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.**

विसर्जन ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात आले आहे. सद्यस्थितीत उजनी धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले असून,नदीपात्रात गणेशमूर्ती विसर्जन करताना दक्षता घ्यावी. विसर्जनाच्या वेळी लहान मुलांना नदीपात्रापासून दूर ठेवावे. पावसामुळे घाटावरील पायऱ्या निसरड्या होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी दक्षता घेवून सुरक्षित विसर्जन करावे, तसेच सुरक्षेच्यादृष्टीने विसर्जनासाठी प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवरच विसर्जन करावे असे आवाहनही मुख्याधिकारी रोकडे यांनी केले आहे.

अर्बन बँक प्रशासकीय इमारतीसमोर, भोसले चौक गणेश मंदिरासमोर, शेटे पेट्रोलपंपा समोर, कॉलेज चौक बस स्टॉप जवळ, ठाकरे चौक, सावरकर चौक गजानन मेडिकल समोर, शिवतीर्थ शिवाजी महाराज चौक, महात्मा फुले पुतळ्यासमोर, महाद्वार चौक पोलीस चौकी जवळ, मुक्ताबाई मठ, अंबाबाई पटांगण, अहिल्या पुलाजवळ टेंभुर्णी रस्ता, यमाई तलाव गेट जवळ टाकळी रोड तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग जवळ या ठिकाणी घरगुतीसह सार्वजनिक गणेश मंडळाच्या मूर्ती गोळा करण्यासाठी संकलन केंद्र उभारण्यात आले आहेत.

# इचलकरंजी-बागलकोट एसटी सदलगा मार्गे सुरू

सदलगा,ता.२९ (प्रतिनिधी)-

**बागलकोट - इचलकरंजी - बागलकोट ही पहिल्यांदाच सदलगा मार्गे वायव्य कर्नाटक परिवहन महामंडळाची एस टी बस सुरू करण्यात आली आहे. ही बस बागलकोट (नवनगर) मधून निघून गद्दनकेरी क्रॉस, कलादगी, लोकापूर, मुधोळ जमखंडी, बनहट्टी, रबकवी, तेरदाळ, हारुगेरी क्रॉस, रायबाग, अंकली, सीबी कोरे शुगर फॅक्टरी, एक्संबा, सदलगा, बोरगांव, इचलकरंजी या मार्गावरुन धावणार आहे.**



बागलकोटहून ही बस सकाळी ७.३० वाजता निघून दुपारी १२.४५ वाजता इचलकरंजीत पोहोचेल तर इचलकरंजीतून दुपारी १.३० वाजता निघून वरील मार्गावरुन बागलकोट (नवनगर) येथे संध्याकाळी ६.४५ वाजता पोहोचणार आहे. ही एसटी बस सेवा आंतरराज्य व्यापार, उद्योग, रोटीबेटी, शिक्षण, उच्चशिक्षण, शेतीविषयक अभ्यासदौरा यांसाठी उपयोगी ठरणार आहे. यावेळी लक्ष्मण भगवती (वाहक), लक्ष्मण राठोड (चालक) यांचा सत्कार झाला. ही बस आमदार गणेश हुक्केरी यांच्या मार्गदर्शनाखाली, वायव्य कर्नाटक राज्य रस्ते सारिगे संस्थेचे अध्यक्ष राजू कागे, बागलकोट विभागीय नियंत्रक नितीन हेगडे, डिव्हिजनल ट्रॅफिक ऑफिसर हेमसिंग लमानी, डेपो मॅनेजर (बागलकोट) कृष्णा चव्हाण, निगम अध्यक्ष व आमकार्यदर्शी पी.आर.किरणगी यांच्या सहकार्याने सुरू होत असल्याचे माजी नगरसेवक पिरगोंडा पाटील यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक रवी गोसावी, महादेव पाटील, पुंडलिक पाटील, बस स्थानक अधिकारी शंकर नेर्ली, आण्णासाहेब कदम, तात्यासाहेब कदम, मकरंद द्रविड, राजेंद्र कोंडेबेट्ट, मनिष नाईक, रणजीत जगताप, पांडू कामकर यांच्यासह प्रवासी, नागरिक उपस्थित होते.

## देखाव्यातून शाळांच्या दुरूस्तीकडे वेधले लक्ष

रत्नागिरी,ता.२९ -

**कुवारबाव येथील वर्तक कुटुंबीयांनी यावर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरूस्तीकडे चलचित्रातून लक्ष वेधले आहे.**

इकोफ्रेंडली गणेशोत्सवाचे हे सतरावे वर्ष आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्तक कुटुंबीयांकडून इकोफ्रेंडली देखाव्यातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शालेय इमारतींची जीर्णावस्था आणि त्यांच्या दुरुस्तीची नितांत गरज ही यावर्षीच्या देखाव्याची संकल्पना आहे. गणेशोत्सवात गणपती बाप्पाच्या चरणी कोटीकोटींचे दान करणाऱ्या गणेशभक्तांना शाळेच्या दुरुस्तीसाठी दान करण्याचे आवाहन करण्याचा प्रयत्न या चलचित्र देखाव्यातून केला आहे.

# शिराळा नगरपंचायत निवडणुकीत वोट फिक्सिंग होण्याची शक्यता

अॅड.सम्राट शिंदे

शिराळा,ता.२९ (प्रतिनिधी)-

**शिराळा नगरपंचायत येथे अॅड. सम्राट शिंदे व सत्यजित कदम यांनी घेतलेल्या हरकतीवर सुनावणी झाली. उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघुनाथ पोटे यांच्यासमोर ही सुनावणी झाली.**



अॅड. सम्राट शिंदे यांनी, या सुनावणी दरम्यान शिराळा शहरातील प्रभाग रचनेवर म्हणणे मांडताना सांगितले की, सार्वजनिक निवडणुकीचा आराखडा गत निवडणुकीप्रमाणेच असल्याचा दिसून येतो. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे सर्व प्रभागांमध्ये पाच ते दहा टक्के मतदारांचा फरक असू शकतो. परंतु शिराळा शहरातील प्रभाग १७ मध्ये लोकसंख्येच्या निकषानुसार मतदार संख्येत विशेष फरक जाणवतो. या अशा तफावत असणाऱ्या प्रभाग रचनेमुळे लोकसंख्येस योग्य प्रतिनिधित्व मिळणार नाही. शहरात लोकसंख्या गणना आहे पण मतदान नाही. तसेच प्रभाग रचनेमध्ये निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. शिराळा शहरातील प्रभागांचे क्षेत्र सलग आणि आटोपशीर असणे गरजेचे आहे. छोट्या गल्ल्यांच्या आधारित सीमांकन करण्यात आलेले आहे. या पद्धतीची प्रभाग रचना असल्यास मूलभूत अधिकारावर गदा येणार आहे. सद्यस्थितीतील प्रभाग रचनेमध्ये वोट फिक्सिंग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. फिक्सिंग होत असेल तर आपला योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी अडथळे निर्माण होऊ शकतात. सुनावणीनंतर नागरिक आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यात औपचारिक बैठक झाली. यामध्ये रणजीतसिंह नाईक, विश्वास उर्फ बड्डा कदम, विश्वदिप नाईक, अजय जाधव, बसंतराव कांबळे, निलेश आवटे, अविनाश खोत, दीपक शिंदे व नागरिकांनी प्रारूप आराखडा विषयी मत व्यक्त केले. यावेळी नगरपंचायत चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज कांबळे, आबाजी दिवाण, शहर अभियंता अभिजीत पाटील, काजल शिंदे व नगरपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.

# मिलिंद काळे यांना डॉ. डी.वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार जाहीर

कोल्हापूर,ता.२९ -

**डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून सन २०२५- २६ साठीचा डॉ.डी.वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सी.ए. मिलिंद काळे यांना जाहीर झाला आहे.**

सोमवारी १ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या २० व्या स्थापना दिनी आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसचे महासंचालक लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान प्रदान केला जाणार असल्याची माहिती कुलपती डॉ. संजय पाटील व कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी दिली.

या समारंभास डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील यांची उपस्थितीत राहणार आहेत. विद्यापीठाच्या २० व्या स्थापना दिनी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठ प्रांगणात ध्वजवंदन व विद्यापीठ गीत होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता हॉटेल सयाजीच्या मेघ मल्हार सभागृहात पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. यावेळी जीवन गौरव पुरस्कारासह, आदर्श शिक्षक, आदर्श सेवक, गुणवंत विद्यार्थी असे विविध पुरस्कार प्रदान केले जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी दिली. सीए मिलिंद काळे यांनी प्रतिकूल परिस्थितीत चार्टर्ड अकाउंटन्सी, कॉस्ट अकाउंटन्सी, बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, एमबीए फायनान्स आणि पत्रकारिता असे पाच व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. १९८३ साली त्यांनी स्वतःची चार्टर्ड अकाउंटन्सी प्रॅक्टिस सुरू केली. १९९९ पासून ते कॉसमॉस बँक संचालक तर २०१५ पासून बँकेचे अध्यक्ष होते. काळे यांच्या नेतृत्वाखाली बँकेला २०२३-२४ या वर्षासाठी 'सर्वोत्कृष्ट सहकारी बँक' पुरस्कार मिळाला. बँकिंग सेवा, अर्थकारण, व्यवस्थापनसह विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल काळे यांची विद्यापीठातर्फे 'डॉ. डी वाय पाटील जीवन गौरव' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# निपाणीत पर्युषण पर्वाची वरघोडा मिरवणुकीने सांगता

निपाणी,ता.२९ (प्रतिनिधी)-

**येथील जैन श्वेतांबर मूर्ती पूजक संघातर्फे पर्युषण पर्वानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी वरघोडा मिरवणूक आणि महाप्रसादाने पर्युषण पर्वाची सांगता झाली.**



**पर्युषण पर्वाच्या सांगता समारंभानिमित्त काढण्यात आलेली वरघोडा मिरवणूक.**

पर्युषण पर्वात धार्मिक अनुष्ठान, जप, तपश्चर्या, भक्ती असे विविध कार्यक्रम झाले. सकाळी संघाचे स्वामी वात्सल्य झाले. आदीगणा यांच्या निश्रावरती साध्वी भगवान ललीतरेखा यांच्या सानिध्यात आणि संघाचे प्रमुख कांतीलाल कोठडीया, उपप्रमुख सतीशभाई शहा, संघाचे गुरुजी अरविंदभाई, ट्रस्टी व श्रावकांच्या उपस्थितीत ५२ जिनालय पासून वरघोडा रथयात्रेला मिरवणुकीने प्रारंभ झाला. गुरुवार पेठ, कोठीवाले कॉर्नर, अशोक नगर, जुना पीबी रोड, नगरपालिका कार्यालय, दलाल पेठ, तानाजी चौक, जुना मोटर स्टँड, नेहरू चौक, महादेव गल्ली, गांधी चौक रविवार पेठ, बस्ती गल्ली, गुरुवार पेठ मार्गे मंदिरात मिरवणूक आणली. त्यामध्ये शहर व परिसरातील श्रावक श्राविका सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर महाप्रसाद वाटपाने सोहळ्याची सांगता झाली.

## महारक्तदान शिबिर व रानभाजी पाककृती स्पर्धा

गारगोटी, ता. २९ (प्रतिनिधी)-

**संवेदना फाऊंडेशनतर्फे महारक्तदान शिबिर व रानभाजी पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**

शिबिरामध्ये तब्बल १६० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. सर्व रक्तदात्यांचा संवेदना फाऊंडेशनतर्फे गौरव करण्यात आला. हे शिबिर संजीवनी ब्लड बँक, (कोल्हापूर) यांच्या सहकार्याने झाले. या उपक्रमासाठी डॉ. प्रवीण निंबाळकर, डॉ. सुरजीत पांडव, संजय हरेर, संवेदना संजिवनी टीम सदस्य यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक डॉ. धनाजी राणे यांनी केले. पाककृती स्पर्धेचे उद्घाटन डॉ. मधुकर बाचुळकर यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत ४७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. नव कृष्णा व्हॅली स्कूल (उत्तूर)च्या विद्यार्थ्यांनी रानभाजी रोपांचे माहितीपर प्रदर्शन मांडून उपस्थितांचे लक्ष वेधले. अध्यक्षस्थानी संवेदना फाऊंडेशनचे अध्यक्ष आण्णाप्पा पाटील होते. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मोहन माने, अॅड. एम. ए. पाटील, धनश्री देसाई व शुभांगी निर्मळे यांनी काम पाहिले. यासाठी गिरीधर रेडेकर, अमोल रेडेकर, महेश पाटील, सिद्धेश गिलबिले व रमेश सावंत यांनी योगदान दिले. सूत्रसंचालन संतराम केसरकर यांनी केले. आभार गिरीधर रेडेकर यांनी मानले.

# पुन्हा पावसाची हजेरी; गणेशोत्सवावर विरजण

बारवाड, ता.२९(प्रतिनिधी)-

**गेली आठ दिवस पावसाने विश्रांती दिली होती. त्यामुळे नदीतील पाणीही पात्रात जाऊन सर्व पुलावरील वाहतूक सुरू झाली होती. तर शेतीतील कामे करण्यास चांगली घात आल्याने शेतकरी भांगलणीच्या कामाबरोबरच इतर कामे आवरून घेत असतानाच आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. गणेशोत्सवात पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने गणेशोत्सवाच्या आनंदावर एकप्रकारे विरजण पडले, असे म्हणायची वेळ आली आहे.**

गेल्या पंधरा दिवसापूर्वी सर्वत्र पावसाने हाहाकार माजवला होता. त्यामुळे सर्वच नद्यांना महापूर येऊन जनजीवन विस्कळीत झाले होते. मात्र मध्यंतरी आठ दिवस पावसाने विश्रांती घेतली, तेव्हा नद्यांचे पाणी उतरून जनजीवन सुरळीत झाले. पण आता पुन्हा पावसाने सुरुवात केल्याने नद्यांचे पाणी वाढले आहे, त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिक हतबल झाले आहेत. सध्या सर्वत्र गणेशोत्सवाला सुरुवात झाली आहे. सर्वच गावातून गणेश मंडळांचे कार्यकर्ते आपापल्या परीने गणपती समोर विविध देखावे, महाप्रसाद, आरती असे कार्यक्रम करण्यासाठी धडपडत आहेत. पण हे कार्यक्रम करण्यास पावसामुळे व्यत्यय येत असल्याने कार्यकर्त्यांत नाराजी दिसत आहे. त्यामुळे या उत्सवात तरी तुझे बरसणे थांबव रे बाबा असे गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांबरोबर नागरिकांतून बोलले जात आहे.

# पंढरपुरात रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

## वाहनधारक त्रस्त,प्रशासन सुस्त

पंढरपूर,ता.(प्रतिनिधी) -

**अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूर मध्ये नुकतीच आषाढी यात्रा संपन्न होऊन दोन महिने होत नाही तोपर्यंत आषाढी यात्रेत प्रशासनाने शहराच्या विविध भागांमधील रस्ते दुरुस्ती दर्जेदार पद्धतीची करून घेतली होती. अनेक ठिकाणी नव्याने रस्त्याचे टेंडर काढण्यात आले. परंतु या सर्व रस्त्यावर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य दिसून येत आहे.**

पंढरपूर शहराच्या स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, सावरकर चौक ते इंदिरा गांधी चौकाकडे जाणारा रस्ता, सरगम चौक ते कॉलेज चौकाकडे जाणारा रस्ता, सरगम चौक ते अहिल्या पुलाकडे जाणारा रस्ता या सर्व रस्त्यावर सध्या मोठ्या प्रमाणात खड्डे असल्याने खड्ड्यात रस्ता कि रस्त्यात खड्डे असे दृश्य पाहायला मिळत आहे.

पावसामुळे अशा खड्ड्यामधून तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने पाण्यामध्ये रस्ते दिसत नाहीत. अनेक वेळा वाहनधारकांना या मार्गातून जाताना कसरत करावी लागते. पंढरपूरातील प्रशासन सध्या सुस्त असल्याचे पाहायला मिळत आहे. दोन महिने होत नाही तोपर्यंत दर्जेदार रस्ते हे निकृष्ट झाल्याचे पुरावेच या खड्ड्यानी दिले असल्याचे दिसून येत आहे. शहरातील तसेच बाहेर गावाहून पंढरपुरात आलेले वाहनधारक व उपनगरातील नागरिक मात्र अशा खड्ड्यातून वाहन चालवताना त्रस्त होताना दिसत असल्याचेही पहावयास मिळते. परंतु तीर्थक्षेत्र पंढरपूरात दर्जेदार रस्त्यासाठी आलेला निधी वापरला गेला. परंतु रस्ते दर्जेदार नसून निकृष्ट असल्याचे सध्या सर्व जनतेला पाहायला मिळत आहे.



# जोतिर्लिंग मंडळाचा स्तुत्य उपक्रम ; पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

धामोड ,ता.२९ (प्रतिनिधी)-

**सावतवाडी (ता. राधानगरी) येथील जोतिर्लिंग मंडळाने गणेश चतुर्थी दिवशी गणपती प्रतिष्ठापना करत पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी वृक्षारोपण करून समाजापुढे वेगळा आदर्श निर्माण केला.**

स्व. गणपती वडाम यांच्या प्रेरणेतून या मंडळाने गेली अनेक वर्षे पर्यावरण पूरक गणेश उत्सव व विविध उपक्रम सुरु केले होते, तीच परंपरा मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग मगदूम, उपाध्यक्ष नामदेव सावंत यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी आजअखेर चालू ठेवली आहे.

ग्रा.पं सदस्य संभाजी वडाम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी गावा सभोवती हिरवाई वाढविणे, प्रदूषण नियंत्रण करणे, गाव प्लास्टिक मुक्त करणे, ग्राम स्वच्छता तसेच भावी पिढीसाठी निरोगी वातावरणात निर्माण व्हावे हा संकल्प दृढ करण्यासाठी वड, आंबा, फणस, चाफा, पिंपळ, तुळस, जांभूळ, खैर अशा विविध रोपांची लागवड गावासभोवती केली आहे.

# विट्याचा राजाच्या आरतीचा मान नाभिक समाजाला

## गणेश मंडळाने दिला सामाजिक ऐक्याचा संदेश

विटा,ता.२९ ( प्रतिनिधी)-

**येथील विट्याचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून नाभिक समाजाला शुक्रवारच्या आरतीचा मान देण्यात आला. याप्रसंगी विट्याचा राजा गणेश मंडळाचे अध्यक्ष अमोल बाबर, नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय गायकवाड, श्रीधर जाधव, राजू जाधव, संजय गायकवाड, महादेव गायकवाड उपस्थित होते.**



**विट्याचा राजा सार्वजनिक गणेश उत्सवाच्या आरतीला उपस्थित नाभिक समाज बांधव आणि महिला.**

अमोल बाबर म्हणाले, नाभिक समाजाला विट्याचा राजा मंडळाने आज महाआरतीचा मान दिला, ही केवळ परंपरेची नव्हे तर सामाजिक ऐक्याची जपणूक करण्याची पावले आहेत. प्रत्येक समाज घटकाला सन्मानाने स्थान मिळाले पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. आज महिला आणि पुरुष दोघांच्याही डोळ्यांत आनंद पाहून आम्हालाही अभिमान वाटला. पुढील काळातही अशा उपक्रमातून समाजातील एकोपा व बंधुभाव वृद्धिंगत करण्याचे कार्य सुरू ठेवू.

विट्याच्या राजाच्या आरतीचा मान दिल्यामुळे नाभिक समाज बांधवांनी अमोल बाबर, कार्याध्यक्ष आ. सुहास बाबर व पप्पू कदम यांचे आभार मानले. विट्याचा राजा मंडळाने दिलेला हा सन्मान आम्हाला आत्मविश्वास देणारा आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने स्थान देण्याचा हा एक मोठा संदेश आहे, असे मत दत्तात्रय गायकवाड, श्रीधर जाधव यांनी व्यक्त केले.

यावेळी संजय गायकवाड, महादेव गायकवाड, संदीप साळुंखे, अशोक काळे, संपत गवळी, जालिंदर गवळी, तुकाराम धारेकर, गजानन गायकवाड, माजी सरपंच हेमंत सुर्यवंशी, सम्राट गायकवाड, योगेश गायकवाड, राहुल गायकवाड, अजित काशीद, विनोद काशीद, बबलू काशीद, वैभव काशीद, उद्धव कदम, रवी कदम, प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलवा : आ.आवताडे

पंढरपूर,ता.२९ (प्रतिनिधी) -

आमदार समाधान आवताडे यांनी सकल मराठा समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत राज्य सरकारकडे विधिमंडळाचे एक दिवशीय विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे. राज्यातील मराठा समाजास आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सकल मराठा समाज मुंबई येथील आझाद मैदानासह मुंबई शहरामध्ये आंदोलनासाठी पुन्हा एकदा एकवटला असून गरजवंत सकल मराठा समाजास आरक्षण मिळाले पाहिजे अशी सकल मराठा समाजाची तीव्र मागणी आहे. ही मागणी लक्षात घेऊन राज्य सरकारने मराठा समाजास आरक्षण मिळणेकरीता राज्य विधीमंडळाचे एक दिवशीय विशेष अधिवेशन बोलवावे अशी मागणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. ६४९/१४/फ याचे एकूण क्षेत्र ० हे. १४ आर, आकार १ रु.८२ पै. यापैकी मंजुर उपविभागणी नकाशानुसार भुखंड क्र. १ याची मोजमापे पुर्व बाजू ३२.५ फुट, पश्चिम बाजू ३२.५ फुट, दक्षिण बाजू ६२ फुट व उत्तर बाजू ६२ फुट याचे १८७.२७ चौ.मी.ची खुली मिळकत सर्व यासी चतु:सिमा पुर्वेस - मंजुर उपविभागणी नकाशानुसार प्लॉट नं.२ ची मिळकत, पश्चिमेस- सरकारी रस्ता, दक्षिणेस- श्री. जोतगोंडा पाटील यांची मिळकत, उत्तरेस- सरकारी रस्ता. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही सौ. तनुजा तानाजी खांडेकर रा.इचलकरंजी यांचे मालकीची असून ती आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारुन करारपत्र करुन दिले आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालक यांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदी, बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस.

ता. २९/०८/२०२५.

**अॅड. गिरीश एन. मुदगल**

१२/१७८, कॉंग्रेस कमिटी मागे, इचलकरंजी.

मो. ९३२५४९३९४६.

### जाहीर नोटीस

ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील क.ग.नं. १९८ पैकी बिगरशेती प्लॉट नं. ०३ अंदाजे क्षेत्र १३८-० चौ.मी. १४८५-० चौ. फुट ची खुली जागा मिळकत सर्व . यासी चतु:सिमा - पुर्वेस- कोंडीग्रे गावची हद्द, पश्चिमेस - प्लॉट नं. ६ ची मिळकत, दक्षिणेस- प्लॉट नं. २ व ७ ची मिळकत व उत्तरेस - २० फुट रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत सर्व ही १) श्री. गजानन रावबा यादव व २) श्री. बाबगोंडा जिनगोंडा पाटील दोघेही रा. कुरुंदवाड यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिल यांना कायम व खुष खरेदी देणेचे ठरवुन तसे खरेदीपूर्व करारपत्र करणार आहेत. वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळाही यादव व पाटील यांनी आमचे अशिल यांना दिलेला आहे.

सबब, वर नमुद मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही करार, वारस, वाटणी, कर्ज, बोजा, हक्क, संबंध, दावा, गहाण, दान, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, करार, पोटगी, अग्रहक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्कसंबंध अथवा अधिकार असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात (७) दिवसाचे आत खाली नमुद पत्यावर अस्सल कागदपत्रे पुराव्यानिशी समक्ष संपर्क साधुन खात्री पटवून द्यावी मुदतीत कोणाचीही तक्रार अगर हरकत न आलेस आमचे अशिल सदर मिळकतीबाबतचे खरेदीचा कायदेशीर व्यवहार / दस्त पुर्ण करतील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमच्या आशिलांचे हक्कावर बंधनकारक असणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक-२९/०८/२०२५

**अॅड. बाबासो एम.पाटील**

नोटरी (भारत सरकार)

वार्ड नं.१७/७७ स्वामी विवेकानंद कॉलनी,

शाहू पुतळ्या जवळ , इचलकरंजी. मो. ९२२६८८७००१

### जाहीर नोटीसीस हरकत

दै. पुढारीचे मास इचलकरंजी पा.नं. ३ वर दि. १२/०८/२०२५ इ. रोजी अॅड. किरण बा.हुपरे रा.रुई यांचेवतीने मौ. कबनूर येथील क.ग.नं.८११ पैकी पुर्व बाजुची ११००० चौ. फूटाची जन्नतबी आब्बास मुजावर रा. कबनूर यांचे शेतमिळकतीबाबत प्रसिध्द नोटीसीस हरकत अशी की,

वर नमूद मिळकत ही मुळची युसुफ मुजावर यांचे मालकीची असून त्याबाबत आमचे अशिलांनी इचलकरंजी येथील दिवाणी न्यायालयात रे.क.नं.२०३/२०२४ चा वाटणीचा व मनाईचा दावा दाखल केला असून त्यामध्ये प्रतिवादी नं.११ या जन्नतबी मुजावर आहेत. सदरचा दावा प्रलंबित असून आमचे अशिलांचा हिस्सा निश्चित झाले खेरीज व्यवहार केलेस त्या व्यवहाराबाबत निर्वेध मालकी येणार नाही.

सबब वरिल मिळकतीबाबत आमचे अशिल हमिदा बाबु मुजावर रा. कबनूर यांचे लेखी संमतीशिवाय कोणीही कसलाही व्यवहार करू नये याची नोंद घ्यावी म्हणून दिली हरकत नोटीस. स.

ता. २९/०८/२०२५.

**अॅड. श्रीधर ए. पाटील**

पत्ता - मु.पो. टाकवडे,

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

मो.नं.-९८५०२१४७०६

### जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गट नं. ६९-७० पैकी सेक्टर- सी प्लॉट नं. १०९ व ११० चे एकत्रित क्षेत्र-९००-० चौ. मी . खुली जागा व शेड मिळकत संपुर्ण. यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. १११ ची मिळकत, पश्चिमेस-प्लॉट नं. १०८ ची मिळकत, दक्षिणेस-प्लॉट नं.९३ व ९४ ची मिळकत, उत्तरेस- ५० फुट रस्ता .येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत हि मारुती कृष्णा गायकवाड व जोतिराम कृष्णा गायकवाड रा. खोतवाडी यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही

ता.२९/०८/२०२५.

**अॅड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता- गाळा नं.०८, बालाजी पार्कींग, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.

मो. ७८२०९०९७०५

### जाहीर नोटीस

जि. व तु.कोल्हापूर, पो.तु.हातकणंगले पैकी मौजे आळते येथील क. ग. नं. १६४७/२ क्षेत्र ०.७६.०८, आकार रु.५.१६ पै यापैकी क्षेत्र हे. ०.१०.०० आर यांसी चतु:सिमा पुर्वेस :- सदर नंबरपैकी १२ फूट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस :- जंबू मोने यांची मिळकत, दक्षिणेस : प्लॉ.नं. १९ ची मिळकत, उत्तरेस :- प्लॉ.नं.२१ची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत रेखादेवी किशनचंद कलानी रा. कोल्हापूर यांचे मालकीची असून त्यांनी श्री. राजेंद्र उध्दव घट्टे, रा. इचलकरंजी यांना करारने देऊ केली आहे. सदर करारपत्राआधारे मिळाले हक्क अधिकारानुसार श्री.घट्टे यांनी आमचे अशिलांना मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून खरेदी देणेबाबत लेखी करारपत्र करुन त्यांचेकडून भरीव संचकार स्विकारला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचा तारण, गहाण, मालकी, लिज, बोजा, वारसा, इजमेंट वगैरे हक्क असलेस ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत आपले हकाचा खुलासा करावा. मुदतीत कोणाची तक्रार आली नाही तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता.२९/८/२०२५.

**अॅड. सचिन दामोदर सवदी**

महालक्ष्मी पसायदान अपार्टमेंट, गावभाग,हरी मंदिर समोर, इचलकरंजी - ४१६११५.

मो. ९०७५००४०८१



वार्षिक सभेप्रसंगी सभासदांच्या मुला-मुलींसाठी गुणवत्तेनुसार बक्षीस देत असताना सर्व संचालक मंडळ.

## दि प्रकाश नागरी पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

इचलकरंजी,ता.२९-

**येथील दि प्रकाश नागरी सह. पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न झाली. प्रारंभी संस्थेचे संचालक राजेंद्र बचाटे यांनी प्रास्ताविक व सभासदांचे, मान्यवरांचे स्वागत केले.**

सभेस जनता बँकेचे संचालक व उद्योगपती बंडोपंत लाड या प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक रामचंद्र हावळ यांनी लक्ष्मी प्रतिमेचे पूजन केले. चेअरमन कृष्णात धुत्रे यांनी अहवाल वाचन करताना संस्थेस २० लाख इतका नफा झाल्याचे सांगितले व सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर केला. संस्थेचे सचिव सुर्यकांत खावट यांनी विषय वाचन केले त्यास सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. संचालकांच्या हस्ते सभासदांच्या मुला- मुलींना गुणवत्तेनुसार वही व पेन यांचे वाटप करण्यात आले. सदर सभेस व्हा.चेअरमन विजय हावळ, संचालक बाळकृष्ण पोवळे, श्रीकांत निमणकर, गजानन माने, मदन निमणकर, आनंदा सुस्वरे, विजय ढाले, दत्तात्रय ठिगळे, बाबूराव पाटील, सौ.विमल खारगे, श्रीमती मालती खावट, सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने सभासद हजर होते.

## संत गजानन महाराज मंदिरात पुण्यतिथी सोहळा उत्साहात

इचलकरंजी,ता.२९-

**येथील लोक भावनेतून साकारलेल्या ब्रम्हचारीनी कु. मंदाताई नवरे यांच्या संत गजानन महाराज मंदिरात श्रींचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

या सोहळ्यानिमित्त गुरुवार ता.२८ रोजी सकाळी श्रींना दुग्धाभिषेक सौ. व श्री संग्रामसिंह काटकर यांचे हस्ते करण्यात आला. नित्यआरती होवून सामुदायिक पारायण झाले. सकाळी ११ ते १२.१५ वा युवा किर्तनकार दिपक बरगाले व सहकारी यांचे किर्तन झाले. दुपारी १२.१५ वा. श्रींची आरती सौ. व श्री संदेश पंतोजी यांचे हस्ते मंत्रपुष्पांजली, धावा पृष्पवृष्टी होवून माजी मंत्री प्रकाश आवाडे, मुकुंद फाटक, कल्लाप्पाण्णा गावडे, किरण दंडगे, जाखोटीया शेठ आदी मान्यवरांच्या हस्ते भक्तांना प्रसादाचे वाटप झाले. संध्याकाळी ५ वा. पालखी सोहळा होवून कार्यक्रमाची सांगता झाली. याकामी राजू हिरेमठ, उमेश जाधव, नागेश शेरीगार, नितेश जाधव, विनायक तबीब, दिपक वस्त्रे, महेश गोमेवाडीकर आदींचे सहकार्य लाभले. यावेळी महिला भक्तांची संख्या अधिक होती, अशी माहिती मंदिराचे भाऊसो पाटील यांनी दिली आहे.



बुध्दिबळ स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थीनी मृणाल पांडव हिचा सत्कार करताना प्रमुख मान्यवर व शिक्षक वर्ग.

## जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी मृणाल पांडव हिची निवड

कबनूर,ता.२९-

**येथील कबनूर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित हातकणंगले तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात पार पडली.**

सदर स्पर्धेत व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल, कबनूरमधील खेळाडू मृणाल सुशांत पांडव हिने १४ वर्षे मुली वयोगटात तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच तिची नृसिंहवाडी येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशस्वी विद्यार्थिनीचे संस्थेचे चेअरमन दीपक राठी, व्हा.चेअरमन रामजी मुंदडा, सेक्रेटरी कमलेश राठी, ट्रेझरर महेश भुतडा, जॉ.सेक्रेटरी राजेश लोया, तसेच स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.स्मिता बेडक्याळे यांनी कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. सदर खेळाडूस क्रीडाशिक्षक अमोल थोरवत, सुधाकर वायदंडे, आर. बी. पाटील, सुजाता निंबाळकर,सौ.स्नेहा परीट यांचे मार्गदर्शन लाभले.

## आनंदराव नाईक गुणवत्ता पुरस्काराचे मंगळवारी वितरण

शिराळा,ता.२९ (प्रतिनिधी)-

**चिखली (ता. शिराळा) येथील विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक कै. आनंदराव नाईक जयंतीनिमित्त २ सप्टेंबर रोजी आनंदराव नाईक गुणवत्ता पुरस्काराचे वितरण होणार आहे.**

कै. आनंदराव नाईक यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त विश्वास उद्योग व शिक्षण समुहामार्फत आयोजन केले आहे. कारखाना स्थळावरील चिंतन मंडपात मंगळवारी २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होईल. प्रसिद्ध वक्ते व ज्येष्ठ पत्रकार श्री. संजय आवटे यांच्या हस्ते केंद्रीय व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत तसेच तत्सम स्पर्धा परीक्षा व इतर निवड झालेल्या गुणवंतांना पुरस्काराचे वितरण होणार आहे. अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक आहेत.

'विश्वास' कारखाना व सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक, 'विश्वास'चे उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील - सरूडकर , विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह नाईक, कारखान्याचे कार्यकारी संचालक अमोल पाटील, आनंदराव नाईक पतसंस्थेचे अध्यक्ष सुनील कवठेकर यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी कार्यक्रमासाठी उपस्थित असतील.

# कोल्हापूर शहरातील पाणीबाणीला जबाबदार कोण ?

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**कोल्हापूरवासियांना नियमितपणे स्वच्छ व पुरेसे पाणी मिळावे म्हणून ४८८ कोटी रुपयांची योजना राबवूनही शहर आज तहानलेलेच आहे.कोल्हापूर हा पाणीदार जिल्हा अशी राज्याला कोल्हापूरची ओळख आहे. मात्र याच पाणीदार जिल्ह्यात ऐन सणासुदिच्या काळात लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.आया-महिलांना रस्त्यावर उतरावे लागते, ही खरी शोकांतिका आहे. पाण्याचे आगार असणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यात एक दिवसा आड पाणी मिळणे, या सारखे दुर्दैव ते कोणते.**

महापालिकेने काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेचे पाणी नोव्हेंबर २०२३ मध्ये कोल्हापुरात आणले गेले. राजकारणात अडकलेल्या या योजनेचे पाणी कोल्हापुरात आल्यानंतर राज्यकर्त्यांनी जल्लोष केला, प्रशासनानेही ढोल बजावले,पण अल्पावधीतच या योजनेमध्ये वारंवार या ना त्या कारणांनी तांत्रिक बिघाड सुरु झाला. ही योजना सुरु झाल्यापासून गळती, लिकेज यासह अन्य कारणांनी या योजनेचे पाणी नियमितपणे मिळण्यात अडचणींचा डोंगरच उभा आहे. त्याला महापालिकेने त्याचे तांत्रिक बिघाड असे नामकरण केले आहे, त्याचा परिणाम कोल्हापूर शहरातील नागरिकांना भोगावा लागत आहे.ऐन गणेशोत्सवाच्या काळात कोल्हापूरकरांना पाण्यासाठी रस्त्यावर यावे लागते ही बाब महापालिका प्रशासनावर नामुष्की आणणारी आहे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते,याचे सोयरसुतक ना राज्यकर्त्यांना, ना महापालिका प्रशासनाला, ना महापालिकेच्या अभियंत्यांना.या योजनेवर



कोट्यवधी रुपये खर्चून काय उपयोग, नेमकी योजना कोणासाठी अशी विचारणा नागरिकांमधून होत आहे.

काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजना वारंवार तांत्रिक बिघाड तसेच काही ना काही कारणांनी सतत बंद पडत असेल तर नागरिकांना होणाऱ्या नाहक त्रासाला जबाबदार कोण, या योजनेचा महापालिकेने तसेच राजकीय मंडळींनी मोठा गाजावाजा केला, मात्र या योजनेमुळे नागरिकांना पाण्यासाठी रस्त्यावर यावे लागत आहे, हे अपयश महापालिका प्रशासनाचे नव्हे काय

**▌थेट पाईपलाईन योजनेला गळतीचे विघ्न कायम**
**▌पाण्यासाठी वणवण फिरण्याची नागरिकांवर वेळ**

सर्व क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या कोल्हापूरला ही बाब शोभादायक नाही.जुनं ते सोने या उक्तीनुसार शिंगणापूर व बालिंगा पाणी योजना बरी म्हणायची वेळ नागरिकांवर आली आहे.

कोल्हापूरला पाणी पुरवठा करणारी बालिंगा, शिंगणापूर या पायाचा दगड असणाऱ्या योजनेकडे महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले. ही योजना पर्यायी योजना म्हणून कार्यरत ठेवली असती तर आज शहरावर पाणीबाणीची वेळ आली नसती. थेट पाईपलाईन योजनेवर बारेमाप पैसा खर्चूनही योजनेला तांत्रिक बिघाडाचे लागलेले ग्रहण कधी सुटणार हा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

थेट पाईपलाईनमुळे कोल्हापूरकरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल, अशी भाबडी आशा बाळगून नागरिक होते. मात्र या ना त्या कारणांनी योजनेत बिघाड होऊन योजनेचा पाणीपुरवठा बिस्कळीत होऊ लागला आहे. आतापर्यंत उन्हाळ्यात महिन्यातून एक, दोन दिवस पाणी पुरवठा बंद व्हायचा , आता मात्र भर पावसाळ्यात योजनेतून पाणीपुरवठा होत नाही, म्हणून महापालिकेने एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे जाहीर करुन स्वतःहूनच पालिकेच्या पाणीपुरवठा विभाग हा कुचकामी असल्याचे जनतेसमोर जाहिरच केले, अशी चर्चा कोल्हापूरवासियांमध्ये रंगू लागली आहे.

# हातकणंगले तालुक्यातील आरोग्य सेवा विस्कळीत

**१२४ कंत्राटी कामगार संपावर गेल्याचा परिणाम**

हातकणंगले,ता.२९(प्रतिनिधी)-

**हातकणंगले तालुक्यातील कंत्राटी कामगारांना नियमित करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी यांनी पुकारलेल्या संपामुळे हातकणंगले तालुक्यात १२४ कर्मचारी संपावर गेले आहेत त्यामुळे तालुक्यातील आरोग्य सेवा पूर्णत: विस्कळीत झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.**

हातकणंगले तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र १० असून उपकेंद्रे ४६ आहेत तर आरोग्य पथके २ आहेत तसेच आयुर्वेदिक दवाखाना एक आहे यामधील ६३ कर्मचारी संपावर गेले आहेत तसेच इचलकरंजी शहरामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सहा असून यामधील ६१ कर्मचारी देखील संपावर गेल्याने तालुक्यातील जवळपास

**तालुक्यातील संपावर असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या**

आरोग्य सेविका १९, स्टाफ नर्स ३० , तालुका लेखापाल १, कार्यक्रम सहाय्यक १, समुदाय आरोग्य अधिकारी , एस .टी .एस ३, एस.टी.एल.एस २ , लॅब टेक्निशियन ३ , टी. बी.एच. व्ही ३,याचबरोबर इचलकरंजी नागरी विभागातील ६ आरोग्य केंद्रामधील एकूण ६१ कर्मचारी संपावर आहेत.

१२४ कर्मचारी संपावर आहेत. त्यामुळे तालुक्याची आरोग्य सेवा पूर्णतः विस्कळीत झाली आहे.

४ मार्च २०२४ रोजी निघालेल्या आदेशानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी बिनशर्त सेवेत समावेश करण्याचा आदेश दिला होता मात्र या आदेशाचीआजतागायत अंमलबजावणी न झाल्यामुळे अनेक कर्मचारी शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित राहिले आहेत या प्रमुख मागणी साठी २५ ऑगस्ट २०२५ पासून पुकारलेल्या संपामुळे तालुक्यातील आरोग्यसेवा पूर्णतः विस्कळीत झाली आहे.



## ऑलिम्पिकवीर पै.खाशाबा जाधव यांच्या कुटुंबियांनी घेतली सरन्यायाधिशांची भेट

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**ऑलिम्पिकवीर पै.खाशाबा जाधव यांचे चि. रणजित जाधव, पुतणे शामराव जाधव व नात कु. प्रियांका शा. जाधव यांनी काही दिवसांपूर्वी कोल्हापुरात आलेले सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषण गवई यांची भेट घेतली.**

यावेळी त्यांनी ऑलिम्पीकवीर पै. खाशाबा जाधव यांना मरणोत्तर भारतरत्न मिळावा, अशी मागणी केली.

# शूटिंग रेंजचे खासगीकरण करु नका

## आम.सतेज पाटील यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुलमध्ये नेमबाजीचा सराव करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी असतात. येथील शूटिंग रेंज सर्वसामान्य घरातील खेळाडूंना परवडणारी आहे. त्यामुळे या शूटिंग रेंजचे खासगीकरण करु नका, अशी मागणी आम.सतेज पाटील यांनी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



पत्रात म्हटले आहे की, विभागीय क्रीडा संकुलातील शूटिंग रेंजमध्ये अपुऱ्या सोयी-सुविधा असल्याने शासनाकडून नेमबाजी रेंजचे नूतनीकरण करण्यात आले आहे. सध्या चालू असलेल्या शासकीय रेंजची फी सर्वसामान्य खेळाडूंना परवडणारी आहे. मात्र खाजगीकरण झाल्यास नवनवीन सोयींच्या नावाखाली भविष्यात फीमध्ये अनियमित वाढ होऊन त्यावर शासनाचे नियंत्रण राहणार नाही. विभागीय रेंजमधील ९५ टक्के लेन खाजगी अकॅडमीस दिल्यास कोल्हापूर विभागातील पाच जिल्ह्यांतील अनेक खेळाडूंचे मोठे नुकसान होईल. नेमबाजी हा वैयक्तिक खेळ असल्याने खेळाडूंना सराव, योगा, मेंटल ट्रेनिंग, सायकोलॉजी, फिजिकल ट्रेनिंग यामध्ये स्वतःच्या गरजेनुसार निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे.

खाजगी अकॅडमीकडून यामध्ये सक्ती होऊन मानसिक व आर्थिक खच्चीकरण होण्याची भीती आहे. त्यामुळे नेमबाजी खेळाडूंच्या हरकतींचा गांभीर्याने विचार करुन छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुलातील शूटिंग रेंजचे खाजगीकरण करु नका, अशी मागणी आमदार पाटील यांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे.

# राज्यभरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार**

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.**

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे. शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरुकता निर्माण करणे हा देखील आहे.हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले आहे.

श्रीहरी
शुक्रवार, ता.२९/८/२०२५ पासून दुपारी १
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
सेक्रेटरी
प्रौढांसाठी दु. ४ व ७ वा.
अनोखा मिलन (A)

श्रीदत्त
शुक्रवार, ता.२९ पासून
रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
रॅम्प सकिरा
(A) शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी (A)

गुरु
शुक्रवार ता. २९ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३० * ३.३० * ६.३० व ९.३०वा.
सिद्धार्थ मल्होत्रा व जान्हवी कपूरची
फ्रेश म्युझिकल लव्ह स्टोरी




पंचवटी
शुक्रवार दि.२९ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
बुकींगसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२*३*६*९




राधाकृष्ण सिनेमा
RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
☎ 7447440070
bookmyshow



"परम सुंदरी" (हिंदी)
10:00 AM, 12:30 PM
03:00 PM, 05:30 PM
08:00 PM, 10:15 PM
"कूली" (हिंदी)
01:00 PM, 04:00 PM
06:30 PM, 10:30 PM
"वॉर 2" (हिंदी)
12:45 PM, 07:15 PM
"महावतार नरसिंह" (हिंदी)
04:15 PM, 09:30 PM
चित्रपटाचा आस्वाद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि वरिष्ठा एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

भाग्यरेखा
५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
गर्दीचा 3 रा आठवडा
रोज ४ खेळ *११.४५-३- ६-९ वा.




फोर्च्युन सिनेप्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11



परम सुंदरी (HIN) (U/A)
11.00am, 02.15, 04.45, 07.30, 10.15pm
वॉर २ (HIN) (U/A)
01.30, 04.45pm
कुली (HIN) (A)
11.00am, 07.15, 10.30pm
महावतार नरसिम्हा (3D) (HIN) (U/A)
08.00, 10.30pm
कोणताही सिनेमा पहा 80 रु. पासून पुढे

# इस्लामपुरात शूटिंग खेळाडूंना सुविधांचा अभाव

## २५ व ५० मीटर रेंजची सोय शहरात व्हावी; खेळाडूंसह पालक वर्गातून मागणी

इस्लामपूर,ता.२९(प्रतिनिधी)-

**इस्लामपूर शहरातील शूटिंग खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकून कर्तृत्व सिद्ध केले आहे. मात्र या खेळाडूंना आवश्यक आर्थिक मदत, अत्याधुनिक साधनसामग्री आणि योग्य सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्या प्रगतीत अडथळे येत आहे.**

शूटिंगसाठी लागणारी शस्त्रे, गोळ्या तसेच सरावासाठी आवश्यक असलेली रेंज ही अत्यंत महागडी असल्यामुळे खेळाडूंना मोठा खर्च सहन करावा लागतो. सध्या अनेक खेळाडू स्वतःच्या खर्चावर सराव करत असून प्रायोजकत्वाची कमतरता जाणवत आहे.सध्या इस्लामपूर शहरात फक्त १० मीटर रायफल शूटिंगचीच सोय आहे. पण २५ व ५० मीटर फायर आर्म्स सरावासाठी खेळाडूंना आठवड्यातून चारवेळा कोल्हापूर


रायफल शूटिंगचा सराव करताना इस्लामपुरातील खेळाडू.

येथील छत्रपती संभाजी महाराज शूटिंग रेंज, दुधाळी येथे जावे लागते.रायफल शूटिंगमध्ये भारतीय खेळाडूंनी जागतिक स्तरावर अनेक वेळा यश मिळवले आहे.

इलेव्हनिल वलारिवान या २०२१ पर्यंत १० मीटर एअर रायफलमध्ये जागतिक क्रमवारीत अव्वल होत्या. जर्मनीत झालेल्या जागतिक मूकबधिर नेमबाजी स्पर्धेत माहित संधू यांनी ५० मीटर रायफलमध्ये सुवर्णपदक पटकावले. किरण जाधव आणि ऐश्वरी प्रताप सिंग तोमर यांनी राष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवला. एवढा यशस्वी इतिहास असताना स्थानिक पातळीवर मात्र अजूनही फक्त कागदी घोडेच नाचवले जात आहेत.

या अडचणींवर मात करून वाळवा तालुक्यातील खेळाडूंनी मात्र कर्तृत्व दाखवले आहे. नुकत्याच डेहराडून येथे झालेल्या ऑल इंडिया शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये इस्लामपूरच्या आरुष योगेश गोंदकर याने २५ मीटर स्पोर्ट्स पिस्टलमध्ये सुवर्णपदक जिंकले, तर विरेन गिरिगोसावी याने ५० मीटरमध्ये राज्यस्तरावर रौप्यपदक पटकावले. हे दोघे आता दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत.मात्र शालेय शिक्षणासोबतच कोल्हापूरला प्रवास करून सराव करणे हे या खेळाडूंना खूप कष्टदायी ठरत आहे.त्यामुळे नगरपालिका प्रशासन किंवा जिल्हा क्रीडा विभाग काही ठोस मदत करणार का? असा प्रश्न खेळाडू आणि त्यांचे पालकांना सतावत आहे. २५ व ५० मीटर शूटिंग रेंजची सोय आपल्या शहरात लवकर व्हावी, यासाठी क्रीडा संघटनांनी शासनाला याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली आहे. तसेच समाजातील क्रीडाप्रेमींनी आणि खासगी संस्थांनी पुढे येऊन मदत केल्यास शहरातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी मोठे यश संपादन करता येईल, असा विश्वास क्रीडा जाणकारांनी व्यक्त केला आहे.

> इस्लामपूर शहरात १० मीटर शूटिंग रेंजची सोय आहे. तालुक्यातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय, देश, राज्य पातळीवर सुवर्ण, कांस्य पदके मिळवली आहेत.उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी २५ व ५० मीटर शूटिंग रेंजची सोय शहरात होणे आवश्यक आहे. त्यासाठी क्रीडा प्रेमी,प्रशासनाने मदत करणे आवश्यक आहे.
> **-नईम नरदेकर,शूटिंग प्रशिक्षक**

### पगार रखडल्याने ऐन गणेश उत्सवामध्ये

# शिराळा पंचायतीचे स्वच्छता कर्मचारी संपावर

शिराळा,ता.२९(प्रतिनिधी)-

**ऐन गणेशोत्सव काळात शिराळा नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी पगार थकीत असल्याने संप पुकारला आहे. परिणामी शहरातील कचरा उठाव बंद आहे. उत्सव काळात कचरा उठाव बंद असल्याने शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचून आहेत.**

शिराळा नगरपंचायत हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनांतर्गत दर दिवसाचा निर्माण होणारा कचरा घराघरातून व सर्व मिळकतीमधून गोळा करणे,ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करणे, या कामाचा ठेका एका कंपनीला २ फेब्रुवारी २०२४ रोजी देण्यात आला.त्या कामाची मुदत २ फेब्रुवारी २०२५ पर्यंत होती.त्यानंतर शिराळा नगरपंचायतच्या प्रशासकीय ठराव क्रमांक ५८ नुसार २९ जानेवारी २०२५ ला पुढील आर्थिक वर्षातील निविदा मंजूर होईपर्यंत मुदतवाढ दिली आहे. परंतु जानेवारी २०२५


शिराळा : स्वच्छता कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने कचरा उठाव बंद आहे. परिणामी रस्त्याकडेला असा कचरा टाकला जात आहे.

### शहरातील कचरा उठाव बंद

पासून या कंपनीने नगरपंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्याने कर्मचाऱ्यांचे मासिक पगार या कंपनीकडून अदा करण्यात आलेले नाही. परिणामी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केलेले आहे.

कर्मचाऱ्यांच्या या काम बंद आंदोलनामुळे दैनंदिन स्वरूपात निवासी घरे, दुकान, हॉटेल, लॉजिंग व इतर आस्थापनांमधील ओला, सुका व घातक कचरा वेगवेगळा गोळा करून कचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक होत नसल्याने शहरातील नागरिकांच्या अनेक तक्रारी नगरपंचायतीकडे होत असून ठिकठिकाणी कचरा साचून राहिला आहे.याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होवू शकतो.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी गणेश दर्शन सहलीचे आयोजन

सातारा,ता.२९(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा राज्यमहोत्सव म्हणून घोषित केला आहे. राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी तसेच आपल्या पारंपारिक कला व संस्कृतीची ओळख देशी-विदेशी पर्यटकांना करुन देण्यासाठी तसेच गणेशोत्सवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनात्मक प्रसिध्दी देऊन राज्यात पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्यासाठी पर्यटन संचालनालयाव्दारे व पुणे महानगर परिवहन महामंडळ व पुणे महानगरपालिका यांच्या सहकार्याने गणेशोत्सव काळात देशी-विदेशी पर्यटकांसाठी पुण्यातील नामांकित गणेश मंडळांच्या गणपतीचे दर्शन सहलीचे आयोजन केले आहे.**

या उपक्रमाअंतर्गत वय ६० वर्षे व त्याहून अधिक वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता व दिव्यांग व्यक्तींना गणेश दर्शन सहल आयोजित करण्यात आली आहे. ता. १ सप्टेंबर, २०२५ रोजी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींसाठी त्रिशुंड्या गणपती, कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, तुळशीबाग, दगडूशेठ हलवाई, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, बाबू गेनू गणपती व अखिल मंडई मंडळ या गणपतींच्या थेट दर्शनाची सुविधा करण्यात येणार आहे. इच्छुकांसाठी दि. १ सप्टेंबर रोजी स.८.३० ते दु. १.३० वाजेपर्यंत कात्रज डेपो, हडपसर (गाडीतळ), कोथरुड डेपो, शिवाजीनगर (मॉडेल कॉलनी) व येरवडा (गुंजन टॉकीज) या डेपोमधून पुणे महानगर परिवहन महामंडळ यांच्या पाच बसेस (प्रती बस ३५ प्रवासीकरीता) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# सह्याद्री हॉस्पिटलमध्ये जागतिक दर्जाच्या शस्त्रक्रिया उपलब्ध

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**कराडमध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय उपचाराच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी येथील सह्याद्री सुपर स्पेशालिटी रूग्णालय सातत्याने प्रयत्नशील राहिले आहे. परिपूर्ण हृदयरोग व हृदय शस्त्रक्रिया विभाग, हे सह्याद्रीचे विशेष प्राविण्य एक दशकाहून काळ अधिक राहिले आहे. गत एका वर्षापासून हा विभाग अनेक नवीन प्रयत्न करत आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या गुंतागुंतीच्या हृदयरोग शस्त्रक्रिया जागतिक दर्जाप्रमाणे सह्याद्री हॉस्पिटलमध्ये होत आहेत.**

याबाबत हृदय शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ.अमृत नेर्लीकर म्हणाले, गत अनेक वर्षे मी पश्चिम महाराष्ट्रात हृदय शस्त्रक्रिया करत आहे. सह्याद्री रूग्णालय हृदयरोगावरील उपचारांसाठी योग्य असण्याचे कारण म्हणजे सर्व अनुभवी तज्ज्ञांची एकत्र उपलब्धता येथे आहे. त्यामुळेच सर्व गुंतागुंतीच्या हृदयरोग शस्त्रक्रिया आम्ही येथे सहज करू शकतो. ४६ वर्षीय रुग्णावर आम्ही


कराड :सह्याद्री रूग्णालयात कार्यरत असलेले हृदयरोग व हृदय शस्त्रक्रिया तज्ज्ञ.

यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया केली,

सह्याद्री रूग्णालयामध्ये कार्डिॲक अनस्थेसिस्ट, परफ्युजनिस्ट व कार्डिॲक इंटेन्सिव्ह केअर तज्ज्ञांची उपलब्धता असल्याने, रुग्णांना येथे चांगले उपचार देणे शक्य होत असल्याचे हृदयशस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन सायगावकर यांनी सांगितले. डॉ. अमित माने म्हणाले, अगदी शिशू ते वृद्धांवरील साध्या किंवा अत्यंत गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रिया आम्ही कराडमध्येच करू शकतो. हृदयरोग तज्ज्ञ, हृदय शस्त्रक्रिया भूलतज्ञ, परफ्यूजनिस्ट, तज्ज्ञ व अनुभवी ऑपरेशन थिएटर स्टाफ, स्वतंत्र हृदयरोग आयसीयू विभागातील तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेस यांची उपलब्धता सह्याद्री रूग्णालयात आहे. डॉ. अमृत नेर्लीकर, डॉ. हर्षवर्धन सायगावकर, डॉ. राजेश कौशिष, डॉ. रामप्रसाद चव्हाण, डॉ. जमीर कामटे, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ.सचिन निकम, डॉ. राहुल वलेकर, डॉ. राम देसाई, डॉ.महेश देशमुख यांना या यशाचे श्रेय जाते. रूग्णांच्या सोयीसाठी सर्व इन्शुरन्स, मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजना या हॉस्पिटलमध्ये कउपलब्ध आहेत.

## थोडक्यात

### ऊर्जा संवर्धन विषयावरील उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**मलकापूर येथील मॉडर्न कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्रशिक्षणार्थींनी शालेय आंतरवासिता टप्पा क्रमांक दोन अंतर्गत आनंदराव चव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत ऊर्जा संवर्धन काळाची गरज या विषयावर विविध उपक्रमांचे आयोजन केले. या उपक्रमांना शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

यामध्ये ऊर्जा बचतीविषयी जनजागृती करण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले यामध्ये ऊर्जा बचतीसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,ऊर्जा संवर्धनाची शपथ,ऊर्जा संरक्षक उपक्रम,ऊर्जा बचत रॅली यासारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले.पृथ्वी वाचवा निसर्ग वाचवा,एक दिवस विजेविना यासारख्या विविध घोषणा देत ऊर्जा बचती विषयी जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रा.जे.व्ही.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींमार्फत राबविण्यात आलेल्या या उपक्रमास प्राचार्य डॉ.एन.डी. धनवडे यांची प्रेरणा मिळाली.ऊर्जा संवर्धन उपक्रम यशस्वी करण्यासाठी बी.एड.प्रशिक्षणार्थींनी परिश्रम घेतले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कुंभार व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


मिरज येथे सामुहिक श्री अथर्वशीर्ष पठण करताना महिला.

### मिरजेत शिवतीर्थ येथे सामुहिक श्री अथर्वशीर्ष पठण

मिरज,ता.२९(प्रतिनिधी)-

**येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक(शिवतीर्थ) येथे सामुहिक श्री अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम अभुतपूर्व उत्साहात संपन्न झाला.**

ओम गं गणपते नमः ह्या मंत्राचे १०८ वेळा पठण,अथर्वशीर्ष पठणाची अकरा आवर्तने,फलश्रुती आणि महाआरती करून कार्यक्रमाची सांगता झाली.श्रीमंत युवराज माधवराजे पटवर्धन, महापालिकेच्या उपायुक्त स्मृती पाटील, सौ. सुजाता पाटील,भाजपच्या सौ.रूपाली देसाई, शितल खराडे, सुधीर अवसरे, आनंद राजपूत, आनंद गडदे, अमृतधारा सूक्तपठण मंडळ, सनातन संस्था यांच्या साधिका यांसह पाचशे महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

### अनुभव शिक्षा केंद्राची संवादक कार्यशाळा संपन्न

कोरोची,ता.२९-

**अनुभव शिक्षा केंद्राची एक दिवसीय संवादक कार्यशाळा रत्नदीप ज्युनिअर कॉलेज, कोरोची या ठिकाणी संपन्न झाली. यावेळी जिल्हा समन्वयक अशोक वरुटे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.**

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.उद्घाटन करताना संविधान संवाद समितीचे राज्य कार्याध्यक्ष सुनिल स्वामी म्हणाले, जगाला परिवर्तन आवश्यक असते, पण परिवर्तनासाठी करावयाचे प्रयत्न आणि विचार मात्र संवादकांना पेरावे लागतात.त्यासाठी अशा प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता असते. पहिल्या सत्रात जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयचे राज्य समन्वयक संजय रेंदाळकर यांनी लघुपट संवाद याबाबत मार्गदर्शन केले. यानंतर अमोल पाटील यांनी चमत्कार सादरीकरण यावर प्रात्यक्षिक शिकवले. अनुभव शिक्षा केंद्राच्या जिल्हा कार्याध्यक्ष स्नेहल माळी आणि विभावरी नकाते यांनी महिला संवाद यावर प्रशिक्षण दिले.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी साद चांद कोटी,आदित्य धनवडे, अविनाश पोवार यांनी मदत केली. यावेळी महाराष्ट्र अंनिसच्या रेश्मा खाडे, शरद वास्कर, सनोफर नायकवडी, वैभवी आढाव,अमित कोवे, प्रफुल्ल आवळे आणि उर्मिला कांबळे आदिंसह निवडक कार्यकर्ते सहभागी होते. अमोल पाटील यांनी सूत्रसंचालन तर अशोक वरुटे यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

# गोवर प्रतिबंधक लसीपासून एकही बालक वंचित राहू नये-जिल्हाधिकारी पाटील

सातारा,ता.२९(प्रतिनिधी)-

**सातारा जिल्ह्यात एकूण ४१ आश्रम शाळा आहेत. या शाळेतील एकही विद्यार्थी गोवर आजाराच्या संरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय सुकाणू समितीची बैठक जिल्हाधिकारी श्री.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.महेश खलीपे यांच्यासह तालुका वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. लसीकरणाची मोहिम १५ ते ३० सप्टेंबर कालावधीत राबविण्यात यावी, अशा सूचना करुन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, जिल्ह्यातील ४१आश्रम शाळेत ५ हजार ६८ विद्यार्थी आहेत. यातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी लसीकरण देण्याबाबत वेळापत्रक तयार करावे. या वेळापत्रकानुसार आश्रम शाळांना कळविण्यात यावे. ज्या आश्रम शाळेत जास्त बालके आहेत त्या आश्रम शाळेत पहिल्यांदा लसीकरणाची मोहिम राबवावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.

नागरिकांना आरोग्य सुविधा चांगल्या व जलदगतीने मिळाव्यात यासाठी जास्तीत जास्त नागरिकांचे आयुष्मान भारत कार्ड काढुन त्यांना त्वरित वाटप करावे, अशा सूचना करुन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, प्रत्येक तालुक्यात आयुष्मान भारत कार्ड काढण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.शिबीर आयोजित करुन येत्या १० दिवसात उद्दिष्ट पूर्ण करावे. या कामासाठी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांची मदत घ्यावी. शासकीय रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांचेही आरोग्य मित्रांकडून आयुष्मान भारत कार्ड काढून घ्यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.

# कराड शहराच्या विकासासाठी १० कोटी मंजूर

### आ.अतुल भोसले यांचा पाठपुरावा

कराड ,ता.२९(प्रतिनिधी)-

**भाजप-महायुती सरकारने कराड शहरातील विविध विकासकामांसाठी तब्बल १० कोटींचा निधी मंजूर करून कराडकरांचा आनंद द्विगुणित केला आहे. भाजपाचे सातारा जिल्हाध्यक्ष आ. डॉ.अतुल भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या या निधीतून, शहरात नवी उद्याने, क्रीडांगण,सामाजिक सभागृहे, प्रशासकीय इमारतीचे नूतनीकरण, स्मशानभूमीचा विकास अशा पायाभूत कामांना चालना मिळणार आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.**



या निधीच्या माध्यमातून कराड नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे नूतनीकरण, फर्निचर कामासाठी ३.५० कोटी मंजूर केले आहेत.तसेच नगरपरिषदेच्या मालकीची हिंदू स्मशानभूमी विकसित करणे (१.२५ कोटी),शनिवार पेठेतील आरक्षित भूखंड क्र. ७२ मध्ये गार्डन विकसित करणे (१ कोटी) मंगळवार पेठेतील खुल्या जागेत गार्डन विकसित करणे (१ कोटी),बुधवार पेठ येथील डॉ. आंबेडकर सामाजिक सभागृह व व्यापारी संकुलाचे बांधकाम करणे (१कोटी),याच परिसरात नगर भूमापन क्र.३५ या सार्वजनिक जागेत अभ्यासिका बांधणे (१ कोटी), रविवार पेठेतील सर्व्हे नंबर ४३० येथे कुंभार समाजाचे सामाजिक सभागृह बांधणे (५० लाख), नगरपरिषदेच्या मालकीच्या आरक्षण क्र.१६ मधील खेळाचे मैदान आणि नगर परिषदेच्या मालकीच्या आरक्षण क्र.१७ मधील गार्डन विकसित करणे(२५ लाख)अशी विकासकामे केली जाणार आहेत.

या विकासकामांमुळे शहरातील पायाभूत सुविधा विस्तारण्यास मदत होणार आहे.खुल्या जागांचा विकास होणार असल्याने नव्या उद्यानांची भर पडणार आहे. क्रीडांगणाच्या विकास आणि अभ्यासिकेच्या उभारणीमुळे याचा युवावर्गाला मोठा लाभ होणार आहे.

### इनरव्हील क्लबच्यावतीने वाहतूक नियंत्रण कक्ष

कराड ,ता.२९(प्रतिनिधी)-

**कराड शहरातील शाहू चौक येथे इनरव्हील क्लब ऑफ कराड यांच्या वतीने वाहतूक नियंत्रण कक्षाची उभारणी करण्यात आली. शाहू चौक येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत असते.पोलिस ऊन, पाऊस याची तमा न बाळगता आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या प्रति कृतज्ञता म्हणून क्लबच्या वतीने नियंत्रण कक्ष उभारण्यात आला.**

या कक्षाचे उद्घाटनप्रसंगी वाहतूक नियंत्रणचे प्रभारी स. पो. नि. संदीप सूर्यवंशी,सहाय्यक फौजदार संजय चव्हाण, पो.ना. कपिल टीकोळे,जय गोसावी, प्रशांत शेवाळे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी क्लब प्रेसिडेंट सारिका शहा,सेक्रेटरी निमिशा गीर, छाया पवार, माहेश्वरी जाधव, सोनाली पाटील,जना माने, श्रुती जोशी, सुषमा तिवारी,विद्या पावसकर,हेमलता फुटाणे, रतन शिंदे, शिवांजली पाटील,रजनी बोंगाळे, प्रिया बोंगाळे, विद्या शहा आदी उपस्थित होते.

# कराडमध्ये गौराईंच्या आगमनाची लगबग

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**लाडक्या गणरायांच्या आगमनानंतर आता कराडनगरीत महिलांच्या व युवतींच्या लाडक्या गौराईंच्या आगमनाची लगबग सुरू झाली आहे.गणेशोत्सवाच्या निमित्ताने रविवारी गणपतींच्या बहिणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरी यांचे मोठ्या थाटामाटात आगमन होणार असून, घराघरांत या गौरींची स्थापना करण्यात येणार आहे.या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत महिलांची व युवतींची खरेदीसाठी विशेष गर्दी उसळली आहे.**

शहरातील कुंभारवाडा, दत्त चौक, मुख्य पेठ लाईन, कर्मवीर पुतळा परिसर, महात्मा फुले चौक, कन्या शाळा परिसर आदी भागांत विविध प्रकारच्या गौरी मुखवट्यांसह


कराड: गौराईचे मुखवटे खरेदी करताना महिला.

सजावटींच्या साहित्याची आकर्षक दुकाने लागली असून,खरेदीसाठी महिलांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे.

गौराईंच्या आगमनावेळी घराघरांत सुंदर सजावट केली जाते. त्यासाठी बाजारात पारंपरिक व आधुनिक सजावट साहित्य, रंगीबेरंगी पडदे, झगमगत्या माळा, डेकोरेटिव्ह लाइट्स, आर्टिफिशियल फुलांच्या तोरणा, थर्माकोल व प्लॅस्टिकची सजावट, आरसे, रंगीबेरंगी कपडे यांची विक्री सुरु आहे. महिलांनी आपल्या आवडीनुसार घर व गौराईचे मंडप सजवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली आहे. गणपतीनंतर गौरींच्या आगमनामुळे कराडनगरीत उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला आहे. महिलांच्या खरेदीच्या लगबगीने बाजारपेठा झगमगून गेल्या असून, रविवारी गौरी आगमनानंतर घराघरांत पुन्हा एकदा उत्साह, आनंद आणि मंगलमय वातावरण दाटून येणार आहे.

- बाजारपेठेत खरेदीसाठी महिलांची गर्दी
- सजावटीच्या साहित्यांनी दुकाने सजली

**दागदागिने व पूजन साहित्याची खरेदी**

गौराईंच्या पूजनासाठी लागणारे झगमगते दागिने,कर्णफुले, मंगळसूत्रे,बांगड्या, तोडे, नथ, हार,कंबरपट्टा आदी कृत्रिम दागिन्यांचे विविध प्रकार महिलांना कराड बाजारपेठेत उपलब्ध झाले आहेत.याशिवाय पूजनावेळी लागणारा फुलोरा, नारळ, पानफुलं, हळद-कुंकू, अगरबत्त्या, लाकडी पाट, सजावटींचे आसन, रांगोळी साहित्य, सुवासिक फुले,पत्री आदी साहित्यांची खरेदीदेखील मोठ्या प्रमाणात होत आहे.

> **बाजारपेठेत उत्साही वातावरण**
> शहरातील पेठांमध्ये महिलांची व युवतींची गर्दी पाहून बाजारपेठेत उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.दुकानदारांनीही ग्राहकांसाठी नवनवीन डिझाईन्स व आकर्षक सवलती दिल्याने खरेदीला अधिक रंग चढला आहे.विशेषतः गौरींच्या मूर्ती व मुखवट्यांना पारंपरिक व आधुनिक स्वरूप देण्यात आले असून,महिला त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.




# ज्येष्ठा गौरी आवाहन कधी आहे? जाणून घ्या मुहूर्त आणि महत्त्व



गौरि पूजन हा हिंदू महिलांचा एक महत्त्वाचा सण आहे. जो गौरि देवीच्या पूजेसाठी समर्पित आहे. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्रात मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जातो. दरवर्षी गणेश चतुर्थीच्या चौथ्या किंवा पाचव्या दिवशी हा सण येतो. याला ज्येष्ठ गौरी आवाहन असे म्हटले जाते. गौरी गणपतीचा सण कोकणामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावेळी माहेरवाशीणी घरामध्ये गौरींना घेऊन येतात. ज्या मुलींचे नवीन लग्न झाले असते त्या ओसा भरतात तशी परंपरा असते. हा सण तीन दिवस साजरा केला जातो. म्हणजेच पहिल्या दिवशी गौरीचे आगमन होते दुसऱ्या दिवशी गौरीची पूजा करुन महिला ओसा भरतात. त्यानंतर तिसऱ्या दिवशी गौरी गणपतीचे विसर्जन केले जाते. गौरी आवाहन, शुभ मुहूर्त, महत्त्व आणि विसर्जन कधी आहे, जाणून घ्या

कधी आहे ज्येष्ठा गौरी आवाहन

भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील सप्तमी तिथीला गौरी आवाहन केले जाते. यंदा गौरी आवाहन रविवार, ३१ ऑगस्ट रोजी आहे. या दिवशी महिला गौरी देवीची मूर्ती घरी आणतात. देवीची मूर्ती घरी आणण्यपूर्वी लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढले जातात त्यानंतर देवीची मूर्ती घरामध्ये आणली जाते.

ज्येष्ठा गौरी आवाहन शुभ मुहूर्त

ज्येष्ठा गौरी आवाहन रविवार, ३१ ऑगस्ट रोजी आहे. या दिवशी गौरीचे आगमन संध्याकाळी ५:२५ वाजेपर्यंत करण्यात येऊ शकते. सोमवार, १ सप्टेंबर रोजी गौरी पूजन करण्यासाठी मुहूर्त सकाळी ५.५९ ते संध्याकाळी ६.४३ वाजेपर्यंत आहे. पूजेसाठी एकूण कालावधी १२ तास ४३ मिनिटे आहे. त्यानंतर मंगळवार, २ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जन आहे. या दिवशी विसर्जन करण्यासाठी मुहूर्त सकाळी ६ ते संध्याकाळी ६.४१ पर्यंत आहे. या कालावधीमध्ये सोमवार, १ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७.५५ वाजता ज्येष्ठ नक्षत्र संपणार आहे.

काय आहे गौरी आवाहनाचे धार्मिक महत्त्व

गौरी देवीला शक्ती, सौंदर्य आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. गौरीची पूजा केल्याने कुटुंबामध्ये अखंड सौभाग्य, वैवाहिक आनंद, संपत्ती आणि समृद्धी येते, असे म्हटले जाते. पौराणिक कथेनुसार, जेव्हा स्त्रिया राक्षसांच्या अत्याचारांनी त्रस्त होत्या, त्यावेळी त्यांनी देवी गौरीचा आश्रय घेतला. देवीने त्यांचे रक्षण केले आणि वाईट शक्तींचा नाश केला. तेव्हापासून, हा सण विशेषतः सुरक्षितता, आनंद आणि वैवाहिक समृद्धीसाठी साजरा केला जातो.

# नागकेसरमुळे राहू, केतू आणि शनि ग्रह होतील शांत

ज्योतिष आणि वास्तुशास्त्रामध्ये नागकेसर वनस्पतीला खूप महत्त्व आहे. मात्र ही वनस्पती महादेवांना खूप प्रिय आहे. जर ही वनस्पती घरात ठेवल्यास व्यक्तीला जीवनातील अनेक समस्यांपासून मुक्तता मिळते. ज्योतिष आणि वास्तुशास्त्रासोबत नागकेसर वनस्पतीला आयुर्वेदात एक चमत्कारिक औषधी वनस्पती मानले जाते. या वनस्पतीच्या वापराने व्यक्तीला आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो. असे म्हटले जाते की, नागकेसर वनस्पतीशी संबंधित काही उपाय केल्यास धन आणि समृद्धीची कमतरता राहत नाही आणि जीवनात नेहमीच सुख-शांती राहते. त्याचप्रमाणे या वनस्पतीचा उपयोग ग्रह दोष दूर करण्यासाठी करता येऊ शकतो. तसेच आर्थिक स्थिती देखील मजबूत करू शकतात.



ज्योतिषशास्त्रानुसार, नागकेसरचा वापर राहू-केतू आणि शनि दोष दूर करण्यासाठी खूप प्रभावीपणे केला जातो. शनिवारी नागकेसर फुले स्वच्छ लाल कपड्यात बांधा. त्यानंतर ती पिंपळाच्या झाडाखाली ठेवा आणि दिवा लावा. असे केल्याने शनि देवाचा आशीर्वाद मिळू शकतो. त्याचप्रमाणे राहू-केतू आणि शनि दोषापासूनही मुक्ती मिळू शकते.

जर तुम्ही आर्थिक समस्यांचा सामना करत असाल तर नागकेसर संबंधित हे उपाय करता येतात. पांढऱ्या कपडामध्ये नागकेसराची फुले, हळदीची गाठ आणि गोमती चक्र घेऊन ती बांधावी. त्यानंतर तुमच्या तिजोरीमध्ये किंवा पैसे ठेवण्याच्या ठिकाणी या गोष्टी ठेवावी. असे केल्याने देवी लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो. तसेच आर्थिक समस्यापासून देखील सुटका होते. सकाळी लवकर उठून आंघोळ करून स्वच्छ कपडे परिधान करावे. त्यानंतर नागकेसराची फुले आणि त्याच्या बिया देव्हाऱ्यात ठेवाव्यात. काही वेळाने ही फुले बदलत राहावी. हा उपाय केल्याने घरातील नकारात्मकता दूर होते आणि सकारात्मक ऊर्जा प्रवेश करते. त्यामुळे घरामध्ये नेहमी आनंदाचे वातावरण राहते.

जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीमध्ये बुध आणि गुरु ग्रह कमकुवत असल्यास त्या व्यक्तीला व्यवसायामध्ये अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. यातून सुटका होण्यासाठी नागकेसर एका लहान चांदीच्या पेटीत भरा. हा उपाय केल्याने बुध ग्रहाचा वाईट परिणाम कमी होऊन तुमची व्यवसायामध्ये चांगली प्रगती होईल. शनिवारी नागकेसर फुले, लवंग आणि कापूर मिसळून त्यांचा धूप संपूर्ण घरात करावा. हा उपाय केल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होईल. तसेच, नवग्रह हवनात त्याचा समावेश करणे खूप शुभ मानले जाते. यामुळे ग्रहांचे अडथळे कमी होतात आणि मानसिक शांती मिळते.

नागकेसर फुलाचा वापर पूजेमध्ये करणे खूप शुभ मानले जाते. या फुलांचा वापर भगवान विष्णू, श्रीराम आणि महादेवांच्या पूजेमध्ये केला जातो. हा उपाय केल्याने आपल्यावर देवांची नेहमी कृपा राहते, असे म्हटले जाते. तसेच जीवनात येणाऱ्या समस्या दूर होतात, असे मानले जाते. ज्योतिषशास्त्र आणि आयुर्वेदामध्ये नागकेसरी फुल विशेष फायदेशीर मानले जाते. जर तुम्ही नागकेसर पावडरचे प्रसाद म्हणून सेवन केले तर ते शरीराच्या अनेक समस्यांपासून आराम देऊ शकते. या फुलांच्या वापरामुळे शरीरातील रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते. तसेच ही वनस्पती त्वचेसाठी देखील फायदेशीर आहे.

# मंदिराबाहेर चप्पल काढताना तुम्हीही ही करताय या चुका?



हिंदू संस्कृतीत मंदिर हे एक दैवी ऊर्जा असलेलं धार्मिक स्थळ मानलं जातं. मंदिरात जाताना आपण देवासाठी फुले, हार, फळं, मिठाई किंवा कधीकधी पूर्ण पूजेची थाळी घेऊन जातो. तसेच मंदिरात गेल्यावर मनाला शांती मिळते. शुद्ध, पवित्र वातावरण मनाला भावतं. शरीर, मन आणि आत्मा पूर्ण शुद्धतेने प्रवेश केला पाहिजे. तसेच चप्पल आणि बूट हे चिखल, धूळ आणि अशुद्धतेचे प्रतीक आहेत त्यांना मंदिराच्या आत नेणे किंवा मंदिराच्या मुख्यद्वारापुढे काढणे अशुभ मानले जातात.

परंतु कधीकधी नकळत, मंदिराबाहेर चप्पल काढताना आपल्याकडून अशा काही चुका होतात. ज्यामुळे हळहळू पुण्य कमी होऊ लागते आणि पापांची संख्या वाढू लागते. तसेच, धर्माच्या दृष्टिकोनातून ते अयोग्य मानले जाते. मंदिराबाहेर चप्पल आणि बूट काढताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत ते जाणून घेऊयात. अन्यथा त्या घटना पाप मानल्या जातात.

मंदिराच्या मुख्य दारासमोरच चप्पल काढणे पाप मानले जाते. त्यामुळे मंदिराचे पावित्र्य भंग होते. पायऱ्यांवर चप्पल ठेवल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांना त्रास होतो आणि त्यामुळे पवित्र स्थानाची ऊर्जा आणि सकारात्मकता कमी होते. शास्त्रांमध्ये हा अनादर मानला जातो. मंदिरात प्रवेश करण्याचा मार्ग स्वच्छ आणि अडथळारहित असावा, हा धार्मिक शिष्टाचार आहे.

बरेच लोक मंदिराच्या दाराशीच चप्पल काढून देवाचे दर्शन घेण्यासाठी जातात. किंवा चप्पलचा ढीग लागलेला असतो. हे पूर्णपणे अयोग्य आहे. असं म्हटलं जातं की, जिथे तुम्ही चप्पल काढली आहे तिथे त्या चप्पल ओलांडणाऱ्या सर्व लोकांचे सर्व दुःख आणि पाप तुमच्या नशिबात जमा होतात. म्हणून, तुमचे बूट आणि चप्पल अशा ठिकाणी ठेवा जिथे कोणीही त्यांना ओलांडू शकणार नाही.

दुसऱ्याच्या चप्पलवर बूट किंवा चप्पल काढू नये. धार्मिक श्रद्धेनुसार, एखाद्याच्या बूट किंवा चप्पलवर पाय ठेवून उभे राहणे किंवा दुसऱ्यांच्या चपलीवर आपण आपली चप्पल किंवा बूट काढू नये. हे इतरांच्या उर्जेमध्ये आणि नशिबात हस्तक्षेप मानलं जातं. विशेषतः जर एखाद्या वृद्ध व्यक्तीच्या किंवा पंडिताच्या चप्पलवर पाय पडला तर ते अनादर मानला जातो. तसेच चप्पल कधीही पालथी ठेवू नका.

शास्त्रांनुसार, चप्पल काढण्याची योग्य पद्धत

जर मंदिराच्या इथे जागा असेल तर बसा किंवा खाली वाकून चप्पल हातांनी व्यवस्थित करा.

मंदिरासमोर किंवा दाराजवळ चुकूनही चप्पल काढू नका

दुसऱ्याची चप्पल पायाने लाथाडू नका किंवा उडवू नका नीट बाजूला करा

तुमचा चप्पल कधीही पालथी ठेवू नका सरळ ठेवा

मंदिराच्या परिसरात स्टँड असल्यास चप्पल तिथेच ठेवा, मुख्य प्रवेशद्वारावर किंवा पायऱ्यांवर अजिबात ठेवू नका.

# एखाद्या व्यक्तीला घड्याळ भेट देणे योग्य आहे का?

आपण अनेकदा जवळच्या व्यक्तींना एखाद्या खास प्रसंगी वस्तू भेट म्हणून देतो. कपडे, मिठाई तर कधी घड्याळ अशा दीर्घकाळ लक्षात राहणाऱ्या गोष्टी आपण भेट म्हणून देतो. घड्याळ ही वेळेचे प्रतीक असलेली एक गोष्ट आहे. मात्र वास्तू आणि ज्योतिषशास्त्रात उल्लेख केल्यानुसार प्रत्येक वस्तू भेट म्हणून देणे योग्य नाही. अन्यथा काही गोष्टींचा व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो. या गोष्टींपैकी एक म्हणजे घड्याळ होय. घड्याळ भेट म्हणून कधी कोणाला द्यावे आणि कोणाला देणे टाळावे, जाणून घ्या

असे म्हटले जाते की, घड्याळ भेट दिल्याने एखाद्याची वेळ बदलली जाऊ शकते. जर तुम्ही अशा लोकांना घड्याळ दिल्यास त्यांचा वेळ चांगला जात नाही तर तुमच्या वेळेवर देखील परिणाम होतो. याचा अर्थ असा होतो की, यामुळे तुमच्या जीवनामध्ये अनेक अडथळे येऊ शकतात. जर एखाद्या व्यक्तीला घड्याळ भेट दिल्यास सकारात्मक परिणाम व्यक्तीच्या जीवनावर होतात. पण घड्याळ भेट देताना काळजीपूर्वक विचार करुन द्या.



घड्याळ हे फक्त दाखवण्याचे उपकरण नसून ते सतत फिरत राहते याचाच अर्थ ते काळाचा प्रवाह दाखवते. असे मानले जाते की, एखाद्या व्यक्तीला घड्याळ भेट दिसल्यास त्याच्यासोबत जीवनाची गती आणि वेळेची दिशा ही जोडली जाते.

ज्यावेळी तुम्ही चांगल्या वेळेतून जात असाल म्हणजे तुमचे चांगले काम चालत असेल त्यावेळी घड्याळ भेट म्हणून देणे हानिकारक ठरु शकते. तसेच तुमच्या जीवनातील प्रगती थांबू शकते. काही समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

जर एखादी व्यक्ती आधीपासूनच अडचणीत असेल तर तुम्ही त्या व्यक्तीला घड्याळ भेट दिल्यास तुम्हाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

वास्तुशास्त्रात म्हटल्यानुसार, वारंवार थांबणारे किंवा चुकीची वेळ दाखवणारे घड्याळ नकारात्मकता पसरवते.

जर एखाद्याला घड्याळ भेट म्हणून द्यायचे असेल तर हातावरचे घड्याळ न देता भिंतीवरील घड्याळ भेट म्हणून द्या. तसेच हे घड्याळ एखाद्या मंदिरामध्ये, धार्मिक स्थळ किंवा गरजू व्यक्तीला दान केल्यास तुम्हाला त्याचे सकारात्मक परिणाम मिळू शकतात.

# घरात सकारात्मक ऊर्जा करेल प्रवेश



प्रत्येक व्यक्तीला वाटते की आपल्या घरामध्ये नेहमी सकारात्मक ऊर्जा राहावी. सुख-शांती असावी, आपल्याला प्रत्येक कामामध्ये अपेक्षित यश मिळावे, कोणताही त्रास होऊ नये. यासाठी लोक घरामध्ये अनेक उपाय करतात. काही नियमांचे पालन करतात. बऱ्याच वेळा आपण अनवधानाने अशा काही गोष्टी करतो ज्यामळे चांगल्या पद्धतीने होणाऱ्या कामात अडथळा येतो. त्यामळे घराबाहेर पडण्यापूर्वी आणि कोणतेही शुभ कार्य सुरू करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे, या गोष्टी फार मोठ्या नसून त्यांचा खूप खोलवर परिणाम होतो. कोणत्या नियमांचे पालन केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते, जाणून घ्या

तुम्ही कोणत्याही महत्त्वाच्या किंवा शुभ कामासाठी घराबाहेर पडता त्यावेळी घराच्या मुख्य दरवाजाजवळ स्वच्छ पाण्याने भरलेले तांबे किंवा स्टीलचे भांडे शक्यतो ठेवावे. हे करणे म्हणजे एक प्रकारे सकारात्मक उर्जेचे हे लक्षण आहे. यामुळे तुम्हाला कामामध्ये यश मिळेल. या भांड्यात पाणी भरुन ठेवल्याने सकारात्मक ऊर्जा टिकून राहते आणि नकारात्मक ऊर्जा घराबाहेर जाते, असे म्हटले जाते.

बऱ्याचदा लोक एखादी व्यक्ती घराबाहेर पडल्यावर लगेच घराची साफसफाई करतात किंवा झाडू आणि पसणे सुरू करतात, असे करणे योग्य मानले जात नाही. असे मानले जाते की, कोणीही घराबाहेर पडल्यानंतर लगेचच फरशी झाडणे म्हणजे त्या व्यक्तीची प्रगती आणि यश देण्यासारखे आहे. विशेषतः सकाळी लवकर हे करणे अजिबात चांगले नाही.

ही एक खूप जुनी पद्धत आहे. ज्यावेळी आपण घराबाहेर पडतो त्यावेळी आकाशाकडे बघावे. त्यांमुळे मानसिक संतुलन राखण्यास मदत होते यामळे दिवस चांगला राहील. त्यामळे आपल्यासोबत सकारात्मक ऊर्जा कायम टिकून राहते.

तुम्ही घराबाहेर पडत असताना कोणी तुम्हाला नावाने हाक मारत असल्यास चिडचिड किंवा न रागावता दोन-तीन सेकंद थांबणे चांगले. असे केल्याने नकारात्मक ऊर्जा तुमच्यापर्यंत प्रवास करु शकत नाही. हे एक प्रकारचे संकेत असल्याने त्याच्याकडे कधीही दुर्लक्ष करु नये.

पंचांगानुसार, एक विशेष वेळ असते ज्याला राहू काळ म्हटले जाते. हा काळ शुभ कामांसाठी चांगला मानला जात नसला तरी महत्त्वाचे काम किंवा प्रवास करण्यापूर्वी हा काळ तपासावा लागतो. या काळामध्ये सुरु केलेले काम अनेकदा अपूर्ण राहते. त्यांमध्ये अडथळे देखील येऊ शकतात.

## गणपती विसर्जन का केले जाते ?



गणेश महोत्सव हा दरवर्षी भक्तीभावाने साजरा केला जातो. हा पवित्र सण भगवान गणेशाच्या जन्माचे प्रतीक आहे, ज्याचा शेवट गणपती विसर्जनाने होतो. गणपती विसर्जनाची वेळ जवळ आली आहे, त्यामळे बाप्पाचे विसर्जन का करायचे असा विचार लोक करत आहेत.

पौराणिक कथा आणि धर्मग्रंथानुसार, महर्षी वेद व्यासांनी जेव्हा महाभारताचे लिप्यंतरण करण्यासाठी गणेशाला आमंत्रण दिले, तेव्हा ते लिहिण्यापूर्वी बाप्पाने एक अट घातली होती की, 'मी जेव्हा लिहायला सुरुवात करेन तेव्हा मी पेन थांबवणार नाही, जर पेन थांबली तर ती गेली तर मी लिहिणे थांबवेल. हे वेद व्यासजींनी मान्य केले. यानंतर व्यासजींनी गणेशाला महाभारत कथन करायला सुरुवात केली आणि गणपतीने न थांबता लिहायला सुरुवात केली. जेव्हा १० दिवसांनी महाभारताची कथा पूर्ण झाली, तेव्हा वेदव्यासजींनी पाहिले की बाप्पाच्या शरीराचे तापमान खूप वाढले आहे. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी त्यांनी त्याला पाण्यात डुंबायला लावले. तेव्हापासून आजतागायत गणपती विसर्जनाची परंपरा सुरू आहे.

गणेश विसर्जन नियम

गणेश विसर्जनाच्या आधी विधीनुसार गणेशाची पूजा करावी. यानंतर त्यांना मोदक आणि घरची मिठाई अर्पण करा. वैदिक मंत्रांचा उच्चार करून श्रीगणेशाची आरती करा. यानंतर, स्वच्छ पात्रात शुद्ध पाणी भरा किंवा काही कारणास्तव पवित्र नदीवर जाऊ शकत नसल्यास. त्यानंतर पाण्यात गंगाजल, फुले, अत्तर मिसळून मंत्रांचा जप करावा. विघ्नहर्ताच्या जयजयकाराने त्यांना पाण्यात हळूहळू विसर्जित करा. नंतर ते पाणी पिंपळाच्या झाडाखाली किंवा भांड्यात ओतावे. पूजा साहित्याचेही विसर्जन करावे.

# साप्ताहिक राशीभविष्य

३० ऑगस्ट २०२५ ते ५ सप्टेंबर २०२५



**आर्थिक परिस्थिती मजबूत राहील**

**मेष** : आपण केलेले कार्य नावाजले जाऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतरांवर असेल. सर्वत्र गौरव व प्रशंसेस पात्र ठराल. सामाजिक अथवा धार्मिक कार्यात सक्रिय योगदान द्याल. त्यासाठी स्वतःचा वेळ व पैसा खर्च कराल. मित्रमंडळींच्या वर्तुळात प्रिय व्हाल. व्यवसाय-धंद्यातील परिस्थिती उत्तम राहील. सकारात्मक विचारांच्या व्यक्ती भेटतील. नवीन ओळखीतून चांगले लाभ होतील मात्र आपण स्वतः सकारात्मक राहून प्रतिसाद देणे गरजेचे ठरेल. व्यवसाय-धंद्यातील आर्थिक परिस्थिती मजबूत राहील. नवीन व्यवसाय विस्ताराच्या बाबतीमध्ये विचार करू शकाल.

**प्रश्न सुटतील**

**वृषभ** : आपण व्यवसाय-धंद्यातील तेजी अनुभवू शकाल. दीर्घकाळ रखडलेली व्यावसायिक येणी अचानक वसूल झाल्यामुळे आश्चर्य वाटेल. व्यवसाय-धंद्यात काही नवीन बदल करावेसे वाटतील ते जरूर करा. व्यवसाय विस्ताराच्या दृष्टिकोनातून ते फायदेशीर ठरतील. भागीदारीच्या व्यवसायात भागीदाराचे म्हणणे ऐकून घ्या. त्याप्रमाणे निर्णय घ्या. व्यावसायिक प्रदर्शने व मुलाखती सफल राहतील. कुटुंबातील मुला-मुलींकडून सुवार्ता मिळतील. त्याचप्रमाणे कुटुंबात एखादे मंगल कार्य घडण्याची शक्यता आहे. नियोजन सफल राहील. नोकरीविषयक प्रश्न सुटतील. चिंता मिटतील.

**परिचयोत्तर विवाह**

**मिथुन** : कुटुंबातील तरुण-तरुणींचे विवाह निश्चित होण्यामधील अडीअडचणी अथवा समस्या दूर होऊन विवाह निश्चित होतील. काहींचे परिचयोत्तर विवाह ठरतील. तरुण-तरुणींना आपला आवडता जीवनसाथी निवडता येईल. प्रेमात यश संपादित करू शकाल. मात्र अति आत्मविश्वासाने कोणतेही कार्य करू नका. गैरसमज होण्याची शक्यता. कुटुंबातील सर्व सदस्यांचे अपेक्षित सहकार्य मिळत राहील. नोकरीतील परिस्थिती समाधानकारक राहील. व्यवसाय-धंद्यात काही नवीन संधी निर्माण होतील. त्याचा फायदा अवश्य घ्या. तसेच व्यावसायिक पद्धतीत बदल करावेसे वाटतील. कुटुंबातील बहुतेक सदस्यांचे आपल्याला अपेक्षित सहकार्य मिळेल.

**उत्पन्नाचे नवे स्त्रोत**

**कर्क** : या सप्ताहात काही चांगल्या गोष्टींचा लाभ घेता येईल. नोकरीत मात्र वरिष्ठांशी जुळवून घ्यावे लागेल. नोकरीत बदल संभवतो. धार्मिक कार्यात रस वाढेल. आपल्या बोलण्याने गैरसमज होणार नाहीत याची दक्षता घ्या. आप्तेष्ट, नातेवाईक यांच्या गाठीभेटी होतील. उत्पन्नाचे नवे स्त्रोत दिसतील. कुटुंबातील मुलींकडून त्यांच्या प्रगतीपर बातम्या कानावर येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्याल. सामाजिक कार्यात भाग घेऊ शकाल. सभा समारंभाची निमंत्रणे मिळतील. एखादे मानाचे स्थान किंवा पद मिळेल.

**कोर्टकचेरीच्या कामात सफलता**

**सिंह** : सदरील काळामध्ये कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास सुख-समाधान मिळेल. कुटुंबातील प्रश्नांकडे अथवा समस्यांकडे लक्ष दिल्यास त्या लवकर सुटतील. व्यवसाय-धंद्यामध्ये परिस्थिती समाधानकारक राहील. जुनी येणी येतील. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल. व्यवसायातील नवीन बदल व्यवसायासाठी पोषक ठरतील. स्थावर मालमत्ताविषयीचे प्रश्न सोडविता येतील. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. कोर्टकचेरीच्या कामात सफलता मिळेल. कुटुंब परिवारातील विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह ठरतील.

आर्थिक आवक चांगली

**कन्या** : या आठवड्यात आपल्या कार्यक्षेत्रात नवीन नवीन संधी उपलब्ध होतील. त्याचे सोने करणे आपल्याच हातात आहे हे लक्षात ठेवावे. प्रयत्न कमी पडू देऊ नयेत. सतत कार्यमग्न राहण्याची गरज. नोकरीमध्ये वरिष्ठांशी जुळवून घ्यावे लागेल. तसेच काही नवीन संधी मिळू शकतील. त्या संधी एक आव्हान म्हणून स्वीकारल्या तर त्याचा फायदा होईल. आर्थिक आवक चांगली राहील. आर्थिक व्यवहार सावधानतेने करावेत. वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवा.

वाद-विवाद टाळा

तूळ : दीर्घकाळ रखडलेले जमिनीविषयीचे अथवा स्थावर मालमत्तेच्या विषयीचे व्यवहार गतिशील होतील. ओळखी-मध्यस्थीमुळे आर्थिक फायदा होऊ शकतो. मात्र वाद-विवाद टाळा. तसेच वडिलोपार्जित संपत्ती विषयीचे वाद शमतील. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सल्ल्यानुसार मार्ग निघेल. नोकरीतील वातावरण अनुकूल राहील. अपेक्षित गोष्टी साध्य होतील. हाताखालील लोकांचे सहकार्य लाभेल. कुटुंब परिवारात अचानक काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. इतरांच्या मताला प्राधान्य द्या. विद्यार्थ्यांचे परदेश गमन सफल होईल.

**महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल**

**वृश्चिक** : हा आठवडा सर्व बाबतीत आनंददायी व अनुकूल घटनांनी व्याप्त राहील. बरेच दिवस मनात घोळत असलेली एखादी महत्त्वाकांक्षा अचानक पूर्ण होईल. महत्त्वाची कामे उरकून घ्या. विशेषतः स्थावर, जमिनीविषयी असलेली कामे गतीमान होतील. कुटुंबात असलेले वाद-विवाद व मतभेद संपतील. नवीन नात्यास सुरुवात होईल. कुटुंबात मंगल कार्य घडेल. नोकरी-व्यवसायात तसेच धंद्यात अपेक्षित असलेली सर्व कामे होतील. आर्थिक परिस्थिती चांगली राहील.

**महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल**

**धनु** : या आठवड्यात आपण काही रखडलेले महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. कुटुंब परिवारातील समस्या त्यामळे सुटतील. कुटुंबातील तरुण-तरुणींचे प्रश्न सुटतील. नोकरीविषयक अनुकूल वार्ता कानावर येतील. आप्तेष्ट, नातेवाईक यांच्याशी संबंध सुधारतील. मंगल कार्याचे निमंत्रण मिळेल; परंतु आपल्या बोलण्याने आणि वर्तणुकीने रंगाचा बेरंग होऊ शकतो. त्यांमुळे त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे राहील.

**स्पर्धा टाळा**

**मकर** : महत्त्वाच्या कामात या आठवड्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. थोडा संयम बाळगणे गरजेचे आहे. कामाचा ताण जाणवू शकतो. दगदग होईल. व्यवसाय-धंद्यात जबाबदारी वाढेल. केलेल्या नियोजनात अचानक बदल करावा लागल्यामळे गोंधळ उडण्याची शक्यता आहे. आपल्याला झेपतील अशी कामे स्वीकारा. प्रवास काळजीपूर्वक करा. सावधानता बाळगा. प्रवासात खाण्यापिण्यावर नियंत्रण हवे. तसेच अति आत्मविश्वास घातक ठरू शकेल. स्पर्धा टाळा. विद्यार्थ्यांनी वेळेचा अपव्यय करू नका. तसेच कुसंगतीपासून दूर राहा.

**आत्मविश्वास वाढेल**

**कुंभ** : सामाजिक तसेच धार्मिक कार्यात रस घ्यायला, दानधर्म करावासा वाटेल. धार्मिकस्थळी सहकुटुंब, सहपरिवार भेट देण्याचे नियोजन होईल. मानसन्मान वाढेल. काही चांगल्या घटना घडतील. त्यामळे उत्साह आणि आत्मविश्वास वाढेल. मात्र नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेणे गरजेचे ठरेल. नोकरीतील बदल चांगला राहील. सरकारी स्वरूपाच्या नोकरीमध्ये अधिकारात वाढ होईल. अतिरिक्त कार्यभार सोपवला जाण्याची शक्यता. मात्र लहान-मोठ्या प्रलोभनांपासून दूर राहा. कुटुंब परिवारातील एखाद्या मंगल कार्यामळे नातेवाईक, आप्तेष्ट यांच्या भेटीगाठी होतील. व्यवसायात केलेले नवीन बदल व्यवसायासाठी पोषक ठरतील.

**कार्यमग्न राहा**

**मीन** : पूर्वी केलेल्या नियोजनाद्वारे आपली कामे काळजीपूर्वक करा. लहान-मोठी कामे इतरांवर सोपवू नका. कार्यमग्न राहण्याची गरज प्रयत्नात कमी पडून देऊ नका. महत्त्वाची कामे पूर्ण होऊ शकतात. मनावरील ताण काही प्रमाणात निघून जाईल. अडचणी दूर होतील. व्यवसायात भरभराट होईल. नवीन कामे हातात मिळतील. व्यवसाय व काम धंद्यानिमित्त प्रवास करावा लागेल. प्रवासामध्ये आपल्या मौल्यवान वस्तूंची आणि महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यायला विसरू नका. आपल्या बोलण्याने इतरांना आपण मंत्रमुग्ध कराल. तसेच खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा. व्यवसायासाठी आवश्यक ती ऊर्जा मिळेल.

# आम.नायकवडी - खोत यांनी गायींची कत्तल करणाऱ्यांची सुपारी घेतली

## गोरक्षकांवरील टीकेबद्दल शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थानतर्फे निदर्शने

सांगली,ता.२९(प्रतिनिधी)-

**आमदार इद्रिस नायकवडी आणि विधान परिषदेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी गोरक्षकांवर खालच्या पातळीवर टीका केली. राजरोसपणे गायींची कत्तल करणाऱ्यांची सुपारी दोघांनी घेतली असल्याचा आरोप शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थानचे संस्थापक नितीन चौगुले यांनी केला.**



शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्थान या संघटनेतर्फे येथील मारुती चौकातील शिवतीर्थासमोर शुक्रवारी आमदार सदाभाऊ खोत, आमदार इद्रिस नायकवडी यांनी गोरक्षकांवर केलेल्या टीकेबद्दल जोरदार निदर्शने करण्यात आली. दोन्ही आमदारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडण्यात आला.

चौगुले म्हणाले, अनेक ठिकाणी गायींची कत्तल केली जाते. त्यांच्याकडे धारदार शस्त्रे असतात. तरीही जीवाची बाजी लावून अनेक गोरक्षक गायींची सुटका करून आणतात. या गायींच्या कत्तलीबद्दल सदाभाऊ बोलत नाहीत. अनेक प्रामाणिक गोरक्षक गोवंशाचे रक्षण करतात. मात्र सुपारी घेऊन त्यांच्यावर सदाभाऊ, नायकवडी यांनी आरोप केले आहेत. परंतू यापुढे असे आरोप आम्ही सहन करणार नाही.

कडकनाथ कोंबडी प्रकरणात घोटाळा करताना सदाभाऊंना शेतकरी आठवले नाहीत. सत्तेत असणारे हे आमदार गोरक्षणाच्या बाबतीत विरोधात भूमिका घेत आहेत. त्यांनी शेतकऱ्यांचे गोधन वाचवण्यासाठी तसेच कत्तलखान्याकडे गोधन जाणार नाही यासाठी प्रयत्न करावेत. आम्ही त्यांच्या पाठीशी राहू. परंतू यापुढे गोरक्षकांवर आरोप केले तर रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल. काही हमेखोर बोगस गोरक्षक सध्या कार्यरत झाले आहेत. त्यांचा बंदोबस्त आम्ही करू.

यावेळी अभिमन्यू भोसले, राज पडळकर, विनायक एडके, श्रीकांत माने, बबन सोलणकर, संदीप जाधव, रामभाऊ जाधव, राजू जाधव, पिंटू माने, विक्रांत कोळी, सागर रजपूत, लक्ष्मण मंडले, जयदीप सदामते, दिगंबर साळुंखे, अजिंक्य बोळाज, मोहन शिंदे, प्रशांत जमदार आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दसरा चौकात सकल मराठा समाजाचा ठिय्या

## जरांगे यांच्या आंदोलनास कोल्हापुरातून उत्स्फूर्त पाठिंबा

कोल्हापूर ता.२९(प्रतिनिधी)-

**मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन सुरू असून, त्यास समर्थन म्हणून शुक्रवारी सकाळी कोल्हापूरच्या दसरा चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी 'एक मराठा लाख मराठा', 'आरक्षण आमच्या हक्काचे', 'जरांगे-पाटील आगे बढो, हम आपके साथ हैं' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनाचे नेतृत्व मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी केले.**

मनोज जरांगे-पाटील यांनी 'आर या पार'ची लढाई जाहीर करत दोन दिवसांपूर्वी मुंबईकडे कूच केले आहे.त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मराठा बांधव आझाद मैदानावर दाखल होत आहेत. कोल्हापूर शहर व ग्रामीण भागातून सुमारे १५ वाहने मुंबईकडे गेल्याची माहिती मिळाली. याच पार्श्वभूमीवर दसरा चौकात ठिय्या आंदोलन करून सकल मराठा समाजाने ऐक्य प्रकट केले.

या वेळी कार्यकर्त्यांनी खर्डा-भाकरीचा आस्वाद घेत परंपरेप्रमाणे लढाऊ भूमिका अधोरेखित केली.गरज भासल्यास कोल्हापुरातून मोठ्या संख्येने मुंबईकडे कूच करून जरांगे-पाटील यांच्या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होऊ,'असा इशारा मुळीक यांनी दिला.

आंदोलनात महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. दिलीप देसाई, रूपेश पाटील, बाबा इंदुलकर, सचिन चव्हाण, बाजीराव नाईक, राहुल इंगवले, ऋषीकेश इंगवले, राजू सावंत, महादेव पाटील, संजय पटकारे, डॉ. लक्ष्मीकांत नलवडे, अवधूत पाटील, दत्ता पाटील, मयूर पाटील, फिरोज खान, संभाजीराव जगदाळे, सुनील पाटील, चंद्रकांत सूर्यवंशी, शैलजा भोसले, सुनीता पाटील, संयोगीता देसाई, सुवर्णा मिठारी, संपत्ती पाटील, गीता हासूरकर, संजीवनी नलवडे, अनिता टिपुगडे, सुधा सरनाईक, वैशाली नाटेकर, धनराज आमते यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.


### मदनलाल बोहरा को-ऑप क्लॉथ मार्केट हौसिंग सोसायटी लि., इचलकरंजी.

### ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

आमच्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची सन २०२४-२०२५ या सालची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १४/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता श्री गायत्री भवन, मेन रोड, इचलकरंजी येथे घेणेचे ठरविले आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

स्थळ: इचलकरंजी.
दिनांक : २९/०८/२०२५

श्रीमती सोनल हरिष बोहरा, व्हा. चेअरमन — श्री. गौतमचंद मिलापचंद मुथा, चेअरमन

मदनलाल बोहरा को-ऑप क्लॉथ मार्केट हौ.सो.लि.,
संचालक मंडळाच्या आदेशाने,

**विशेष सूचना :** १) कोरमअभावी सभा तहकूब झालेस त्यानंतर अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेणेत येईल. त्यावेळेस सभेस कोरमपूर्तीची आवश्यकता असणार नाही. २) सभेचे विषय व हिशोब पत्रके संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावणेत आलेली आहेत. ३) सर्व सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल स्वतंत्रपणे पाठविणेत आलेले आहेत.


# कोडोलीत राष्ट्रीय क्रीडादिन साजरा

कराड,ता.२९(प्रतिनिधी) -

**तालुक्यातील कोडोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकी खेळाचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**



यावेळी सांघिक क्रीडा व मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. मुलांना तंदुरुस्त शरीर राहण्यासाठी करावयाच्या योगाबद्दलही माहिती देण्यात आली.यावेळी मुख्याध्यापक दिलीप जाधव, विनायक निकम, ग्रा.पं.सदस्य संदीप होनकळसे, शोभा जाधव, उज्वला पाटील, संगीता माने, युवराज सावंत, महेश भोंगाळे, युवराज सावंत तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# अपघातातील तिसऱ्या जखमीचाही मृत्यू

पेठवडगाव,ता.२९-

**तळसंदे (ता. हातकणंगले) येथे रेणुका हॉटेल समोर झालेल्या भीषण अपघातातील गंभीर जखमी विनेश कुमार याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेत तिघा परप्रांतीय मजुरांचा बळी गेला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**

नरेंद्रकुमार यादव (वय २५, रा. बिहार), हेमंत पहाडी (वय २६, रा. चंद्रापाडा, ओडिशा), विनेशकुमार (वय २७, रा. चंद्रापाडा, ओडिशा, सध्या रा. कराड, जि. सातारा) हे तिघे मोटारसायकल (एम.एच.१०-ए.बी-४२२८) वरून वाठारमार्गे कराडकडे निघाले होते.दरम्यान, रेणुका हॉटेल समोर अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर मोटरसायकलचा चक्काचूर झाला. तर तिघेही रस्त्यावर फेकले गेले.

नरेंद्रकुमार यादव व हेमंत पहाडी हे जागीच ठार झाले. गंभीर जखमी विनेशकुमार याला तातडीने कोल्हापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, शुक्रवारी पहाटे उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला. या अपघाताची नोंद वडगाव पोलिसात झाली असून सहा. फौजदार एकनाथ गावंडे तपास करत आहेत.

# प्रियांका पाटील यांना पी.एचडी.

कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

देशातील सर्वोच्च संस्था आय.आय.टी. मुंबईमधून नांदगाव,(ता. कराड) येथील प्रियांका पाटील यांना पी.एचडी. पदवी प्रदान करण्यात आली.



डॉ. प्रियांका यांनी एरोस्पेस इंजिनिअरिंग शाखेमध्ये पी.एचडी. संपादन केली आहे. त्यांना प्रा. गुरुप्रसाद यांनी मार्गदर्शन केले. 'बेस्ट ३० ऑफ द इयर' या प्रबंधाचे नामांकन झाले आहे.

# उंडाळे सेवा सोसायटीची निवडणूक बिनविरोध



कराड,ता.२९(प्रतिनिधी) -

**येथील उंडाळे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी (उंडाळे, ता. कराड) ची निवडणूक बिनविरोध झाली. चेअरमनपदी प्रा. अरुण पाटील व व्हा. चेअरमनपदी दीपक आवंडे यांची बिनविरोध निवड झाली.**

विकास सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाची बैठक झाली. यावेळी रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन उदयसिंह पाटील-उंडाळकर यांसह मान्यवर उपस्थित होते.


MAHATRANSCO

**SRM TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (SRM Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco SRM E-Tendering portal for following works under EHV O&M Circle, Kolhapur.**

**Name of work** : SRM E-Tender for annual contract for transportation of material at various substations under EHV O&M Circle, Kolhapur (1st call). **1. RFx No.**- 7000037462 **2. Estimated cost:** Rs. 40,00,000/- (Including Taxes) **3. E.M.D.**:- Rs. 40,000/- By Online Payment **4. Tender Fee:**- Rs 590/- By Online Payment **5. Date of start:**- From 30.08.2025 at 00:01 Hrs. **6. Date of Submission:**- Up to Closing date i.e. 13.09.2025 at 23:59 Hrs. **7. Date of opening (Tech. bid)**:- 15.09.2025 at 10:30 Hrs. onwards; if possible.

For further details visit our website **https://mahatransco.in/**

**Note:**- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal **(https://srmetender.mahartransco.in).**

**(Save the Energy)**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Kolhapur**


# महाराष्ट्राचा विविध कंपन्यांशी सामंजस्य करार

## ३४ हजार कोटींची गुंतवणूक; ३३ हजार रोजगार

मुंबई, ता.२९ -

**श्री गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आज तब्बल १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांची एकूण किंमत सुमारे ३३,७६८.८९ कोटी रुपये असून, त्यातून राज्यात सुमारे ३३,४८३ रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.**

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस व ट्रक्स, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे.गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्ही फक्त करार स्वाक्षरीत करून थांबणार नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठेही अडथळा येणार नाही.फडणवीस म्हणाले की, पूर्वी दरवर्षी वीजदर ९ टक्क्यांनी वाढत असत, पण आता विजेचे दर कमी होणार आहेत. हे उद्योगांसाठी मोठे दिलासादायक ठरणार आहे.उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीचा जीवनचक्र राज्य सरकारने स्थिर आणि अंदाजपत्रित ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वृद्धिंगत होईल.

या करारादरम्यान मुख्य सचिव राजेश कुमार, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीनकुमार सोना, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासु, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी आगळीवेगळी आदरांजली



कराड,ता.२९(प्रतिनिधी)-

**मलकापूर येथील श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे आनंदराव चव्हाण विद्यालय व आदर्श ज्युनिअर कॉलेजमध्ये हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडादिन म्हणून उत्साहात साजरा झाला. अध्यक्षस्थानी डॉ. स्वाती थोरात होत्या.**

विद्यालयात विविध क्रीडा साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचा याचा लाभ घेतला.कार्यक्रमाला संस्थेचे सचिव अशोकराव थोरात, मुख्याध्यापिका ए. एस. कुंभार, उपमुख्याध्यापक ए. बी. थोरात, पर्यवेक्षक बी. जी. बुरुंगले, शीला पाटील तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक जे. एन. कराळे यांनी तर सूत्रसंचालन एस. के. तांबवेकर यांनी केले. एस. टी. कांबळे यांनी आभार मानले.

# आजऱ्यात लक्ष्मणबुवा महाराज मोरजकर सप्ताह सोहळा

आजरा,ता.२९(प्रतिनिधी)-

**येथील ह.भ. प. लक्ष्मणबुवा महाराज मोरजकर यांच्या सप्ताह सोहळ्याचे ३ ते ११ सप्टेंबर अखेर आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विठोबा देव, नवापूर चे ट्रस्टी सुभाष मोरजकर यांनी दिली.**

३ रोजी सकाळी ११ वाजता प.पू. महाराजांच्या पोथीचे श्री विठ्ठल मंदिर येथे प्रयाण, दुपारी बारा वाजता भक्तमंडळीसह समाधीस्थळी महाराजांना आमंत्रण असा कार्यक्रम आहे. दररोज रात्री ९ ते ११ या कालावधीत दैनंदिन भजन सेवा आयोजिली आहे व रात्री ११ च्या पुढे जागर भजन सेवा राहील. ९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजता भक्त तिरंग हा अजित तोडकर व सहकारी यांच्या भक्तीरंग हा भक्तीसंगीताचा कार्यक्रम होणार असून याच दिवशी जागर होणार आहे.


### महाराष्ट्र शासन
### नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**जाहीर सूचना**

दिनांक :- ७ ऑगस्ट, २०२५.

क्र.टिपीएस-१२२४/८०८/प्र.क्र.५६/२४/नवि-१२,

महाराष्ट्र शासनाने सूचना क्र. टिपीएस- १२२४/८०८/प्र.क्र.५६/२४ /नवि-१२, दि.६/६/२०२५ अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ११.१ च्या तक्ता क्र. ११-अे- Manner of development मधील सार्वजनिक सुविधा (Public Utility) मधील कत्तलखाना विकसनासंदर्भात सुचनेसाबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये प्रस्तावित केल्यानुसार बदल करण्याबाबतची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) (क) अंतर्गत आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्याची सूचना प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना ही राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक नगर रचना, सर्व महानगरपालिका आयुक्त व सर्व सहायक संचालक नगर रचना, शाखा कार्यालये यांच्या कार्यालयात उपलब्ध असून, www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या शासनाच्या संकेतस्थळावरसुध्दा जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना, यांची संबंधितांकडून प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचनांवर सुनावणी देण्याकरिता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील उक्त प्रस्तावित फेरबदलासंदर्भात हरकती आणि/किंवा सूचना असतील तर त्या संबंधितांनी संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना, यांच्याकडे सदरहू जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १(एक) महिन्यात पाठवाव्यात. सदर नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावरील संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय विचारात घेवून प्रस्तावित फेरबदलाबाबत शासन उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१अेअे) (सी) मधील तरतुदीनुसार निर्णय घेईल.

सही/-
(वि.गो.मोरे)
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन

विमाका/कोल्हापूर/७३/२०२५-२०२६



### महाराष्ट्र शासन
### महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
### कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर

कार्यालयाचा पत्ता :- कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण),कोल्हापूर
सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३
दुरध्वनी क्रमांक - ०२३१-२६५०२६३
ई मेल पत्ता :- eekidsouthklp@gmail.com

**जिल्हा - कोल्हापूर**
**ई-निविदा सुचना क्रमांक ०६ सन २०२५-२६**
**(फक्त कोल्हापूर जिल्ह्यातील सु.बे.अभियंता यांना राखीव)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्रे शासन संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासन संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत (रु. लक्ष) | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | देखभाल व दुरुस्ती को.प.बंधारा बस्तवडे व चिखली (बरगे बसविणे व काढणे ) | कोल्हापूर | १३.५३ | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत कोल्हापूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता वर्गाकरीता राखीव |
| ०२ | चिकोत्रा मध्यम प्रकल्प दे व दु को.प. बंधारा चांभारखडक, मुगळी, नंद्याळ, मेतके, अर्जुनवाडा, गलगले व बेळुंकी (बरगे बसविणे व काढणे) | कोल्हापूर | १३.८६ | |
| ०३ | पाटगांव मध्यम प्रकल्प दे व दु को.प. बंधारा शेणगांव, गारगोटी व म्हसवे (बरगे बसविणे व काढणे) | कोल्हापूर | ११.७९ | |
| ०४ | पाटगांव मध्यम प्रकल्प दे व दु को.प. बंधारा वाघापूर व निळपण (बरगे बसविणे व काढणे). | कोल्हापूर | ८.४८ | |
| ०५ | चित्री मध्यम प्रकल्प दे व दु को.प. गजरगांव, जरळी, निलजी व खणदाळ (बरगे बसविणे व काढणे) | कोल्हापूर | १५.९६ | |
| ०६ | जंगमहट्टी मध्यम प्रकल्प अंतर्गत दे व दु को.प. बंधारे जंगमहट्टी, तुर्केवाडी, कार्वे, ढोलगरवाडी कोवाड व कामेवाडी (बरगे बसविणे व काढणे) | कोल्हापूर | १६.६३ | |
| ०७ | दे. व दु. ल.पा. तलाव धनगरवाडी अंतर्गत को.प. बंधारा सुळेरान, धनगरवाडी क्र. १ व २ व ल.पा. तलाव उचंगी अंतर्गत को. प. बंधारा यमेकोंड क्र. १ व २ शृंगारवाडी, हांडेवाडी कोळींद्रे, पोश्रतवाडी, किणे, शिरसंगी, वाटंगी क्र. १ व क्र. २, बटकणंगले ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर व बिद्रेवाडी ता. आजरा जि. कोल्हापूर (बरगे काढणे व बसविणे) | कोल्हापूर | ११.७६ | |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक ०१/०९/२०२५ ते दिनांक ८/०९/२०२५ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | :- | दिनांक १०/०९/२०२५ वेळ १२.०० (शक्य झाल्यास) |

जा.क्र. कोपावि (द) लेशा-२/निविदा/२६६९ सन २०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण) कोल्हापूर.
दिनांक २५/०८/२०२५

सही/-
देवाप्पा द. शिंदे
कार्यकारी अभियंता
कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण)
कोल्हापूर.

विमाका/कोल्हापूर/७०/२०२५-२०२६

### डायमंड लीग जिंकण्याची संधी हुकली!

# सलग तिसऱ्यांदा नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानी

ज्युरीच,ता.२९ –

**दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता भालाफेकपटू नीरज चोप्राच्या पदरी पुन्हा एकदा निराशा आली आहे.ज्युरीचमध्ये झालेल्या डायमंड लीग स्पर्धेतील अंतिम सामन्यात नीरज चोप्राला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात होते. पण सलग तिसऱ्यांदा त्याला दुसऱ्या स्थानी दुसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले आहे. डायमंड लीग २०२५ स्पर्धेतही ८५.०१ मीटर**



**लांब थ्रो करून तो दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. तर जर्मनीच्या जुलियन वेबरने ९० मीटर लांब थ्रो करून जेतेपदाचा मान पटकावला.**

नीरज पहिल्याच प्रयत्नात ८४.३५ मीटर लांब थ्रो केला. तिसऱ्या थ्रो पर्यंत तो तिसऱ्या स्थानी होता. त्यानंतर त्याने आपल्या शेवटच्या प्रयत्नात८५.०१ मीटर लांब थ्रो केला आणि दुसऱ्या स्थानी कब्जा केला. तर जेतेपदाचा मानकरी ठरलेल्या आपल्या दुसऱ्याच प्रयत्नात ९१.५७ मीटर लांब थ्रो करून या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी केली. हा त्याचा आतापर्यंतचा सर्वोत्तम थ्रो ठरला.

नीरजने पहिल्या प्रयत्नात ८४.३५ मीटर लांब थ्रो केला. त्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात त्याने ८२.०० मीटर लांब थ्रो केला. त्यानंतर पुढे त्याने सलग ३ फाऊल थ्रो केले. ५ थ्रो झाल्यानंतर नीरज या यादीत तिसऱ्या स्थानी होता. त्याच्याकडे शेवटची एकच संधी शिल्लक होती. शेवटचा थ्रो त्याने ८५.०१ मीटर लांब फेकून दुसऱ्या स्थानी उडी घेतली. याआधी २०२२ मध्ये झालेल्या डायमंड लीग स्पर्धेत नीरजने दमदार कामगिरी केली होती. तो ज्युरीखमध्ये डायमंड लीग जिंकणारा पहिलाच भारतीय ठरला होता.

### हॉकी आशिया कप स्पर्धेला प्रारंभ

# भारताची विजयी सलामी; चीनचा ४-३ ने पराभव

पाटणा,ता.२९ –

**बिहारमधील राजगीर येथे हॉकी आशिया कप स्पर्धेला शुक्रवारी शानदार प्रारंभ झाला. मुख्यमंत्री नीतीश कुमार यांच्या हस्ते स्पर्धेच्या ट्रॉफीचे अनावरण झाले. यजमान भारतीय हॉकी संघाने आपल्या पहिल्याच सामन्यात चीनचा ४–३ असा पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली.**



या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत सिंगने तीन गोल डागले आणि भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्याव्यतिरिक्त, जुगराज सिंगने एक गोल केला.दुसरीकडे, चीनकडून चेन बेनहाई, गाओ जियेशेंग आणि डू शिहाओ यांनी प्रत्येकी एक गोल केला. मात्र त्यांचा हा प्रयत्न संघाला विजय मिळवून देण्यात अपुरा ठरला. भारतीय संघाने या विजयासह स्पर्धेतील आपली दावेदारी मजबूत केली आहे.हा सामना अत्यंत रोमांचक ठरला. दोन्ही संघांनी जोरदार प्रयत्न करत शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवले. भारताने सामन्याची चांगली सुरुवात केली. चेंडू गोलपोस्टच्या आत पोहोचवला होता, पण मॅच रेफरीने तिसऱ्या पंचाचा सल्ला घेऊन तो फाऊल ठरवला. त्यानंतर चीनने पुनरागमन करत पहिला गोल केला आणि १–० अशी आघाडी घेतली. डू शिहाओने ड्रॅग फ्लिकवर हा गोल केला.

पहिल्या क्वार्टरमध्ये पिछाडीवर असलेल्या भारतीय संघाने दुसऱ्या क्वार्टरमध्ये जोरदार पुनरागमन केले आणि अर्ध्या वेळेपर्यंत २–१ अशी आघाडी घेतली. यावेळी हरमनप्रीत आणि जुगराज यांनी ड्रॅग फ्लिकवर प्रत्येकी एक गोल केला.तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने २–१ ची आघाडी ३–१ पर्यंत पोहचवली. पण त्यानंतर चीनने शानदार पुनरागमन केले. त्यांनी भारतीय बचाव फळीवर सतत दबाव ठेवला. त्यांच्या खेळाडूंनी प्रतिहल्ल्यादरम्यान उत्कृष्ट ड्रिब्लिंगचे प्रदर्शन केले आणि दोन गोल डागले. यासह ३–३ अशी बरोबरी साधली. भारताकडून या क्वार्टरमध्ये हरमनप्रीत सिंहने एक गोल केला, तर चीनकडून चेन बेनहाई आणि गाओ जियेशेंग यांनी गोल केले.

शेवटच्या क्वार्टरमध्ये भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. त्याने ड्रॅग फ्लिकवर स्वतःचा तिसरा आणि भारतासाठी चौथा गोल केला. त्यानंतर दोन्ही संघांकडून कोणताही गोल होऊ शकला नाही. भारतीय बचावपटूंनी उत्कृष्ट खेळ करत चीनचे प्रतिहल्ले यशस्वीपणे थोपवले आणि भारताचा विजय निश्चित केला. या सामन्यातील सर्व सात गोल ड्रॅग फ्लिक द्वारे झाले.

# सहाव्यांदा पदक मिळविण्याचे स्वप्न अधुरे

नवी दिल्ली,ता.२९–

**भारताची बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू ही बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिपमधून बाहेर पडली आहे. सहाव्यांदा पदक जिंकण्याचे तिचे स्वप्न भंगले आहे. महिला एकल उपांत्यपूर्व फेरीत अतिशय अटीतटीच्या सामन्यात जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या इंडोनेशियाच्या पुत्री वर्दानीकडून तिला पराभव सहन करावा लागला.**




जागतिक क्रमवारीत पीव्ही सिंधू १५ व्या स्थानी आहे. आज झालेल्या सामन्यात पीव्ही सिंधूने पहिल्या सेटमध्ये धीम्या गतीने खेळ सुरू केला होता. १४–२१ ने पहिला सेट गमावल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये सिंधूने चांगली पकड मिळवली. या सेटमध्ये २१–१३ ने वर्दानीवर मात केली. मात्र अंतिम तिसऱ्या सेटमध्ये वर्दानीने पुनरागमन करत १६–२१ ने विजय प्राप्त केला. दोन वेळा ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या पीव्ही सिंधूने जगातील दुसऱ्या क्रमाकांची खेळाडू चीनच्या वांग झीला २१–१९, २१–१५ ने नमवत बीडब्लूएफच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. बासेलमध्ये २०१९ ला जागतिक जेतेपद जिंकणाऱ्या आणि १५व्या स्थानी असलेल्या सिंधूला उपउपांत्यपूर्व सामन्यात विजय मिळवण्यास ४८ मिनिटांचा खेळ लागला होता.

उपउपांत्यपूर्व सामन्यात चीनच्या वांग झी यी विरोधात खेळताना सिंधूने सामन्याला चांगली सुरुवात केली. वेगवान स्मॅश आणि नेटजवळील खेळाच्या जोरावर सिंधूने गेमच्या मध्यंतरापर्यंत ११–६ अशी आघाडी घेतली. मात्र, गेमच्या दुसऱ्या टप्प्यात वांगने खेळ उंचावत गेम १९–१९ असा बरोबरीत आणला. मात्र, सिंधूने संयमाने खेळ करीत पहिला गेम जिंकत आघाडी मिळवली. दुसऱ्या गेममध्येही सिंधूने दबाव कायम राखताना मध्यंतरापर्यंत ११–६ अशी आघाडी मिळवली. यानंतर ५७ फटक्यांच्या रॅलीत तिचा कस लागला. मात्र, सिंधूने आपला आक्रमक खेळ सुरूच ठेवला व सामन्यात विजय नोंदवला.

सिंधूने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत यापूर्वी, वांग यिहान (२०१३), वांग शिक्सियन (२०१४), ली शुरुई (२०१५), सुन यू (२०१७) आणि चेन युफेई (२०१७ आणि २०१९) या चीनच्या खेळाडूंना पराभूत केले होते.

# बंगळुरूत १३ सप्टेंबरला रोहित शर्माची फिटनेस टेस्ट

बंगळुरू,ता.२९–

**टीम इंडियाचा एकदिवसीय कर्णधार रोहित शर्माची १३ सप्टेंबर रोजी बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे फिटनेस टेस्ट होणार आहे. रिपोर्टनुसार, रोहित शर्माला यो–यो टेस्ट व्यतिरिक्त ब्रोंको टेस्ट द्यावी लागेल. तो दोन–तीन दिवस मध्ये राहील. या काळात रोहित नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय मालिकेची तयारी करण्यासाठी येथे सराव करेल.**



दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना ११ ते १५ सप्टेंबर दरम्यान सेंटर ऑफ एक्सलन्सच्या ग्राउंड–१ वर खेळला जाईल. अहवालानुसार, त्यामुळे रोहितची फिटनेस चाचणी सेंटरच्या वेगळ्या ग्राउंडवर घेतली जाईल.रिपोर्टनुसार, ऑस्ट्रेलिया दौऱ्याची तयारी करण्यासाठी रोहित आणि विराट कोहली ऑस्ट्रेलिया–अ विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत खेळू शकतात. सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये भारत–अ आणि ऑस्ट्रेलिया–अ यांच्यात एकदिवसीय मालिका खेळवली जाईल. हे सामने ३० सप्टेंबर, ३ आणि ५ ऑक्टोबर रोजी कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर खेळवले जातील. भारतीय वरिष्ठ संघ ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करेल. जिथे पहिला एकदिवसीय सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये खेळला जाईल.



# राजीव शुक्ला बीसीसीआयचे हंगामी अध्यक्ष

### रॉजर बिन्नी लवकरच राजीनामा देणार

मुंबई,ता.२९ –

**आशिया कप २०२५ मध्ये भारताचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएई विरुद्ध होणार आहे,त्याला सुरू होण्यास आता दोन आठवड्यांपेक्षा कमी वेळ उरला आहे. माहितीनुसार, राजीव शुक्ला यांना बीसीसीआयचा कार्यवाहक अध्यक्ष नेमण्यात आले आहे.रॉजर बिन्नी लवकरच अधिकृतपणे आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.**

राजीव शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. बैठकीत भारतीय संघाच्या टायटल स्पॉन्सरशी असलेल्या ड्रीम११ च्या कराराच्या समाप्तीवर आणि नवीन करार शोधण्यावर चर्चा झाली. २०२२ मध्ये सौरव गांगुली अध्यक्ष पदावरून हटल्यानंतर रॉजर बिन्नी यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. आता ते ७० वर्षांहून अधिक वयाचे झाले असल्याने ते लवकरच आपला राजीनामा जाहीर करू शकतात.राजीव शुक्ला यांचा जन्म १३ सप्टेंबर १९५९ रोजी झाला होता. सध्या त्यांचे वय ६६ वर्षे आहे. ते आधी पत्रकार होते, त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि नंतर भारतीय क्रिकेटमध्ये एक खास स्थान निर्माण केले. २०१५ मध्ये त्यांची आयपीएलचे चेअरमन म्हणून नियुक्ती झाली. १८ डिसेंबर २०२० रोजी त्यांना बीसीसीआयचे उपाध्यक्ष बनवण्यात आले. सध्या ते छत्तीसगडमधील राज्यसभा खासदारांपैकी एक आहेत.नवीन अध्यक्ष निवड होईपर्यंत राजीव शुक्ला हे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून काम पाहतील. बीसीसीआय सध्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर लोढा समितीच्या शिफारसींवर आधारित संविधानानुसार चालते.

**बीसीसीआय सध्या भारतीय क्रिकेट संघासाठी नवीन टायटल स्पॉन्सर शोधत आहे. ऑनलाइन गेमिंगसंबंधी नवीन कायदा आल्यामुळे ड्रीम११ सोबतचा करार नियोजित कालावधीपूर्वीच संपुष्टात आला आहे. नवीन टायटल स्पॉन्सर मिळवणे आव्हानात्मक वाटते. बीसीसीआय काही दिवसांत नवीन प्रायोजकासाठी जाहिरात जारी करू शकतो.**

# इचलकरंजी फेस्टिव्हलला ३ सप्टेंबरपासून प्रारंभ

### विविध स्पर्धांसह मनोरंजन कार्यक्रमांची पर्वणी

इचलकरंजी ता.२९ –

**इचलकरंजी फेस्टिव्हलमध्ये यंदाची नव्या रंगात व नव्या ढंगात स्पर्धा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यंदाचा इचलकरंजी फेस्टिव्हल ३ ते ५ सप्टेंबर या कालावधीत श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह हे भरविण्यात येणार असल्याची माहिती फेस्टिव्हलच्या संयोजिका सौ. मोश्मी आवाडे यांनी दिली.**

श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह येथे फेस्टिव्हलचा शुभारंभ आमदर राहुल आवाडे व माजी मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवार ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रींच्या महाआरतीने होईल. त्यानंतर अन्नपूर्णा पाककला स्पर्धा होणार आहे. यामध्ये केक डेकोरेशन आणि राईस (भात)चे विविध प्रकार तयार करावयाचे आहेत. या स्पर्धेसाठी मोफत प्रवेश आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नजमा शेख, शितल सुर्यवंशी व सपना भिसे यांच्याशी संपर्क साधावा.३ सप्टेंबर रोजीच दुपारी २ वाजता फेस्टिव्हलचे आकर्षण बनलेल्या इचलकरंजी फेस्टिव्हल श्री २०२५ शरीरसौष्ठव स्पर्धा होईल. महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोशिएशन व न्यू कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डिंग असोशिएशन यांच्या मान्यतेने ही स्पर्धा एकूण ५ गटात होणार असून प्रत्येक गटातील विजेत्यास आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी शेखर शहा, अजिंक्य रेडेकर व दिपक माने यांच्याशी संपर्क साधावा.

४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जोडी तुझी माझी हा विविध गुणदर्शन स्पर्धा कार्यक्रम होईल. यामध्ये कोणतीही जोडी चालू शकेल. यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी अर्चना कुडचे, सीमा कमते , गिरीजा हेरवाडे व मेघा भाटले यांच्याशी संपर्क साधावा. याचदिवशी सायंकाळी ६ वाजता गोल्डन मेलोडीज द ग्रँड म्युझिकल नाईट हा हिंदी, मराठी गीतांचा कार्यक्रम होईल.५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता शालेय व महाविद्यालयीन डान्स कॉम्पिटिशन होईल. यामध्ये इयत्ता ५ ते ७ वी, ८ वी ते १० वी आणि खुला गट ११ वी ते पदवीधर असे तीन गट असतील. याशिवाय इचलकरंजी मर्यादीत घरगुती गणेशोत्सव आरास (डेकोरेशन) आणि हातकणंगले तालुका मर्यादीत गौरी सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दोन्ही स्पर्धांसाठी १ सप्टेंबर ही अंतिम तारीख असून ४५ सेकंदांचा व्हिडीओ बनवून तो ७६२०३७३६४२ या क्रमांकावर पाठविण्यात यावा. व्हिडीओ हा नैसर्गिक चित्रीकरण केलेला असावा. स्पर्धेचा निकाल व बक्षिस समारंभ शुक्रवार ५ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता ना.बा.घोरपडे नाट्यगृहात होईल, असे सौ. मोश्मी आवाडे यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमांचा शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शेखर शहा,अहमद मुजावर यांनी केले आहे.

# खासदार पुत्राचा डीपीएलमध्ये डंका

नवी दिल्ली , ता.२९ –

**दिल्ली प्रीमियर लीग (डीपीएल) २०२५ मध्ये धमाकेदार खेळींची मालिका सुरूच आहे. बिहारचे खासदार पप्पू यादव यांचा मुलगा सार्थक रंजन हा या लीगमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.**

नॉर्थ दिल्ली स्ट्रायकर संघाकडून खेळताना सार्थकने केवळ ५८ चेंडूमध्ये शतक ठोकले.त्याने ७ चौकार आणि ७ षटकारांचा पाऊस पाडला. सलामीवीर सार्थक रंजन आणि अर्नव यांनी पहिल्या गड्यासाठी ६१ धावांची भागीदारी रचली. मात्र त्यानंतर संघाने लवकरच काही गडी गमावले, पण सार्थक एका टोकाला खंबीरपणे उभा राहून सातत्याने धावा करत राहिला. अर्धशतक पूर्ण झाल्यानंतर त्याने धावांची गती आणखी वाढवली. अखेर ५८ चेंडूमध्ये शतक पूर्ण करत त्याने संघाची धावसंख्या भक्कम केली. सार्थक रंजन या हंगामात सातत्याने जबरदस्त फॉर्ममध्ये दिसून येत आहे. लिलावात नॉर्थ दिल्ली स्ट्रायकरने त्याला १२ लाख रुपयांहून अधिक रकमेने आपल्या संघात घेतले होते. आतापर्यंत झालेल्या ८ सामन्यांमध्ये त्याने एकूण ३४९ धावा केल्या आहेत, जे त्याच्या स्थिरतेचे आणि दर्जाचे प्रतीक आहे.सार्थकच्या शानदार शतकामुळे नॉर्थ दिल्ली स्ट्रायकरने २० षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात १९१ धावा केल्या. न्यू दिल्ली टायगर्सविरुद्ध हा स्कोर पूर्णपणे आव्हानात्मक ठरला.

# गौरवाडसह सात गावात १०१ सार्वजनिक गणेश मंडळांकडून ''श्रीं''ची प्रतिष्ठापना

बुबनाळ, ता.२९ ( वार्ताहर)–

**शिरोळ तालुक्यातील गौरवाडसह औरवाड,आलास,बुबनाळ, कवठेगुलंद, शेडशाळ,गणेशवाडी या गावात यावर्षी १०१ सार्वजनिक मंडळाकडुन ''श्रीं''च्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.गावांगावात बाप्पांचे आगमन अगदी धुमधडाक्यात,लेझीम,ढोल,ताशा अशा पारंपारिक वाद्यासह डॉल्बीच्या दणक्यात झाले.**

मंडळाच्या सदस्यांनी पारंपारिक पेहराव करुन कोल्हापुरी फेटा बांधून अतिशय जोशपूर्ण उत्साहात बाप्पांचे स्वागत केले. काही मंडळानी सजविलेल्या ट्रॅक्टर– ट्रॉली,जीप,ट्रक,टेंपोसह चक्क बैलगाडीतून श्रींची मूर्ती आणली. गौरवाडमध्ये ५ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी गणरायाची प्रतिष्ठापना केली आहे. औरवाडमध्ये ९,आलासमध्ये १८,बुबनाळमध्ये ७ ,कवठेगुलंदमध्ये ११,शेडशाळमध्ये २६ तर गणेशवाडीमध्ये २५ मंडळाकडून ''श्री''च्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



**गणेशवाडीत स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक यांनी प्रत्यक्ष भेट दिलेल्या मकरात आजही ''श्रीं''च्या मूर्तीची सार्वजनिक मंडळाकडून प्रतिष्ठापना केली जाते. (छाया– अनिल जासुद)**

या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी विविध सामाजिक ,धार्मिक कार्यक्रमासह मान्यवरांची व्याख्याने, महाप्रसाद, रक्तदान, आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे.तसेच काही मंडळे ज्वलंत विषयावर, परिस्थितीवर प्रकाश टाकून समाजात जनजागृती करण्यासाठी सजीव देखावा, नाटके,मनोरंजनात्मक कार्यक्रम,प्रसिद्ध ऐतिहासिक मंदिराचे देखावे,विविध मंदिराच्या प्रतिकृती तयार केल्या आहेत. हे पाहण्यासाठी गावागावात रात्री उशिरापर्यंत आबालवृद्धांची गर्दी होत आहे.

गणेशवाडीमध्ये ''श्री''ची प्रतिष्ठापना केल्यानंतर पाचव्या दिवशीच एकत्रित विसर्जन करण्याची परंपरा आहे. यामुळे यावर्षी जरी घरगुती गणपती सात दिवसाचे असले तरी गणेशवाडीत मात्र पाचव्या दिवशीच सर्व सार्वजनिक गणेश मंडळे ''श्री''चे विसर्जन करणार आहेत. या पाच दिवसात प्रत्येक मंडळाकडून गावात सकाळ, संध्याकाळ महाप्रसादाचे आयोजन केले जाते.हजारो भाविक,ग्रामस्थ महाप्रसादाचा लाभ घेतात. पाच दिवस महाप्रसाद असल्यामुळे कोणत्याही घरात वेगळा स्वयंपाक केला जात नाही. गणेशवाडीतील विसर्जन मिरवणूकही पंचक्रोशीसह कर्नाटकमध्ये प्रसिध्द आहे.येथील सर्वच मंडळे एकाचवेळी ''श्री''ची विसर्जन मिरवणूक काढतात.

या मिरवणुकीसाठी काही मंडळाकडून लाखो रुपये खर्चुन डॉल्बी आणली जाते. तर काही मंडळे अगदी पारंपरिक पद्धतीने हलगी,ढोल,ताशा,लेझीम,शिवकालीन लाठी काठी,पारंपरिक वेषभुषेत मिरवणूक काढतात. येथील श्री सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पांना सजविलेल्या पालखीतून निरोप देतात.दरम्यान गणेशोत्सव काळात कुरुंदवाड पोलीस ठाण्याकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

कुरुंदवाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस,दुय्यम अधिकारी सागर पवार,बजरंग माने यांच्या मार्गदर्शनाखाली ३० पोलीस अमलदार,४५ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.